REGISTERED No. N. 4

वर्षाची आगाऊ ५ डाशील ०१२
सहामाही ,, ३ ,, ०८
साल अखेर ,, ७ ,, १ ०८
किरकोळ अंकास ........................ ०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ ०१ ०९
दुसरे खेपेस .... .... ....०१

Town ... ... ... 1
Annual in arrears 7 ,, 1 Rs 8 as
Six monthly........3 .............. 8 as
Single copy ........................ 4 as

Advertisement
elow 10 lines...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per lin e...8 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI AKOLA MONDAY 1 SEPTEMBER 1902 NO 24

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख १ माहे सप्तंबर सन १९०२ इ० अंक २४

## मनुष्य जन्माचें इतिकर्तव्य

या विषयावर मि. वा. ल. चिपळूणकर यांनीं फार सुरस व्याख्यान दिलें. इतिकर्तव्यांत अध्यात्म ज्ञानास त्यांनीं प्रमुखत्व दिलें आहे. यांच्या व्याख्यानावर टीका म्हणून नव्हे परंतु त्या विषयावर स्वतंत्र विचार मीं पूर्वीं कळविले, तेच हल्लीं कविता रूपानें दिले आहेत. तीन चार ठिकाणीं मात्राभंगाचा दोष पडला आहे त्या शिवाय या कवितेंत दोष असतील ते मला कळावे अशी माझी इच्छा आहे. तसेंच माझें भाषण विरुद्ध पक्षाचें म्हणून झालें असें कोणास वाटत आहे तर प्रतिपादित मतांमध्यें विरुद्ध काय आहे तेंहि समजून घेण्याची इच्छा असून ती सफळ करण्याविषयीं विद्वानास प्रार्थना आहे.

* * *

सूज्ञ मतें गमतें कीं,
ईशें देऊनिया विशिष्ट मती ॥
पाठविलें मनुजाला,
संचारायासि भूतला वरती ॥ १ ॥
त्याच्या सभोंवतीं मग,
विविध विषय विलसनी दिसे असती ।
सद्यः कामीं ऐसी,
त्यांत न पारे वस्तु एक ही दिसती ॥२॥
म्हणतील सरिदोघांचे,
जल जरि आहेच आपतें प्याया ॥
अवयव चलन विरहिता,
न मिळलचि तें तृषेसि शमवाया ॥ ३ ॥
हेंचि सकल वस्तुंचें,
तत्व असें म्हणुनि योजना करुनी ॥
सद्बुद्धिची, तयांचा,
शोध करा शास्त्रपद्धती धरुनी ॥ ४ ॥
दोष कसे धर्म कसे,
गुणहि कसे वसाते यांत हें नीट ॥
गति संयोग–वियोगीं,
शोधित असतां धरूं नये वीट ॥ ५ ॥
करितां एकीकरणा,
अथवा करितां तसें पृथक्करणा ॥
आकाररूप वर्णा–
दिक पावाते विविध भेद हें नाना ॥६॥
कारण कार्य विचारुनि,
साधन साध्यहि मनासि आणूनीं ॥
योजूनि बुद्धिचें बळ,
घ्या सुख हा ईश हेतु जाणूनी ॥ ७ ॥
भूपृष्ठाचें तेसें,
भूगर्भाचेंहि व्हावया ज्ञान ॥
व्यासंग सतत ठेवा,
त्यावरि जों नष्ट होय अज्ञान ॥ ८ ॥
अनुभव घेउनि ऐसा,
चाला ज्ञानांत आपुल्या मरती ॥
कीं पदवी ज्ञानाची,
अज्ञान पदाहुनी सदा वरती ॥ ९ ॥

तत्वांच्या शक्तीच्या,
प्रसरण संकोच ह्या गती दोन ॥
यांच्या योगें निज्रपर,
हित साधुनि घ्या सुकीर्ति जोडून ॥१०॥
तुमच्या प्रत्यूह तसे,
येती मार्गीं सवर्गियांच्याही ॥
दूर सुगारुनि द्या ते,
धरितां चित्तामधें न भय कांहीं ॥११॥
जातां न दूर, येतां,
अति सन्निध जड पदार्थ जे त्यांच्या ॥
व्हाल क्षम जाणाया,
कीं पार न कौतुका विधात्याच्या ॥१२॥
प्रभुच्या संकल्पाची,
तेजाची, शक्तिची, दयेची ही ॥
साक्ष पटेलचि तैसी,
दुर्बलता स्वीय शुष्कता यांची ॥ १३ ॥
स्वानुभव असा घेतां,
ईश्वर चरणीं सुलीन व्हायाला ॥
भूतदया बरण्याला,
विहिताचारें जगीं रहायाला ॥ १४ ॥
गरज नसे दुसऱ्याच्या,
बोधाची स्वपर अर्थ साधाया ॥
संसारीं वर्तुनिही,
इह पर लोका तरूनियां जाया ॥ १५ ॥
हें संसर्गेंचि घडे,
न घडे ऐसें कधीं विसर्गानें ॥
पहिल्यानें साध्य उभय–
लोक म्हणति साधु नष्ट दुसऱ्यानें ॥१६॥

नव हें परंतु आम्हां,
मान्य; असें म्हणति अन्य मतवादी ॥
मान्य तयासि कुवी जे,
देहा दंडूनि घेति हटवादी ॥ १७ ॥
टाकुनि सकळ विषय वन–
सरणि वरिति तुच्छ वदति निज तनुतें ॥
विविधापदा विनिर्मुनि,
करिति बळें क्लेशपात्र अपणातें ॥१८॥
अवयव छेदुनि घेती,
अथवा ते शुष्क करिति मंदमती ॥
नयन श्रुति शक्तीचा;
भंग करिति भय न लेशाही धरिती ॥१९॥
कटु तिक्ताम्ल रसाचें,
सेवन कीं धूम्रपानही करिती ॥
वार्जिति भक्ष्यें पेयें,
तनु जर्जर करुनि धन्य आम्हि म्हणती॥ २०॥
मानिति होतो ऐशा,
भक्तीनें लोकपाळ हा तुष्ट ॥
नवल परंतु न समजति,
मूढमति, न तुष्ट होय तो रुष्ट ॥२१॥
ज्या मुळें श्रवणेंद्रिय,
शक्तीचा घेतलाचि लय करुनी ॥
ध्वनि गंभीर घनाचा,
ऐकावा कवण साधना वरुनी ॥ २२॥
हत मार्गें नयनेंद्रिय,
नष्टचि केलें, तया विमूढानें ॥
भास्वान् विधु तारागण,
दर्शन सुख हाय! केंवि तें घ्यावें ॥२३॥

कैसें अवलोकावें,
गिरि सरितांचें तसें वनश्रीचें ॥
रूप परम भव्य तसें,
रम्यहि साफल्य मनुज जन्माचें॥२४॥
गंभीर नाद ऐकुनि,
तेजाचा लखलखाट पाहूनी ॥
प्रेमभरें जन डोले,
लीला प्रभुची अचिंत्य मानूनी ॥२५॥
हीं साधनें हरपलीं,
येति न करचरण किमपि कामातें ॥
अंतर परोपकारा,
पडलें प्रभुही दुरावला त्यातें ॥२६॥

द्रव्यार्जनार्थ योजुनि,
अवयव इंद्रिय समूह जो कोणी ॥
न्यायपथें संपादुनि,
सेवी हे विषय सेव्य जाणोनी ॥ २७ ॥
अन्यांचीं सुख दुःखें,
स्वसुखा दुःखा समान मानितसे ॥
त्यांचा खरा कळवळा,
धरुनि मनीं त्यांस साह्य देत असे ॥ २८
भगवत्प्रसाद चिंतुनि,
सतत अहंकार सोडुनी सगळा ।
उपकार स्तुति गाउनि,
देवाची निज ग्रास जो भक्षला ॥ २९
काल क्रमितो ऐशा,
मार्गें सुहृदाप्त मित्र सुखवून
होईल काय दूषण–
पात्र न कोणास कधिंहि दुखवून ॥ ३०
कीं तो नाहीं झाला,
जोगी, भोगीच सर्व विषयातें ।
धिःकृत म्हणून त्यासीं,
वदणें अनुचितचि हें गमे मातें ॥ ३१

कर्तव्य मानवांचें,
जें सुचलें तें निरूपिलें येथें ।
एक परी शेष असें,
तेंहि विचारार्ह आर्य हो दिसतें ॥ ३२
बंधुप्रेम धरुनि मनि,
सारुनियां दूर जातिभेदातें ।
वर्तावेंचि परस्पर,
नातें हें धरुनि त्यजुनि खेदातें ॥ ३३
लाभानें सुख होतें,
नाशानें असुख आपणा होतें ।
हें तत्व धरुनि ह्रदयीं,
योजावें परहितीं स्वदेहातें ॥ ३४
आहे बरें स्वतांचें,
पूर्ण समाधान येवढ्यानेंची ।
मानूं नये सुजनहो !
करणें जरि कींव देवहीनाची ॥ ३५
अग्नीनें दुसऱ्याची,
दग्धांगुलि होय आपुली नाहीं ।
हें सत्य आपणा परि,
भासावी स्वल्प वेदना कांहीं ॥ ३६
भ्रामक, घातक, पोकळ,
जे रूढाचार दिसति लोकांत ।
नाश अतोनात करिति,
हरिति सुखा वाढवूनि आकांत ॥ ३७
"आपग तसेंचि दुसरे"
"इतिकर्तव्यांत" या सुवचनाची ॥
परिगणना हें भूषण,
अन्यां वचना सरी नये याची ॥ ३८ ॥

आतां एक असे जें
सांगायाचें पवित्र कर्तव्य ॥
तें कथितों परि सादर
चित्तानें आयकोत बुध सर्व॥ ३९
या आर्यावर्तांताचि,
भक्त परम साधु संत जे झाले ॥
ज्यांनीं कळकळुनि तसें,
शोषुनियां कंठ मागणें केलें॥४०
कीं भक्ति करा एका,
देवाची क्षुद्र देवतें त्यजुनी ॥
पारे जनसमुहें दिधलें,
फेंकुनियां तें रुचेंविना म्हणुनी ॥ ४१
पोंकळ कथा असति ज्या,
ज्या रचिल्या रंजनार्थ अज्ञांच्या ॥
असमंजस मूढहि जे,
वाचुनि त्यां कहुनि ऐकवायाच्या ॥ ४२
तसल्या कथा परिसुनी,
मानाव्या सत्य बुद्धिवंतांहीं ॥
जे ज्ञानवान त्यांही,
हव दैवाचि आणखीं नसें कांहीं ॥४३॥

अज्ञ म्हणति भक्ताला,
भेटे विभु एकदा अकस्मात ॥
कळवळुनि सदय होऊनि,
दाबी त्याला दळावया हात ॥ ४४॥
म्हणती एक दरिद्री,
होता फुटक्या धरूनि परळातें ॥
हस्तांत, त्यास भेटुनि,
जगदीशें अर्पिलें नवीनातें ॥४५॥
मारित होता नवरा,
नित्य म्हणुनि भक्तिणीस देवाच्या ॥
तीच्या जागीं राहुनि,
देवानें मार सोशिला तीचा ॥४६॥
कोणी दुर्जन पापी,
दिवसा ढवळ्या लुटूनियां घेई ॥
बारि मार ठोक देई,
मूर्तीचें धन हरूनियां नेई ॥४७ ॥
तो सावासम वागुनि,
लज्जा देन्यांत ईश्वरा लोटी ॥
धाकांत त्यास घाली,
संकोच्यांतिहि; धरूनि मति खोटी ॥४८॥
आळें म्हणाते कपाळीं,
देवाच्या चोरुनी करायाचें ॥
गाऱ्हाणें भक्ताला,
स्वर्गी मुक्तचर्य आळवायाचें ॥४९॥
तैसेंचि कितिक बोलति,
केवळ जे योग्य बोल मनुजातें ॥
बोलूं नयेतचि कधीं,
सुज्ञें लक्षुनि जगन्नियंत्यातें ॥५० ॥
उठणें, बसणें, क्रीडा
करणें, खाणें पिणें, शयन करणें ॥
न्हाणें, तांबुल सेवन
करणें अस्वस्थ प्रकृति वश होणें ॥५१ ॥
बालिश लाविति पीडा
देवा मागें अणीक ही म्हणती ॥
भक्त न खवळो वाछिल
उपवासाचि झालियास रुष्टमती ५२ ॥

संप्रति जन बहु असती,
शिक्षित सारज्ञ जे न वश होती ॥
केवळ श्रद्धेस ह्मणुनि,
मोक्षेच्छूंच्या वसो मनीं शांती ॥ ९३ ॥
प्रभु सर्वज्ञ तयाचा
न घडो उपहास मानवां कडुन ॥
नूतन शिक्षित विद्व-
ज्जन तरि वेदांत सत्य निवडून ॥९४॥
मनुजानें मनुजासम,
वर्तुनि विभुसम विभूस लेखावें ॥
गौरव यांतचि विभुचा,
यांतचि मनुजत्व साधुच्या भावें ॥ ९९ ॥

*   *   *   *

विदर्भ देशांतच केवळ नव्हे, तर त्याच्या बाहेर फार दूर पर्यंत ज्यांची सत्कीर्ति पसरली आहे असें विद्वन्मुकुटमणि, सारासारज्ञ, शांतप्रकृति व सत्यशील **राव साहेब वि. मो. महाजनि** यांस ही कविता भक्तिपूर्वक अर्पण केली आहे.

वि. आ. का.

वऱ्हाडसमाचार

मिती श्रावण वद्य ३० शके १८२४

## फौजदारी न्याय खातें

या खात्याचा वार्षिक रिपोर्ट मोठा समाधानकारक आहे. १९०१ सालांत या प्रांतांतील लोकांची स्थिती चांगली सुधारली असें दिसतें. पीकपाण्यानें लोकांस चांगला थारा मिळत गेला आणि दुष्काळाची दुर्दशा पालटत चालली ही मोठी आनंदाची गोष्ट होय. जसजसा सुखाचा काल येत चालला तसतशी गुन्ह्यांची संख्या फार कमी कमी होत गेली. दुष्काळाच्या सालीं चोऱ्या, दरवडे, डाके, घरफोडी इत्यादि गुन्ह्यांस अगदीं ऊत आला होता; असले गुन्हे त्या दुर्धर वर्षी ४६६९ होते; पण हीच संख्या चालूं सालीं पूर्ववत् १६९० पर्यंत उतरली आहे. गुन्ह्यांची संख्या फार कमी झाली याचा अर्थ आह्मी इतकाच समजतों कीं पोटाला मिळविण्या साठीं लोकांस गुन्हे करावे लागत नाहींत; कशी तरी ओली कोरडी भाकर सुखानें मिळते आणि ह्या मानानें लोक सुखी आहेत. अलिशान नामदार रेसिडेंट साहेब या वरून असें अनुमान बांधतात कीं लोकांची स्थिती चांगली झाली असून ते पूर्वीच्या सुस्थितीला येऊन पोचले आहेत. गेल्या दुष्काळांत जीं पुष्कळशीं कुटुम्बें धुळीला मिळालीं तीं आपल्या पूर्व रंगाला आलीं असें आह्मांस वाटत नाहीं. चार पांच वर्षे सारखीं चांगलीं पिकें येतील तेव्हां लोकांचा पाय कोठें बरोबर जमिनीला लागेल. पीकपाणी चांगलें असलें ह्मणजे चोरी, दरवडे वगैरे गुन्हे कमी होतात पण ह्याच्या उलट कांहीं विशिष्ट गुन्हे वाढत असतात हे गुन्हे ह्मणजे किरकोळ भांडणतंटे, मारामाऱ्या व धमकीचे अपराध हे होत. कांहीं तंटे जमिनीच्या ताब्या संबंधानें असतात आणि त्यांचा निर्णय दिवाणी कोर्टा मार्फत व्हावयाला पाहिजे असतो. आगळीक, कोंडवाड्या संबंधीं गुन्हे, जबरदस्तीनें शेताचा ताबा करणें इत्यादि अपराध पुष्कळच वाढतात. असले गुन्हे दुष्काळाच्या सालीं २७२९ होते पण त्यांचें प्रमाण ४०८० पर्यंत वाढलें आहे. आबादानीचें वर्ष आलें ह्मणजे लोकांच्या हातीं पैसा खेळूं लागतो आणि तेव्हांच या किरकोळ गुन्ह्यांचीं ढोंगें लोकांस सुचतात. पण अशा प्रकारचे गुन्हे १८९८ सालीं ६२८९ होते, तेव्हां चालूं सालची ४०८० ही संख्या अपेक्षां फार कमी आहे आणि ह्मणूनच दुष्काळाचे परिणाम पुरेसे दूर झाले नसावेत असा मे० हेअर साहेबांचा अभिप्राय पडतो. १९०१ सालीं शहर सफाई, स्वच्छता, सार्वजनिक आरोग्य या संबंधानें माजिस्ट्रेट मंडळी विशेष काळजी घेत होती असें दिसतें. या बाबींत खामगास चार पांचशें मोकद्दमे करण्यांत आले.

जे वाईट चालीचे लोक असतात त्यांच्या पासून जामीन घेण्यासंबंधानें पोलिसांनीं विशेष काळजी घेतली नाहीं असा मि. रुस्तुमजी साहेबांचा अभिप्राय आहे. पोलिसाची तरी लहर आहे आणि त्यांच्या इच्छेला वाटेल तेव्हां ते या बाबदींत हात घालतात. त्या शिवाय, चांगल्या वर्तणुकीचा जामीन घेतां येण्याला पुराव्याची बळकटी मोठी लागते. असा चांगला पुरावा पुष्कळदां मिळण्या सारखाच नसतो.

मे. हेअर साहेब यांचा दुसरा एक अभिप्राय असा आहे कीं किरकोळ बाबदींत व दिवाणी स्वरूपाच्या प्रकरणांत जेव्हां फौजदारींत फिर्यादी होतात आणि फिर्यादींत अपराध शाबीत होत नाहीं तेव्हां फिर्यादी कडून आरोपीला नुकसानी दाखल चांगलीशी रक्कम देण्याचे हुकूम वारंवार देण्यांत आले पाहिजेत. या गोष्टीकडे माजिस्ट्रेट साहेब यापुढें चांगलें लक्ष पुरवितील अशी आह्मांस आशा आहे.

१९०१ सालीं २७१०२ माणसावर खटले करण्यांत आले आणि त्यांच्या गुन्ह्या संबंधानें एकंदर ४६०९ इतके साक्षीदार तपासावे लागले. इतक्या साक्षीदारा पैकीं २७९२९ जणांच्या साक्षी ज्या दिवशींच्या त्याच दिवशीं झाल्या. पहिल्या वेळेच्या अपराध्यांकडून जामीन घेऊन त्यांस शिक्षेपासून मुक्त करण्याविषयीं जो नवा नियम क्रिमिनल प्रोसिजरांत घातलेला आहे त्या अन्वयें ९१ अपराध्यां जवळून योग्य प्रकारें जामीन घेण्यांत आले. या कलमाचा यथायोग्य उपयोग व्हावा तसा होत नाहीं. या नव्या कलमाचा योग्य प्रकारें अधिकाधीक उपयोग होत जावा असें आह्मांस वाटतें. रिपोर्टाच्या वर्षी एकंदर दंडाची रक्कम ६०८०४ रुपये भरली. जुनी नवी बाकी मिळून ४६९९ रुपये साल अखेरीला वसूल करण्याचे राहिले होते.

जिल्हावारीनें ज्या माजि० चीं कामें वरिष्ठांस पसंत पडलीं त्यांची यादी पाहण्या सारखी आहे.

रिपोर्ट लिहिण्याच्या संबंधानें मि० रुस्तुमजी व मेजर कोलेब यांचें आभार मानण्यांत आले.

आकोला— मे. क्राफर्ड, करी, व शेंवेकर.

उमरावती—मे. अनवरअल्ली, बंधूजी जनार्दन, गणेश बापूजी, कृष्णाजी अनंत व सोराबजी.

वाशीम—मे. डु, बार, हैदरअल्ली, लक्ष्मण गोपाळ देशपांडे, व दादी मास्तर.

बुलढाणा—मे. अजिजुद्दीन, नारायणसिंग, भट, सरंजामे, व नबाब सलामुल्लाखान.

इलिचपूर— मे. मोईनुद्दीन, जठार, व रघुवीरसिंग.

वणी— मे. डोकप, व रहिमतुल्ला.

हैदराबाद— मे. क्याप्टन बर्टन, राव बहादूर बा. का. जोशी व क्राफर्ड.

---

सदृशं चेष्टते स्वस्याः,
प्रकृते र्ज्ञानवानपि ॥
प्रकृतिं यान्ति भूतानि
निग्रहः किं करिष्यति ॥

( रावसाहेब शेवडे यांचें व्याख्यान )

नंबर ३

प्रकृतीपुढें ज्ञानाचें कांहीं चालत नाहीं या गोष्टीची सिद्धता तीन प्रकारांनीं संभवते. एक प्रामाणिक मनुष्यांचे आपल्या स्वतः संबंधाचे उद्गार; दुसरें सूक्ष्मपणानें लोकांच्या स्वभावाचें अवलोकन, व तिसरें ग्रंथाचीं प्रमाणें.

नाना फडणविसांनीं ज्या प्रमाणें आपल्या बद्दल लिहिलें आहे, त्या प्रमाणें इतिहास प्रसिद्ध आणखी दुसऱ्या कोणत्या थोर पुरुषांनीं आपल्या ज्ञानाचा दुर्बळपणा कबूल केला आहे हें आमच्या मर्यादित वाचनामुळें आह्मी सांगूं शकत नाहीं. ज्यांचें वाचन विस्तृत असेल असे विद्वान अशीं आणखी कांहीं उदाहरणें कदाचित् सांगूं शकतील. या संबंधांत किंयेक मित्रांचे मात्र उद्गार कळण्या सारखे असतात. परवा नुकताच एक गृहस्थ आमच्याकडे आला, व स्वभावाचा थोडा मोकळा असल्यामुळें, प्रकृतीपुढें आपलें कांहीं चालत नाहीं, ह्मणून सांगूं लागला. त्यानें असें सांगितलें कीं, “ अमुक एक गोष्ट मी न करण्याचा निश्चय केला, व ईश्वरापुढें उभा राहून शपथही घेतली; पण पुनः मोह आला तेव्हां मी मनांतल्या मनांत ईश्वरास असें ह्मणालों कीं, परमेश्वरा, माझा निश्चय तडीला जात नाहीं. मी असें समजतों कीं, मी अशुद्ध वागावें ह्मणून तुझीच इच्छा आहे, व त्या प्रमाणें तूंच बुद्धि देतोस. अशा तऱ्हेनें त्यानें आपल्या मनाचें समाधान केलें. या प्रकारची गति पुष्कळांची होत असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं.

दुसरी गोष्ट सूक्ष्मपणानें लोकांच्या स्वभावांचें अवलोकन करणें ही होय. हल्लींच्या श्लोकांत भगवंतांनीं सांगितलेली गोष्ट इतकी स्पष्ट आहे कीं, ती सिद्ध करण्याला प्रमाणें पाहण्याची जरूरच नाहीं. सृष्टींत भिन्न भिन्न मनुष्यांच्या वर्तनामध्यें जें वैचित्र्य आपल्या दृष्टीस पडतें त्याला कारण प्रकृति होय. सदाचरण कोणतें, दुराचरण कोणतें, याचें ज्ञान सर्वांस आहे; सर्वांस सदाचरण आवडतें; व त्या प्रमाणें वागण्याची सर्वांस इच्छा होते; पण इच्छे प्रमाणें कोणाचेंही वर्तन न होतां प्रकृति प्रमाणें होतें; ह्मणूनच एवढें वैचित्र्य दृष्टीस पडतें. घटकाभर अज्ञानी लोकांना बाजूला ठेवून, चांगल्या चांगल्या विद्वानांचाच वर्ग घेऊं. त्यांत देखील प्रकृति प्रमाणेंच त्यांचें वर्तन आहे. असें आपणांस दिसून येईल. ज्ञाना प्रमाणें असतें तर ज्ञानी वर्गांतील सर्व व्यक्ति उत्तम प्रकारच्या आचरणाच्या असत्या. कित्येक पुरुष अत्यंत कामी असतात, कित्येक अत्यंत क्रोधी असतात, कित्येक अत्यंत लोभी असतात, कित्येक लाजाळू असतात, कित्येक निर्लज्ज असतात, कित्येक मनाचे कपटी, कित्येक साधे भोळे, कित्येक स्वाद, कित्येक अति शूर, कित्येक चुबक, कित्येक उथळे, कित्येक द, कित्येक बृहस्पति, असे शेंकडों प्रकार दृष्टीस पडतात. कोणी ह्मणेल हे गुण सहवासानें लागतात, परंतु यांतील कित्येक गुण अगदीं लहानपणींच दिसूं लागतात. त्या त्या गुणांच्या उत्कर्षास कदाचित् सहवास कारण होईल, परंतु अंतःकरणांत नसलेला गुण सहवास आणूं शकणार नाहीं. सहवासाचा प्रकार स्थिति स्थापक गोळ्या सारखा होतो. दुसरें असें कीं वरील दुर्गुण अभ्यासानें कित्येकांचे याच जन्मीं कमी होतात किंवा जातात. पण ज्यांच्यांत ते प्रबळ असतात त्यांचे ते दुर्गुण, काळाचे पांढरे झाले तरी कमी होत नाहींत. ७५।८० किंवा ९० वर्षांच्या म्हाताऱ्यांतही जेव्हां आपण काम, क्रोध, लोभ इत्यादिकांचा अतिरेक पहातों तेव्हां आपण आश्चर्य करितों या वरून स्थूल देहाच्या अशक्ततेवर प्रकृतीची अशक्तता अवलंबून नाहीं असें आपणांस दिसेल. वयाच्या कारणानें दिसणारी प्रकृतीची अशक्तता केवळ भासमान समजावी. तिचें खरें स्वरूप ज्याचें त्यासच ठाऊक. बहुके, त्याचें ज्ञानही भ्रांतिमूलक राहील.

आतां ग्रंथप्रमाणें पाहूं जातां प्रथम आह्मी परमहंस विद्यारण्यांच्या पंचदशीचा आधार घेतों. पुढील श्लोक सहज समजण्या सारखे आहेत.

विवेके जाग्रति सति,
दोष दर्शन लक्षणे ॥
कथमारब्ध कर्मापि,
भोगेच्छा जनयिष्यति ॥ ९१ ॥
नैष दोषो यतोऽनेक,
विधं प्रारब्धमीक्ष्यते ॥
इच्छाऽनिच्छा परेच्छाच,
प्रारब्धं त्रिविधंस्मृतम् ॥ ९२ ॥
अपथ्य सेविनश्चोरा,
राजदार रता अपि ॥
जानन्त एव स्वानर्थं,
मिच्छन्त्या रब्ध कर्मतः ॥ ९३ ॥
न चाप्येत द्वारयितु
मीश्वरेणापि शक्यते ॥
यत ईश्वर एवाह,
गीतायामर्जुनं प्रति ॥ ९४ ॥

### अर्थ

विवेक जर जागा आहे तर प्रारब्धाचें काय चालणार आहे असें कोणी ह्मणेल तर प्रारब्धानुरूप वागणें हा मनुष्याचा दोष नाहीं. इच्छा, अनिच्छा आणि परेच्छा असे प्रारब्धाचे तीन प्रकार आहेत. कुपथ्य करणारे रोगी, चोर, राजपत्नीपाशीं गमन करणारे, हे सर्व पुढील अनर्थ माहीत असून तसे

बागतात. येथें परमेश्वराचेंही कांहीं चालत नाहीं. प्रारब्धापुढें आपलें चालत नाहीं असें ईश्वरानेंच गीतेंत अर्जुनास सांगितलें आहे.

या श्लोकांच्या पुढचा श्लोक 'सदृशं चेष्टते स्वस्याः' हा आहे. हा श्री० विद्यारण्यांनीं वरील श्लोकांपैकीं शेवटच्या श्लोकांत सांगितल्या प्रमाणें, भगवंताच्या तोंडचा ह्मणून घेतला आहे. या वरील श्लोकांत विद्यारण्यांनीं प्रारब्धाचा बलवत्तरपणा स्थापित केला आहे. प्रारब्ध आणि प्रकृति हीं एकच, असें विद्यारण्य ह्मणतात; व वामन पंडितांचेंही तेंच मत आहे असें वर सांगितलेंच आहे. शेवटच्या श्लोकांत विद्यारण्यांनीं ह्मटलें आहे कीं, प्रारब्धापुढें ईश्वराचेंही चालत नाहीं. व हें श्रीकृष्णानें कबूल केलें आहे, अशा अभिप्रायाची आचार्यांची टीका यांच्या शब्दांनीं वर दिलीच आहे.

(अपूर्ण)

# The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 1 1902

The career of Lord Curzon is famous for its era of inquiry—Commissions, We shall have to admit that his excellency is doing a very great service to the cause of the different branches of administration. Though we have reasons to be dissatisfied with some of the conclusions, at which a commission like the University commission arrives after a minute and critical examination of the present circumstances, we shall not, however, ignore the fact that such a preliminary inquiry ought to precede any useful measure of practical utility. Such an inquiry is in fact the pioneer of all actual reforms. It paves the way for an honest effort at improvemet and serves as a sure guide—post to point to the way one should take when he undertakes to improve the present matters as they stand. A full & thorough inquiry leaves little scope for vague generalities. It does away at one stroke with the easy mode of finding faults in the present system where as no better measure is suggested to take the place of the present defects and short—commings. The work of a commission gives us a stand—point from which we can apply our models of reform with the necessary changes therein. The work of a commission is thus in fact the preliminary stage of all practical reforms. From this point of view we have been welcoming the appointments of these commissions. The present police—commission is one of those useful commissions. The police department is one which has been an object of public reproach ever since its very establishment. People will always have something to speak ill of the department, though it is the angel of protecting our lives and property. The work of the police is of such a nature that it will evoke comment from one quarter or another, Their main portion of the police duties lies with the condemned portion of the society. Evil doers will have naturally great reasons to be dissatisfied with the discharge of the police—duty. Truely then the police department is liable to its natural vicissitudes.

But we have to see whether the present police—administration is capable of improvements in some important directions and if so what are the ways of effecting them in a manner to magnify the usefulness of the police with the minimum evils attending thereon. While the police commission are holding their sittings in the Northern provinces, we are glad to see that the Local police committee of this province have been doing their best to collect information, on the matters connected with the police inquiry. In another column we have published the Marathi version of the Government resolution in this connection with a request from the memebers of the Local Police—Committee that all who would interest themselves in the matter of the police—commission will favour them with their opinions thereon. We welcome such an invitation and thank most heartily the movers of it. The non—official public will have little reason to grumble that their opinions have not been courted by the Local—police—Committee. We have however our own doubts as to the way in which such a request will be responded to by a general public. We wish however that the present inquiry will be successful in laying down some very urgent and useful reforms for immediate approval. We shall not attempt to forestall the free expression of the public opinion on this important topic but we shall try to touch some of the difficulties that we ourselves met in arriving at definite proposals. The police system is in itself very good on all sides. But our difficulty begins when we picture to ourselves the incompetency of the men that hold different posts in the system. Abstractedly the system is good but when we deal concretely with the men in it we begin to feel the tottering ground uuder our feet.

(1) The incompetency we allude to might exist in numberless ways. Want of the necessary education in the discharge of the police duty may be as bad as the want of honesty and the desire for illegal lucre. Remedy to remove the evils of incompetency lies in making good appointments. Favouritism in making appointments is a real danger at issue. Merit should be the real test. Good parentage and good breeding should be particularly attended to, in making appointments.

(2) A school for training inspectors and other superior officers in the work of investigation is one of the necessities,

(3) In Berar we require mounted police for patrolling the high roads.

(4) The standard of the Departmental examinations should be raised with a view to create a test for reading books on important cases of detective skill.

(5) Superior officers of the rank of inspectors add upwards should have chances of getting footing and future promotions in the ranks of Tahsildars Extra Assistant Commissioners and Assistant Commissioners and Deputy Commissioners and *vice a versa.*

(6) The present pay of the police department is as good as that in the other department. A man in the police department gets as much as he would in any other private service or profession. However the police department requires an additional strength in point of the number of men on the lower grades.

(7) For Inspectors and upwards some University standing should be a necessary qualification. This should not be a bar in promoting a man in the lower grades for his exceptional and rare abilities.

(8) To facilitate control of the superior officers with the object of preventing oppressions on the part of the subordinate police, honourary Inspectors and Chief—Constables be created from the richer classes of leisure and local importance in the different communities.

(9) A system of volunteer police be introduced to popularize police—drill and a general knowledge of investigating crimes.

[10] The European control be maintained by recruiting from other provinces men of estalished qualifications for higher offices.

## वऱ्हाड

हवामान— या आठवड्यांत दोन वेळां पाऊस चांगला पडला. आणखी पाऊस चांगला होण्याचीं अनुकूल चिन्हें दिसतात. हिंवताप, हागवण वगैरे दुःखणीं जोरावर आहेत, पण इतर रोगराई कोणतीच नाहीं. पीकें चांगल्या स्थितींत आहेत.

आकोला क्रिकेट क्लब व भुसावळ क्रिकेट क्लब यांचा सामना आकोल्यास झाला. त्यांत भुसावळवाल्यांची चांगली सरशी झाली.

रा. रा. गणेश बळवंत मोडक बी. ए. यांनीं 'राष्ट्रीयपणा' या विषयांवर इंग्रजींत काल व्याख्यान दिलें. अध्यक्षस्थानीं मे. ड्यांडी साहेब होते.

'श्रोता'– कळवितो कीं लायब्ररींत ब्रह्मविद्येवर जीं व्याख्यानें होतात तीं न होतील तर बरें! ब्रह्मविद्या गोड असली तरी श्रोता सत्पात्र नसेल तर ती मोठा घोटाळा करिते. 'प्रकृती'ची घटपट फार नको होती. इत्यादि.

प्लेग प्रतिबंधक उपाय ह्मणजे स्वच्छता होय. ती राखण्यासाठीं काय काय उपाय योजावे हें ठरविण्यासाठीं गेल्या बुधवारीं कुमार श्री हरभामजी रावजी यांच्या अध्यक्षते खालीं जाहिरसभा भरली होती. अध्यक्षाचें भाषण फार उत्कृष्ठ झालें आणि म्युनिसिपल हद्दींत स्वच्छता ठेवण्याचे उपाय योजण्यांत आले ही गोष्ट फार सुंदर झाली.

येथील टेलिग्राफ सुपरिंटेंडंट रा. रा. गुरुबक्षसिंग हे नामदेवाच्या अभंगा संबंधानें एक निबंध लिहित आहेत. त्यास नामदेवाच्या हिंदी भाषेंतील अभंगाविषयीं माहिती पाहिजे आहे तर जे कोणी या कार्याला मदत करितील त्याचें ते फार आभारी होतील.

दुरुस्ती—आजच्या अंकाबरोबर पुरवण्या वाटल्या जात आहेत त्यांमध्यें 'सन्मार्ग दर्शक मंडळी' च्या पुरवणीवर '२९ आगष्ट' तारीख पडली आहे तेथें १ सप्तेंबर वाचण्यांत यावी.

## इंडियन पोलिस कमिशन

हिंदुस्थान सरकारचे खालीं दिलेल्या ठरावांत दर्शविलेल्या निरनिराळे मुद्यांवर चौकशी करून रिपोर्ट करण्या करितां अलिशान रेसिडेंट साहेब बहादूर मुलुख अमानी हैदराबाद यांनीं नेमलेली लोकल पोलीस कमिटी ही पोलीस खात्याचें काम चांगलें चालण्या संबंधानें ज्यांना विशेष कळकळ आहे अशा लोकांची सदहू मुद्या संबंधानें जीं कांहीं मतें असतील तीं उमरावती येथें तारीख १९ माहे सप्तेंबर सन १९०२ इसवीचें आंत कळविल्यास ऐकण्यास उत्सुक आहे.

हिंदुस्थान सरकारचा ठराव.

गव्हरमेंट आफ इंडिया यांचा (पोलीस खात्या संबंधाचा) होम डिपार्टमेंट रेझोल्युशन नंबर ९१०–२७ तारीख सिमला ९ माहे जुलाई १९०२ इसवी यांतील उतारा.

गव्हरनरजनरल इन् कौनसिल यांनीं सेक्रेटरी आफ स्टेट यांच्या संमतीनें ब्रिटिश इंडियांतील पोलीसचे व्यवस्थे व कारवाई संबंधानें चौकशी करण्याकरितां कमिशन बसविण्याचें ठरविलें आहे.

ज्या ज्या बाबतींत कमिशन चौकशी करून रिपोर्ट करणार आहे त्या बाबती खालीं लिहिलें प्रमाणें:—

१ जिल्ह्यांतील पोलिसाच्या निरनिराळ्या ह्मणजे मोठ्या व लहान दरजाचे मामुली कामावर अगर रिझर्व्हमध्यें असलेले पायदळ व स्वार यांची रचना, शिक्षण, संख्या व पगार हीं सार्वजनिक शांतता राखण्याकरितां व गुन्ह्याचा पत्ता लावण्याकरितां पुरेशी आहे किंवा नाहीं आणि नसेल तर वरील उद्देश साधण्याकरितां प्रत्येक प्रांताच्या स्थानिक स्थितीकडे लक्ष देऊन त्यांत काय काय फेरफार झाले पाहिजेत.

२ हल्लींची पोलिसची रचना गुन्ह्याची खबर देण्यास व ते पत्त्यांत आणण्यास पुरेशी आहे अगर त्यांत कांहीं सुधारणा केली पाहिजे? तसेंच गुन्ह्याची खबर देण्यास व ते पत्त्यांत आणण्यास हल्लींचे गांवचे कामगार व गांवचे पोलीस ह्मणजे जागले यांची जिल्ह्याचे पोलिसास पुरेशी मदत आहे अगर नाहीं व नसेल तर गांव पोलिस व जिल्हा पोलीस यांचे संबंध (गांव पोलीसास पोलीस आक्टा अन्वयें रजीष्टर करितां कामा नये. इकडे लक्ष्य देऊन) कोणत्या रितीनें सुधारण्यांत येतील.

३ हल्लींची गुन्हे पत्त्यांत आणण्याची प्रत्येक प्रांतांतील रचना (क्षुल्लक बाबतींत पोलीसाकडून दखल न मिळतां सर्व मोठमोठे गुन्हे पत्यांत आले पाहिजेत या गोष्टीकडे लक्ष्य देऊन) पुरेशी आहे किंवा नाहीं, नसेल तर त्यांत कांहीं सुधारणा करण्यास मार्ग आहे कीं काय, असेल तर कोणत्या रितीनें, अगर गुन्ह्याच्या आरंभीच्या चौकशी करितां राष्ट्रीय अगर प्रांतिक निराळें खातें स्थापन करण्याविषयींची शिफारस करणें जरूर आहे कीं काय ?

४ गुन्हे वगैरेचा हिशोब देणारीं हल्लीं प्रचारांत असलेलीं पत्रकें समाधान कारक आहेत किंवा नाहींत. नसल्यास त्यांत कांहीं सुधारणा करण्या सारखी आहे काय? आणि पोलीस खात्यानें केलेलें काम पहाण्यास या पत्रकाचा ज्या रितीनें हल्लीं उपयोग केला जातो ती रीत बरोबर आहे किंवा नाहीं.

५ पोलिसचे कामावर हल्लीं माजिस्ट्रेटची असलेली देखरेख आणि गुन्ह्याचे तपासा संबधानें कामावर (इन्स्पेक्टर आदी कडून) वरील पोलीस अधिकाऱ्यांनीं दिलेली नजर हलक्या दरज्याचे पोलीस कामगारा कडून रयतेवर जुलूम न होऊं देण्यास पुरेशीं आहे किंवा नाहीं. नसेल तर ही देखरेख व नजर कोणत्या रितीनें पुरेशी करितां येईल.

६ हल्लींचें रेलवेचे पोलिसाची रचना, त्यांच संस्थानें व प्रांत या मधील व्यवहार आणि जिल्ह्याचे पोलिसाशी संबंध समाधानकारक आहे किंवा नाहीं, नसल्यास त्यांत कांहीं सुधारणा करण्यासारखी आहे काय?

७ हल्लीं प्रत्येक प्रांतांतील पोलिसांत नेटिव्ह लोकांस दिल्या जात असलेल्या जागा चांगल्या वर्गांतील लोकांचीं मनें या खात्यांत शिरण्यास वळविण्या इतक्या महत्वाच्या आहेत किंवा नाहींत आणि नसतील तर जिल्ह्याचा ज्यार्ज युरोपियन अधिकाऱ्याकडे असणें अवश्य आहे या गोष्टीकडे लक्ष देऊन तसें करण्यास काय योजना केल्या पाहिजेत.

*RUSTOMJI FARIDOONJI*
F. Sewell
मेंबर्स
लोकल पोलीस कमेटी.

## आह्मी ते आह्मी आणि तुह्मी ते तुह्मी

तुह्मी आणि आह्मी फार भिन्न– कारण तुह्मी ते तुह्मी आणि आह्मी ते आह्मीच! असें नसतें तर युरोप व आशिया हीं दोन खंडें दोन राहिलींच नसतीं–दोन्ही मिळून एकच झालें असतें व मग आह्मी आणि तुह्मी हा भेदाभेद राहिलाच नसता. आह्मी आणि तुह्मी एकत्र झालों असतों तर एक आह्मी तरी राहिलों असतों, नाहींतर तुह्मी तरी राहिलां असतां, आह्मी आणि तुह्मी असे दोघे ह्मणून कांहीं राहिलों नसतों.

आह्मी पूर्वेकडे तर तुह्मी पश्चिमेकडे. आह्मी आरंभीं तर तुह्मी शेवटीं. आमचा प्रथम जन्म तुमचें नंतर मरण. आमचा देश मानवसभ्यतेचें सूतिकागृह तर तुमचा देश मानवसभ्यतेचे स्मशान. आमचा उषःकाळ तर तुमचा सायंकाळ. आमचा अंधकारांतून उदय तर तुमचा अंधकारांत विलय.

आमचा वर्ण काळा, तुमचा वर्ण गोरा. आमचीं वस्त्रें शुभ्रवर्ण, तुमचीं वस्त्रें कृष्णवर्ण. तुह्मी आपलें श्वेतांग झांकून टाकतां, आह्मी आपला कृष्णदेह उघडा मिरवितों. आह्मी पितों साधें पाणी, तुह्मी पितां लाल पाणी. तुमचा देश आणि आमचा देश यांच्यामध्यें काळ्यापाण्याचें अधिष्टान आहे. आमची जात काळें पाणी ओलांडल्यानें जाते आणि तुमची जात काळें पाणी ओलांडल्या खेरीज रहात नाहीं!

तुह्मी दीर्घ तर आह्मी प्रशस्त. आह्मी निश्चळ तर तुह्मी चंचळ. आह्मी वजनानें भारी तर तुह्मी किंमतीनें भारी. दुसऱ्याला वश करण्याला तुमच्या मतानें सर्वोत्कृष्ट उपाय ह्मणजे मनगटाचा जोर, आमच्या मतें उत्तमोत्तम उपाय ह्मटला ह्मणजे मानसिक नम्रता. आह्मी वाचाळ तर तुह्मी बधिर. आमची बुद्धि सूक्ष्म–इतकी सूक्ष्म कीं, ती आहे कीं नाहीं समजणें देखील कठीण. तुमची बुद्धि विशाल—इतकी विशाल कीं ती किती आहे हें समजण्याची देखील मुष्किल! आह्मी जें सत्य ह्मणून समजतों त्याला तुह्मी केवळ कल्पना समजतां, आणि तुह्मी ज्याला सत्य समजतां त्याला आह्मी स्वप्न समजतों!

तुह्मी प्रबळ तर आह्मी दुर्बळ. तुमची स्वाधीनता तर आमची आधीनता. तुह्मी आमचा तिरस्कार करतां, आह्मी तुमच्यावर भक्ति करतों! आह्मी तुमच्या घरीं गेलों तर तुह्मी विरक्त होतां, तुह्मी आमच्या घरीं आलां तर आह्मी कृतार्थ होतों! तुह्मी आह्मांला दोन्ही हातांनीं लोटतां, आह्मी तुमच्या दोन्ही पायांशीं लोटांगण घालतों. तुमचे विशेष गुण ह्मटले ह्मणजे धूर्तता आणि दंडेलगिरी, आमचे विशेष गुण ह्मटले ह्मणजे वाचाळता आणि मूर्खपणा!

तुह्मी देशोदेशीं भ्रमण करित असतां, आह्मी घरांत निजून असतों. आमचा समाज स्थावर, तुमचा समाज जंगम. तुमचा आदर्श प्राणी, आमचा आदर्श उद्भिज. तुह्मांला धडपड करित राहिल्यानें सुख वाटतें, आह्मांला स्वस्थ डुलक्या घेत राहिल्यानें सुख वाटतें. सुख तुमचें Ideal आहे. दुःख आमचें Real आहे. तुमचें लक्ष्य आरामाकडे, आमचे विरामाकडे. तुमच्या नीतिशास्त्राची शेवटची गोष्ट श्रम तर आमची आश्रम.

मासिक मनोरंजन

पुढें चालूं

---

## नोटीस

रा० महादु वल्लद धुळाजी जात धनगर आडनांव गाईकवाड राहणार हिवरखेड आगर नीमगांव ता० मेहेकर जि० बुलढाणें यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको आहे. मजास आकार १९ वर्षे झालीं व तुम्हास माझे बापांनीं घरीं आणून तुम्हास व मला ४ महिने ठेवून घेतले व संसार करा म्हणून सांगितलें तें तुम्हास पसंत पडलें नाहीं व तुम्ही पळून गेले. व तुला घेऊन जात नाहीं तू मला नको असें पंचा समक्ष म्हटलें. व तुम्ही मला खरोखर नेत नाहीं आणि मला मारहाण करितां. लग्नाचे वेळेस दागीना किंवा कपडा घेतला नसोन हल्लीं २९ रुपये कर्ज उचलून पोटीं घालविलें आहे व आज नऊ वर्षे झालीं मी मिळवून व कांहीं कर्ज काढून पोट भरते आहे. तरी सदरहु नोटिसीनें मी कळवितें कीं ही नोटीस पावल्या पासून १५ पंधरा दिवसाचे आंत मी उचललेले रुपये कळंबेश्वर मुक्कामी येऊन हिशोब करून देणे व मजला नांदविण्यास घेऊन जाणे व मारहाण करणार नाहीं अशी खात्री दोन पंचा समक्ष करून द्यावी या प्रमाणें तुह्मी न केल्यास तुमचा मजवर नवरेपणाचा हक्क कोणतेही तऱ्हेचा राहणार नाहीं व मी दुसरा नवरा करीन ह्मणजे मोहतराचा वरठाव पाईन व कर्जाऊ रुपया वहुल ह्मणजे पोटगीचा व नोटिसीचा सर्व घेण्याची तजवीज करीन. कळावें ता० २० माहे आगष्ट सन १९०२ इ० सदी

सहीची निशाणी बांगडी साळु मर्द
महादु धनगर गाईकवाड राहणार
हल्ली कळंबेश्वर ता० मेहेकर
जि. बुलढाणें द. रायो
लक्ष्मण तळेकर जानेफळ

---

## जाहिरात

मी खालीं सही करणार गोविंदा वल्लद देवमन पांडे पाटील राहणार सवंदळ तालुके आकोट जिल्हा आकोला या लेखावरून सर्व लोकांस जाहीर करितों कीं सवंदळ या गांवास माझे स्वतःचे कमाईची एक मोठी हवेली व शिवाय ४-५ घरें आहेत. सवंदळ येथील शेत नंबर ९६ एकर गुंठे ७।१७ आकार रुपये १९ व याच गांवची अधीक ५ पांच शेतें आहेत. ही सर्व जिंदगी माझे मालकिची आहे या शिवाय, लोकाकडेस माझें पुष्कळ देणघेण आहे. या एकंदर जिंदगीवर दुसरे कोणाची कांहीं मालकी नाहीं. तरी लबाडीनें कोणी भाईबीरादर माझे नुकसान होण्याचे हेतूनें व जिंदगी पचविण्याचे इराद्यानें माझे संमती खेरीज सदर्हू भाईबिरादरा पैकीं कोणी कोणास सदर्हू जिंदगी माझी सर्व किंवा या पैकीं कांहीं खरेदी, गहाण, किंवा बक्षीस लिहून देईल अगर लिहून घेईल तर अशी कपटानें झालेली खरिदी विक्री बातल असे. शिवाय अशा झालेल्या कपटाचे खरिदी व विक्री बद्दल करून देणार यानवर व करून घेणारावर फौजदारी होऊन ते शिक्षेस पात्र होतील.

मला असें समजलें कीं रा. शिवलाल अग्याराम मारवाडी सावकार राहणार हिवरखेड तालुके आकोट यानें कपटानें सवंदळ येथील शेत नंबर ९६ एकर ७ गुंठे १७ आकर रुपये १९ हे व अजमास पांच वर्ष झालीं नवीन मी बांधलेली माझे मालकीची हवेली अजमास तीन हजार किंमतीची या पैकीं निमे हवेली सदरहु मारवाडी यानें पंढरी वा। करणाजी कुणबी राहणार सवंदळ तालुके आकोट जिल्हा आकोला याज पासून लिहून घेतली व सदर्हू इसमानें कपटानें लिहून दिली आहे. ही जिंदगी अजमास २९०० अडीच हजाराची असून पाचशें रुपयास लिहून दिली. ही खरीदी विक्री झाली असल्यास अगदीं कपटाची व पोकळ आहे. ही बातमी समजल्यावरून ही जाहीर नोटीस देणें भाग पडलें. अशा कपटानें झालेले व्यापाराबद्दल माझे किंवा माझे मुलाबाळांचें जें नुकसान होईल ते सर्व भरून घेण्याची तजवीज करून संबंधीं असलेले गुन्हेगार लोक शिक्षेस पात्र होतील. कळावे. तारीख २९-८-१९०२ इसवी.

सहीची निशाणी
गोविंदा वल्लद देवमन पांडे राहणार
सवंदळ तालुके आकोट पोस्ट
हिवरखेड रूपराव पाचे
हातची रेघ.

---

### ENCLOSURE TO THIS OFFICE
No. 269
*Dated the 27th. August 1902*
NOTIFICATION

The following rules for the regulation and inspection of dák bungalows within the limits of the Shegaon municipality having been made by the Municipal Committee under section 116 (1) (j) of the Berar Municipal Law, 1886, having been confirmed by the Resident under section 116 (3) of the said Law and published in Hyderabad Residency Orders notification No 176 dated the 18th July 1902 are published for general information.

(1) The dák bungalow is furnished for the the convenience of travellers, with furniture, crockery, glassware, linen, and cutlery, and a messman and sweeper are in attendance.

(2) Travellers are subject to the payment of the following fees for use of the bungalow:—

| | Per head Rs. | a. |
|---|---|---|
| For each adult under 6 hours... | 0 | 8 |
| For each adult over 6 hours up to 24 hours ... ... ... | 1 | 0 |
| Children under 10 years of age... | Free. | |

(3) Any traveller pitching his tent in the compound of the dak bungalow or using the stables, &c. of the bungalow, will be liable to pay the fees specified in rule 2 above from the time the tent is pitched or the stables occupied.

(4) The number of rooms occupied will not be considered, but the number of travellers occupying the same and the period of occupation: provided that rooms in excess of the actual number of persons using the bungalows are not occupied to the exclusion of any other traveller.

(5) The period of occupation will be reckoned from the time the room has been taken possession of either by the traveller or his servants.

(6) Travellers cannot occupy any room in the bungalow for more than three days without the special sanction of the Chairman or, during his absence from head—quarters, of the Vice—Chairman of the Municipal Committee or Secretary in case the Chairman or Vice—Chairman are both absent.

(7) If the Commissioner, Judicial Commissioner, Civil and Sessions Judge, Inspector—General of Police, Sanitary Commissioner or any Deputy Commissioner on arrival finds all the rooms of the bungalow occupied, he may call on any treveller, not being a gazetted officer on duty, in occupation of a room to vacate, and such traveller shall be bound on the requisition of such gazetted officer to vacate the room even though he may not have been in occupation thereof for three days.

A traveller, not being a gazetted officer on duty, shall not be entitled to enter any room in the bungalow in the occupation of any of the above mentioned officers even though no other room is available for occupation and though such officer may have been in occupation for more than three days.

(8) Travellers will be charged for anything belonging to the bungalow that may be broken or lost by them or their servants during their stay at the rates mentioned in the attached list.

(9) The messman's rates are also furnished and are to be charged, provided no other arrangement are made by the traveller with the messman.

(10) Travellers must pay the fees and messman's charges in full before quitting the bungalow. If there are any complaints, they should be made to the Deputy Commissioner of the District or to the Chairman or Vice—Chairaman of the Municipal Committee, who will take such action as he thinks necessary.

(11) Travellers are to record their remarks in the bungalow book, noting the time of occupation, number of persons who have occupied the bungalow, the amount paid, and for what purpose, *viz*, halt or breakage.

(12) Every dak bungalow under municipal management will be supervised by the Chairman or Vice—Chairman or Secretary, who will primarily be responsible for their proper sanitation and up—keep and for the due observance of these rules.

(13) Infringement of any of the foregoing rules by travellers occupying the dag bungalows shall, on conviction before a Magistrate, make the person convicted liable to a fine which may extend to Rs. (50) fifty, and when the breach is a continuing breach with a further fine which may extend to five rupees for every day after the first during which the breach ontinues.

Dated Shegaon the 27 August 1902 — E. C. RICH, Vice—Chairman, Shegaon Municipality

REGISTERED No. N.

सहामाही ,, ३ ,, ८८
साल अखेर ,, ७ ,, १ ८८
किरकोळ अंकास ........................०४

नोटिशी बद्दल
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस........ ०१ ०६
दुसरे खेपेस .... .... ....०१

Annual in advance 5 Postage 13 as
Annual in arrears 7 ,, 1 Rs 8 as
Six monthly.........3 .............. 8 as
Single copy .............................. 4 as

Advertisement
Below 10 lines...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI AKOLA MONDAY 8 SEPTEMBER 1902 NO 25

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख ८ माहे सप्तंबर सन १९०२ इ० अंक २५

ॐनमः श्री गणेशाय

आर्यवनौषधालय—मुर्डी ता० दापोली आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शेंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिवाद्विवर्धक, अशा सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारांवर त्या अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मासंबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूल, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातु व रक्त यांची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ट० ८६ आणे पडेल. अनुपान खर्डी सोबत. रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील. दरः—

३१ गो० १ रु०; ७५ गो० २ रु० ११५ गो० ३ रु० १६५ गो० ४ रु०; २७५ गो० ६ रु०; ५५० गो० १०रुपये.

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूंचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं. टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना— अलीकडे २।३ वर्षे आंजरलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून [illegible] करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूंस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरीं शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचींच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावीं.

पत्ता—कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी.

### पत्रव्यवहार

वर्तमानपत्रांत कोणाबद्दल कांहीं लेख प्रसिद्ध झाला तर त्यानें स्वस्थ न बसतां, तो लेख प्रतिकूल असल्यास व आपल्या जवळ तसें साधन असल्यास, दुराग्रहास न पडतां प्रतिकूल मत खोडून टाकण्याचा सरळ मनानें यत्न करावा व तो लेख अनुकूल असल्यास लेखकाचे आभार मानावें असा स्वाभाविक प्रघात आहे. त्यास अनुसरून दोन ओळी लिहितों.

ज्यांच्या संबंधानें सत्यनिरूपण केलें असेल त्यानें तें अप्रिय असलें तरी सत्यप्रियता धरून विषाद मानूं नये हें उचित् आहे. गेल्या २१ च्या शुद्धवऱ्हाडी पत्रांत लायब्ररींतील तिसऱ्या व्याख्यानाची हकीकत दिली आहे. व शेवटीं दोन वृद्ध गृहस्थांस सूचना केली आहे. त्या दोन गृहस्थांपैकीं मी एक आहे.

माझ्या संबंधानें कांहीं विपरीत मजकूर लिहिल्याचें मीं ऐकिलें तेव्हां अनेक विचार मनात येऊन कांहींशी अस्वस्थता भासली. म्हणून तो मजकूर मुद्दाम जाऊन पाहिला. तेव्हां मनाला फार मोठें समाधान वाटलें. समाधान वाटण्याचें मुख्य कारण पुसाल तर सत्य निरूपण हें होय प्रकार घडला तसाच लेखकानें रेखिला आहे. लिहिण्यास असला विषय मिळाला असतां, न्यूनाधिक करण्याची, व स्वाभाविकपणें एका बाजूवर झुकण्याची मनाची प्रवृत्ति होते, परंतु प्रस्तुत लेखकानें आपल्या मनास, अन्यायानें एका बाजूवर ढळूं न देतां, न्यायाचा कांटा मोठ्या खुबीनें व कुशलतेनें समतोल राखिला हें पाहून तो लेख मला फारच पसंत पडला आहे. प्रसिद्ध झालेल्या मजकुरा विरुद्ध मला कांहीं सांगावयाचें नाहीं नेमस्तपणाचें व सत्यप्रियतेचें हें उदाहरण अनुकरणीय आहे असें म्हटल्या वाचून व मोकळ्या मनानें व प्रसिद्धपणें लिहिणाराचे आभार मानल्या वांचून राहूं नये असें वाटल्या मुळेंच हें पत्र लिहिलें आहे.

येथील श्रोतृसमाजाविषयीं विचार करितां या लेखकाहून माझें मत थोडें निराळें आहे तें मी येथें कळवितों. हा श्रोतृसमाज माझ्या अनुभवानें विशेष स्तुतिपात्र आहे असें मी म्हणतों. माझें भाषण त्यांस आवडलें नसतांहि ( आणि यात नवल नाहीं, माझें मलाच तें रुचलें नाहीं ) त्यांनीं आपल्या वृत्ति आवरून धरिल्या यांत त्यांचा उदारपणा नाहीं असें कसें म्हणावें. माझा अपमान ते सहज करूं शकते असें असून तसें करण्यास ते प्रवृत्त झाले नाहींत [illegible] धरिली तेव्हां "दुसऱ्याचा मान राखितो, तो आपला मान दुप्पट वाढवितो" हें वचन या समाजानें खरें करून दाखविलें आहे. वरील लेखकानें इतर ठिकाणचा दाखला दिला तो येथें लावितां येत नाहीं इतकेंच माझें म्हणणें.

समाजांत विद्वान, विचारी व शांत वृत्तीचे गृहस्थ होते त्यांस उद्देशून हे लिहिणें मुळींच नाहीं. परंतु अल्पवयामुळें व कमी अनुभवामुळें ज्या विद्यार्थी जनांकडून असा प्रमाद सहज घडण्याचें भय असतें त्या विद्यार्थी वर्गानेंही मनाचा निग्रह करून फार मोठी शांतता राखिली म्हणून ते प्रशंसेस पात्र आहत असें आपणासही वाटेल.

आतां उगीच बसण्याची लेखकाची सूचना आहे, तीही मला संमत आहे. माझ्या विद्वत्तेचा फायदा मंडळीस होण्या सारखा नाहीं, पण माझा फायदा व्हावा, देशबंधूंच्या हिताचे विचार सभेंत चालतात ते ऐकावे व देशहितास्तव विद्वान झटतात तें पाहून आनंद मानावा म्हणून मी सभेस जात असतों. व्याख्यानमालेस आरंभ झाल्यावर, आजारीपणामुळें, दोन आठवडे मी सभेस गेलों नाहीं. थोडें बरें वाटल्यामुळें गेलों होतों.— आतां शंका निरसनार्थ प्रसंग वशात बोलावें, नाहीं तर बोलूं नये ही सूचना मला मान्य आहे. मंडळीस नाखूष करण्या करितां नव्हे परंतु संतोषित करण्याच्या हेतूनें केलेला प्रयत्न सफल झाला नाहीं म्हणून वाईट वाटतें. असो. वरील लेखकाचे व मंडळीचे मी आभार मानितों. आपला पक्ष दुर्बळ असतां उपरोधिकपणानें व हावभावानें लिहून तो पक्ष सबळ आहे असें अप्रत्यक्ष रीतीनें सिद्ध करावें असा हेतु मीं धरिला नाहीं, व सरळ मनानें माझा दोष मीं कबूल केला आहे असें वाचकांनीं समजावें अशी प्रार्थना आहे.

आकोला
२६।८।१९०२ } आपला मित्र
वि. आ. का.

### रा. मोडकांची नॅशनॅलिटी.

नॅशनॅलिटीवर व्याख्यान देतांना रा. मोडक यांनीं फारच अकुंचितपणा दाखविला. १५ दिवस गमेत असलेलें व्याख्यान चिमुटभर शब्दांनींच श्रोत्यांची मूक हरण करील अशी कल्पना करणें व्यर्थ होय. त्यांच्या भाषणांत एकंदर तीन मुद्दे दिसले. "एकछत्री राज्य, एक धर्म आणि एक भाषा इतकी त्रयी असली म्हणजे नॅशनालिटीची स्फूर्ती ( राष्ट्रीयत्वाची ) अंगीं संचरलीच असें समजावें असें ते म्हणाले. पहिली गोष्ट सोडून देऊन बाकीच्या दोन गोष्टी विषयीं विचार करूं. हिंदुस्थानांत कित्येक दीड शतक मराठेशाहीनेंही गोंधळ घातला व हल्ली आंग्लभूपतीचा ही पूर्ण ताबा आहे, तथापि हिंदुस्थानांत इतिहास निर्माण झाल्या दिवसापासून पासून पाहिलें तरी एकच धर्माची स्थापना झालेली होती काय? व एकच भाषा सार्वत्रिक होती काय? या गोष्टींचा विचार रा. मोडक यांच्या ध्यानांत आला नाहीं. रा. रानड्यांची डिक्सनरी सर्व लोकांनीं रा. मोडकांच्या आग्रहास्तव विकत घेतली नाहीं म्हणजे ही नॅशनालिटी गुंज मासाभर संचारूं लागेल असें रा. मोडक म्हणतात तें कसें? नॅशनालिटीचा आणि रा. रानड्यांच्या डिक्सनरीचा काय बादरायण संबंध आहे तो रा. मोडकानाच ठाऊक. हिंदुस्थानांत एक भाषा होण्यास रा. रानड्यांची डिक्सनरी घेतली व न घेतली तरी तितकाच उपयोग. धर्मा बद्दलही तेंच आहे, हल्लीं हिंदुस्थानांत प्रचलित असलेले धर्म एक करण्याचा प्रयत्न करणें म्हणजे समुद्रास झांकण घालण्याच्या प्रयत्ना इतकेंच हास्यास्पद आहे. हिंदुस्थानभर सर्वांत जास्ती हिंदीचा प्रसार आहे म्हणून सर्व ठिकाणीं मुद्दाम हिंदी भाषा सुरूं करावी असें रा. मोडक म्हणतात पण तेंही चुकीचें आहे. आज येथें शतक दीड शतक इंग्रजी बादशाही चालू आहे पण कोणत्या हिंदूनीं मराठी भाषा सोडली अगर कोणत्या मुसलमानांनीं पार्शियन भाषा सोडली? गंगा जमुना नद्यांचें पाणी एकच पर्वतांतून व एकाच प्रांतांतून येतें म्हणून तें एकाच रंगाचें करण्याचें धाष्टर्य कोणी केलें आहे काय? असो.

नॅशनालिटीला एक धर्माची, एक भाषेची अगर एक राज्याची जरूरच आहे असा मुळींच भाग नाहीं. राष्ट्राचें हिताहित कशांत आहे या गोष्टीचा पूर्ण विचार करावा. सर्वांस सारख्याच रीतीनें फायद्याच्या अगर तोट्याच्या गोष्टी कोणत्या आहेत याचा विचार करून त्या वेळेस एक मत झालें म्हणजे नॅशनालिटी झाली. हल्लीची कांग्रेस सभा पहा. निरनिराळ्या धर्मांचे, मतांचे, आणि भाषांचे लोक राष्ट्राच्या हितानहिताच्या गोष्टींचा खल करण्या साठीं एका विचारानें एक ठिकाणीं जमतात. परंतु कोणीही कोणास एकमेकांचा धर्म स्वीकारण्यास उपदेश करीत नाहीं. असो. रा. अण्णा साहेब महाजनींचे विचार फारच ध्यान्यांत ठेवण्या सारखे होते. सोपा विषय चांगला सांगणें हें मोठ्या विषया विषयीं कांहींच न समजण्यापेक्षां बरें; रा. मोडकांच्या निबंधांत कांहींही घेण्या सारखें नसलें तरी घटकाभर करमणूक झाली ही कांहीं थोडी नाहीं. आणखी एखाद वेळीं ते नीट चांगली सल्ला घेऊन निबंध लिहितील अशी आशा आहे.

ता० ३।९।०२
आकोला } 'श्रोता'

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुद्ध ७ शके १८२४

इतर प्रांताबरोबर वऱ्हाड प्रांताचीही खानेसुमारी १९०१ च्या मार्च १ ले तारखेस झाली. त्या खानेसुमारीचा तपशीलवार रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला आहे. हा रिपोर्ट आमचे सेन्सस सुपरिंटेंडंट मि. आरदेसर दिनसाजी चिनाय यांनीं लिहिला आहे. त्यांच्या रिपोर्टाची एक प्रत त्यांनीं आह्माकडे धाडली आहे तिचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों. हा रिपोर्ट अगदीं साधा आहे खरा पण यांत माहिती चांगली एकत्र केलेली आहे. या रिपोर्टांत वाङ्मयाच्या भराऱ्या दृष्टीस पडणार नाहींत किंवा तत्ववेत्त्याची चौकस दृष्टी रिपोर्टांतील आकड्यावर फिरली आहे असें दिसणार नाहीं. तथापि एकंदर रिपोर्टाची उभारणी मोठ्या काळजीनें व मेहनतीनें केलेली आहे असें दिसून येईल. लोकगणतीविषयीं माहिती अगदीं नीटनेटकी व फार पद्धतशीर दिलेली आहे. या रिपोर्टांत दोषस्थळें थोडींच आढळतील; आणि व्यवहारिक, चतुर, व अनुभवी माणसाच्या हातून निघालेला उत्कृष्ठ असा हा रिपोर्ट आहे. इतका चांगला रिपोर्ट प्रसिद्ध केल्याबद्दल आह्मी मि. आरदेसर दिनसाजी चिनाय यांचें अभिनंदन करितों.

खानेसुमारीची माहिती नानाविध असते. पुष्कळशा गोष्टी नव्यानें शिकण्यासारख्या असतात. हा रिपोर्ट इंग्रजींत आहे ह्मणून त्यांचा उपयोग बहु जनसमाजास होत नाहीं. या रिपोर्टाची मराठींत आवृत्ती कोणी काढील तर त्यांचें श्रम वृथा जातील असें आह्मांस वाटत नाहीं. या रिपोर्टांतील कांहीं ठळक ठळक गोष्टी आह्मी यथावकाश देण्याचा विचार केला आहे.

❋

गेल्या १९०१ च्या १ ले मार्च तारखेला रात्रीं जी खानेसुमारी झाली ती या प्रांताची चौथी खानेसुमारी होय. पहिली खानेसुमारी १८६७ च्या नोवेंबरच्या ७ वे तारखेस झाली. ही फक्त या प्रांता संबंधानें झाली. पुढें तेरा वर्षांनंतर ह्मणजे १८८१ च्या १७ फेब्रुवारीला दुसरी खानेसुमारी झाली. ती सर्व इंडियांतल्या खानेसुमारीच्या दिवशींच झाली. त्या नंतर दशवार्षिकी लोकसंख्या होत जावी असा ठराव दिसतो. तिसरी खानेसुमारी १८९१ च्या २६ फेब्रुवारीला झाली; आणि गुदस्ताची खानेसुमारी चौथी होय.

## क्षेत्रफळ

या प्रांताचें क्षेत्रफळ १७७०९.८२ चौरस मैल आहे. तिसऱ्या खानेसुमारीच्या वेळीं हें आठ चौरस मैलांनीं अधीक दाखविण्यांत आलें आंकडा चुकला होता आणि तो नव्या जमाबंदीच्यावेळीं दुरुस्त करण्यांत आला. वऱ्हाडा इतका लहान प्रांत इंडियांत कोणताच नाहीं. युरोपांतल्या स्विटझरलंड देशापेक्षां हा प्रांत थोडासा मोठा आहे. या क्षेत्रफळाचा विचार जिल्हे वारीनें केला तर असें आढळून येईल कीं साही जिल्ह्यांमध्यें वणी जिल्हा फार मोठा आहे. त्याचा विस्तार ३९०९.८४ चौरस मैल असून त्यामध्यें बालाघाटाच्या दक्षिण डोंगराळ भागाचा पूर्वेकडील कोपरा येतो. वाशिमची प्रतवारी दुसरी आहे. त्याचा विस्तार २९४९.२६ चौरस मैल आहे. बुलढाण्याचें क्षेत्रफळ सुमारें १५० मैलांनें कमी ह्मणजे २८०८.८१ मैल आहे. उमरावती, आकोला व इलिचपूर या तिन्ही जिल्ह्यांचीं क्षेत्रफळें अनुक्रमें २७५९.२०, २६७७.३९, व २६०५ ३२ चौरस मैल आहेत.

( अपूर्ण )

## प्रगतीचीं सुचिन्हें

कोणतीही गोष्ट होण्याला काल अनुकूल लागतो आणि तो काल प्रत्यक्ष येईपर्यंत विचाराच्या दृष्टीनें लोकांच्या प्रवृत्ती अनुकूल होण्याला व इतर साधनादि उपायें एकत्र करण्याला बराचसा काल जावा लागतो. वस्तुतः काल हा निव्वळ साक्षीभूत असतो. कर्तुम् अकर्तुम् शक्ति त्याच्या मध्यें कांहींच नसते. ही कर्तृत्वाची कला माणसाच्या हातची आहे. कार्यकर्ती मंडळी पुढें येतात तेव्हांच जनसमाज आपली संमती देतो आणि एकीकरणाच्या जोरावर कोणत्याही गोष्टीची उठावणी होत असते. हल्लीं लोकदृष्टी द्रव्योत्पादक गोष्टीकडे विशेष आहे. सांपत्तिक उन्नती करणाऱ्या उद्योगधंद्याच्या व व्यापाराच्या गोष्टी लोकांस प्रथम पसंत पडतात. औद्योगिक चळवळींमध्येंच कांहीं तरी राम आहे आणि बाकीचीं मुक्ताफळें त्याज्य आहेत असा पक्का ग्रह आपल्या राष्ट्राचा बनला आहे. आपल्या राष्ट्राचा खरा प्रापंच आधिभौतिक संपत्तीचा आहे आणि तो सुसाध्य झाला तरच आपली निभावणी प्रस्तुत कालचक्रापुढें होईल असा दृढ समज सार्वजानिक आहे. कांचनमय गोष्टी शिवाय सर्व सुधारणा फिक्या पडतात आणि औद्योगिक चळवळी खेरीज राजकीय सामाजिक वगैरे चळवळी लटक्या आहेत या विषयीं कोणाला भ्रांती राहिलेली नाहीं. ऱ्हास कालानें आमचा देश घेरला आहे आणि अशा समयीं खरा तरणोपाय आपल्या डोळ्यापुढें उभा आहे हीच गोष्ट भावी मंगल गोष्टी सुचविते. श्रीमंतीच्या शैलावरून आमचा कडेलोट झाला खरा पण या संकटमय पतनांत आमची शक्ति द्विगुणित होत आहे. आमचा चढण मार्ग आमच्या पायाला अधीक संवयीचा झाला आहे आणि आपली कोणतीही प्रगती उच्चतरच होत आहे ही आनंदाची गोष्ट होय. भावी स्थिती सुखकर होण्याचीं लक्षणें दिसूं लागलीं ह्मणजे प्रकृत कार्यमालेविषयीं मोठा उत्साह वाटतो आणि यशश्री आपल्याला संनिध संनिधशी वाटूं लागते.

❋ ❋ ❋

संध्याचा काल आधिभौतिक संपत्तीला फार अनुकूल दिसतो. आमच्या प्रांताच्या आजूबाजूला पुष्कळशा चळवळी चालूं आहेत ही विशेष गोष्ट होय. वणी जिल्ह्याला लागूनच जो चांदा जिल्ह्याचा भाग आहे तेथें लोखंडाच्या खाणी सांपडलेल्या आहेत. अशोधित लोखंड या भागाला इतकें विपूल आहे कीं हा खजिना कधींही संपणार नाहीं असा दिसतो. १८७३ पासून या गोष्टीचा खल चालू आहे, पण खरा भाग्यकाल आतां आला आहे. असें दिसतें. वणी कडील पिसगाव येथेंही पुष्कळ कोळसा आहे. या कोळशाचा पुष्कळ उपयोग होईल. कोळसा चांगला वजनदार करण्याचा शास्त्रीय प्रयोग आतां निघाले आहेत तेव्हां कसली ही मोठी भानगड नाहीं. चांदा जिल्ह्यात लोखंड संशोधित करण्याची ओबड धोबड क्रिया परिपाठांत आहे; पण तिच्या पासून किफायत फार थोडी आहे. ८ टन अशोधित लोखंड शुद्ध करण्याला १४ $\frac{1}{4}$ टन कोळसा लागतो आणि मग १ टन चांगलें लोखंड तयार होतें. अशी ही जुनी रीत झाली. हा लोखंडाचा थर एकसारखा चांदा, पिंपळगांव, गुंजवाही, देऊळगाव, व रतनपूर या गांवात सांपडेल असा अंदाजा आहे. लोखंडाच्या १०० भागांमध्यें ६७ पासून ७० भागापर्यंत शुद्ध लोखंड निघतें. हा लोखंडाचा कारखाना मुंबईचे सुप्रसिद्ध पार्शी व्यापारी मि. टाटा हे घालणार आहेत. ते १ कोट भांडवलाचा कारखाना घालण्याच्या विचारांत आहेत. येथील लोखंडाचें पोलाद इतकें उत्कृष्ठ आहे कीं सर्व पृथ्वीवर या पोलादाची प्रत पहिला लागेल. ईश्वर कृपेनें हा कारखाना लवकर सुरूं होवो !

आमच्या जिल्ह्यांतील औद्योगिक मंडळीची स्थापनाही लक्ष्यांत धरण्यासारखी आहे. ही मंडळी कुमार श्री हरभामजी रावाजी यांच्या आश्रयाखालीं निघालेली आहे. भाडवलाच्या उभारणीचें काम चालूं आहे. तालुक्यांतील हकिकतीवरून हें काम फार जोरानें चाललें आहे हें कळविण्यात मोठा आनंद वाटतो. ही मंडळी लवकरच आपल्या संकल्पित उद्योगाला लागावी अशी आमची मोठी इच्छा आहे. वर्गणी जमण्याचीं चिन्हें चांगलीं दिसतात. प्रत्यक्ष कार्यभाळा सुरू होईल तेव्हां लोकांस विशेष विश्वास वाटेल. तूर्त कागदी घोडे नाचतात पण ते लोकांच्या दृष्टीला कुचकामाचे वाटतात. या कामीं आमचे श्रीमंत कुमार साहेब फिरफिरून उठावणी देतील तेव्हांच अशा मंडळीचे हेतु फलप्रद होत असतात.

तिसरी नजीकची गोष्ट ह्मणजे आमच्या शहरची होय. येथील नेटीव काटन जिनिंग, प्रेसिंग व स्पिनिंग कंपनीनें २५०० चात्या आणवून सुताचा कारखाना घालण्याचा विचार केला आहे. इमारतीच्या कामाला सुरुवात केली आहे. कापड विणण्याचे हातमागही येथें ३२ घालण्यांत येतील. सूत काढण्याचा व कापड विणण्याचा कारखाना नवीन निघत आहे ही गोष्ट औद्योगिक कलाप्रवृद्धीचें पूर्व चिन्ह होय. आमच्या देशांत देशी कलाकौशल्याचा उदय होईल तेव्हांच अष्टविध संपदा आह्मांला प्राप्त होतील. भावी छायावृक्ष उत्कृष्ठसा मनांत दिसतो, व त्याचीं फळें पुष्पें आमच्या डोळ्यापुढें चित्ररूपानें उभीं आहेत. ईश्वर कृपेनें औद्योगिक संपत्तीची छाया, सुवास व रसास्वाद हीं आमच्या राष्ट्राला लवकर लाभोत !

सदृशं चेष्टते स्वस्याः,
प्रकृते र्ज्ञानवानपि ॥
प्रकृतिं यान्ति भूतानि
निग्रहः किं करिष्यति ॥

( रावसाहेब शेवडे यांचें व्याख्यान )

नंबर ४

कवि भर्तृहरि यांच्या नीतिशतकांत स्वभाव वर्णनाचे पुष्कळ श्लोक आहेत. त्यांतील कित्येक हे :—

१ निन्दन्तु नीति निपुणा यदिवा स्तुवन्तु इ.
२ वांछा सज्जन संगमे इ.
३ स्वल्पं स्नायु वसा-वशेष मलिन इ.

या व इतर अनेक श्लोकात साधु, नीच, थोर मनाचे, हलकट मनाचे इत्यादि पुरुषांच्या स्वभावाचें वर्णन असें केलें आहे कीं, ते स्वभावाप्रमाणें वागतात; त्याहून अन्य रीतीनें वागणें त्यांच्या हातून होत नाहीं. स्वभाव आणि प्रकृति ही एकच. भर्तृहरीनें जरी शब्दांनीं स्पष्ट बोलून दाखविलें नाहीं तरी त्याच्याही लिहिण्याचा अभिप्राय हाच आहे कीं, प्रकृतिपुढें ज्ञानाचें किंवा विवेकाचें कांहीं चालत नाहीं.

ज्यांची प्रकृति त्यांच्या काबूत नाहीं, व ज्यांचे निश्चय तडीला जात नसतील, अशा पुष्कळ लोकांस हें वरील प्रतिपादन सहज मान्य होईल. परंतु पूर्व सुकृतानें सत्वगुण प्रधान असल्यामुळें ज्यांच्या हातून अधर्माचरण होत नसेल, असे जे शेंकडा एक दोन या प्रमाणांतले फार थोडे लोक, त्यांस या वचना विषयीं शंका वाटेल. कारण त्यांना फारसा मनोनिग्रह करावा लागत नसेल, व लागल्यास तो तडीस जात असेल. तशात अंगी विद्वत्ताही असल्यास त्यांस अहंकारानें असें वाटण्याचा संभव आहे कीं, 'निग्रहः किं करिष्यति' हें वचन खोटें आहे. अशा लोकांस "कालेमें अच्छा खाना, नाहि मिलता है, तो लोग् वो खिचडी क्यौं नही खाते" असें ह्मणणाऱ्या प्रसिद्ध बादशाची उपमा योग्य आहे. कारण पूर्व जन्माचें दुष्ट संस्कार अंतःकरणांत दृढ असल्यामुळें ज्यांच्या हातून अधमाचरणें घडतात असे जे हजारों अविद्वान् आणि शेंकडों विद्वान लोक त्या संबंधानें हे विद्वान् व सदाचरणी लोक, अहंकारानें, मोठें आश्चर्य प्रगट करितात. त्यांना असें वाटतें कीं आपण विद्वान् आहों ह्मणून आपल्याला निग्रह करिता येतो. पण हें त्यांच्या लक्षांत येत नाहीं कीं, अंतःकरणवृत्तीच अनुकूल आहेत ह्मणून आपलें सदाचरण व निग्रह हे संभवतात.

अशा सत्वगुणप्रधान ज्ञानी पुरुषांस अंतःकरणाच्या दुष्ट प्रवृत्तीचा प्रभाव काय असतो हें माहित नसतें ह्मणून तशा प्रवृत्तीच्या लोकां विषयीं ते आश्चर्य करितात आणि त्यांस निंदितात. या दुसऱ्यांना आपल्या प्रवृत्ती विरुद्ध जसें वागतां येत नाहीं तसें पहिल्यांनाही त्यांच्या प्रवृत्ती विरुद्ध वागतां येणार नाहीं. जन्मा पासून जो सज्जन आहे, त्यास जर आपल्या नोकराला

किंवा दुसऱ्या कोणाला संतापून अद्वातद्वा शिव्या देण्यास सांगितलें किंवा वारस्त्रीगमन किंवा परदाराभिगमन करण्यास सांगितलें तर त्याला मरण पतकरेल परंतु आपल्या प्रकृती विरुद्ध वागणें पुरवणार नाहीं. पतिव्रता स्त्रियांच्या अशा गोष्टी आहेत कीं त्यांना मरण पतकरलें परंतु परपुरुषस्पर्श पतकरला नाहीं. सत्वशील मनोवृत्तीच्या स्त्रीपुरुषांस जसें आपल्या प्रकृतीविरुद्ध वागणें होत नाहीं त्याप्रमाणें रजोगुणात्मक आणि तमोगुणात्मक (किंवा एका शद्वानें दुष्ट) ज्यांच्या अंतःकरणवृत्ती आहेत त्यांनाही त्यांच्या प्रकृत्ति विरुद्ध वागणें दुष्कर होतें एकास हंसण्याचा व दुसऱ्याची तारीफ करण्याचा व्यवहार आहे. परंतु हें सर्व स्वभावा प्रमाणें होत असतें. जो स्वभाव ओळ तो दळूंळू हाकणें मात्र तारीफीची गोष्ट आहे.

जो तो आपल्या शक्तीप्रमाणें निग्रह करित असतो. परंतु हतवीर्य होऊन, इंद्रिय वृत्तींच्या प्रेरणेस बळी पडतो हें या बिचाऱ्यास कळत नाहीं. येथें कोणी असा प्रश्न करील कीं, प्रकृतीशीं झगडण्याचा आपल्या परी प्रत्येक जण निग्रह करितो असें आपण ह्मणतां, परंतु जरी निग्रह तडीस जात नसला तरी निग्रह करणारे असे थोडे असतील. होय. पण निग्रह करण्यासही प्रकृतीची कांहीं अनुकूलता पाहिजे. अज्ञान आणि प्रकृति यांचा ज्यांचावर तडाक्याचा अंमल असेल त्यांच्या हातून निग्रह तरी काय व्हावा!

( अपूर्ण )

# The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 8 1902

We are obliged to the Government of India for the great practical measure which they propose to take in the matter of improving the agriculture of this vast empire. We are going to have a Board of Scientific Advice as the first out—come of a number of other improvements which are at present before the Government. The constitution of such a Board will be a great help to fascilitate the scientific researches in the different departments of meteorlogy, geology, botany, forest survey, agriculture, and bacteriology. It will promote a concerted action on the part of the Board. The practical experiments will be centralized in furthering the general scientific work in India. It is a matter of great pleasure that, agriculture has engaged the prominent attention of the Goverument. Agriculture is the main stay of the Indian empire and it is very necessary that its economic and industrial resources should be explored with the help of practical research. With this object in view a Board of Scientific Advice is constituted; and we wish every success to such an undertaking. A perceptible success in such a manifold task is a work of time, persistent labour and mutual help from the different departments connected with agriculture. It is no doubt a work which will require a great fund also; but since the Government have utilized the services of the present heads of the different department we think that economy has been ensured in the grertest possible measure. We are however sorry for one thing. In such a Board of Scientific Advice there is not even one individual who can truly called a son of the land. We request the Government to see their way to leave some appointments open to the Natives of distinguished and rare abilities in the various sciences. We hope that this new Board will promote the industries of the country and will also investigate its undeveloped resources. The present measure should be the first of a series of acts of royal kindness. There is the admission about the utmost importance of effecting some solid improvements in agriculture; and there is now the Board to correlate and to co-ordinate the different inquiries into the causes that affect the progress of agriculture. We are glad that the lot of an agriculturist stands the greatest chance of being promoted to prosperity. It is highly essential that in order to popularize the general results and conclusions to which this new Board will come, the reports and recommendations of this Board should be translated into the vernaculars of each province. Such a procedure will bring within the easy reach of the general public the advantages of having the scientific researches applied to the olden mode of agriculture. Let us hope that the Government of India will instruct the local governments to form separate provincial committees to act under the direct guidance of the Board for ensuring the develpment of the industrial and economic resources of the country.

---

The animalism of the West is as contagious as possible and we come to see the dowufall in our national character. The spirituality of the East has however not lost its firm hold upon the mind of the people and our hopes of future greatness depend upon the slender support of the elevation that is yet left to us as our old and ancient heritage. The difference between the West and the East lies upon the central ideal of life which is the main spring of a nation's movement. Wealth is the utopia of the West whereas moral greatness is the highest honor to which even the humblest soul can rise in the midst of the odds of poverty and the consequent miseries that result therefrom. It is not that the West does not appreciate moral greatness but it is as an adjunct of material greatness that it is held in high estimation. We do not see such a war in the East. Here moral greatness is supreme and wealth and every thing that it implies must be swept away in the triumphs of a spiritual life. The competitive and warring principles of the West count for nothing in the East where a calm and serene mind cares little for the struggle of an absorbing devotion to wealth. Poverty is our blessing because it has kept in our midst a respectful attitude towards moral greatness. Wealth is not so much attractive to an Indian mind as it is to the mind of a Western nation. The tone of the Western civilization receives a new tinge in the oriental atmosphere. Herein it passes through the stage of a moral school and is subdued and chastened in the light of the Eastern philosophy. The East receives the first beams of the rising sun and hence it is that the wave of moral greatness must go Westword to check the growth of materialism that prevails suppermost in the West. The West will teach us the lesson of acquiring the greatness of wealth and we hope that the West shall not fail to learn the best impressions of moral greatness which should be the key—stone of the national character. We quote below a few observations about the real aim of education and shall call upon our readers to read in them the great use of sticking to their old ways of living a pure moral life:—

Education fails if it does not make good citizens, for unless we have good citizens the heart of the Empire will be of stone, and will meet the fate of all the Empires of the past. Even mere material prosperity will not last unless the State is made up of good citizens. That which constitutes a nation's wealth, prosperity and greatness is not the possession of mines, or rich lands, or good harbours, or any other physical advantages, however great, but only the energy and character and enterprise of its people. But what is it that in the long run keeps a nation alive, makes it eager, zealous, adventurous, full of energy and power? The ultimate cause of national welfare is the possession of moral and spiritual ideals—a devotion to what is non—material. These are the things that quicken a nation and give it life and strength."

These are words that every Indian should remember, for they contain the principle of India's resurrection. Moral and spiritual ideals must be proclaimed, admired, & aimed at; without these India must perish; with these India must revive.

## वऱ्हाड

हवामान— आकाश साभ्र असतें. मधून मधून पाऊसाच्याही चांगल्या जोरदार सरी येतात. पिकें चांगल्या स्थितींत आहेत. सार्वजनिक आरोग्य असमाधानकारक नाहीं. प्लेगाची तुरळक वार्ता मलकापूर व खामगांव या भागांकडून एकूं येते पण माणसांच्या काळजीचा तरी काय उपयोग!

मे० रुस्तुमजी फर्दुनजी साहेब पोलिस कमिशनच्या कामासंबंधानें आकोल्यास आले आहेत. त्यांची उल्हासवृत्ती, कमिशनच्या कार्याची उभारणी, आणि इतर प्रेमळ गोष्टी ह्या सर्व मोठा आनंद देतात. मोठमोठ्या अनुभवी लोकांच्या साक्षी घेण्याच्या कामांत हे अगदीं निष्णात दिसतात.

मि० एदलजी जमशेटजी संजाना एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर वर्ग ३ यांनीं १० मे १९०२ पासून पेनशन घेतल्या कारणानें खालील प्रमाणें बदल्या देण्यांत आल्या.

| | |
|---|---|
| मि० | ए० अ० क० वर्ग |
| शेख महमद इस्मायल | ३ रा. |
| सखाराम आत्मराम अधिकारी | ४ था |
| डब्ल्यू. डी. प्रेयरो, सेकंड क्लार्क रेसिडेन्सी कचेरी | ५ वा |

१० मे १९०२ पासून मि० आरदेसर दिनसाजी विनाय हे दुसऱ्या कामाकडे आहेत तोंपर्यंत किंवा दुसरा हुकूम होईपर्यंत मि० हैदर अली व मि० जी. सुब्राय नायडू या उभयतांस अनुक्रमें ए० असि. कमिशनर वर्ग ३ व वर्ग ४ च्या बदल्या देण्यांत आल्या.

यंदा पोळ्याचा सण मोठ्या आनंदांत गेला. सध्यां श्रीमंगलमूर्तीचे वार्षिक उत्सव सर्वत्र चालू आहेत. कांहीं कांहीं ठिकाणीं आरास, दीपोत्सव, गायनादि करमणुकी कीर्तन, पुराण, अन्नसंतर्पण इत्यादिकांनीं या महोत्सवांस मोठी रमणीयता आली आहे.

रा. रा. दत्तात्रय भास्कर जयवंत, असि. मास्तर, इंग्लिश—मराठी शाळा आकोला यांचें व्याख्यान काल सायंकाळीं झालें भाषणाचा विषय 'खरा सुधारक कोण' असा होता. अध्यक्षस्थान रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं स्वीकारिलें होतें.

राजश्री जयवंत यांचें संभाषण फार गोड, सुबोध व सर्वमान्य असें झालें. त्याचा मतितार्थ रा. रा. देसाई यांनीं पुन्हां आपल्या भगवद्गीतेच्या प्रक्रियेनें नीट सांगितला. शेवटीं अध्यक्षाचें भाषण अत्यंत प्रेमळ, हृदयंगम व उपदेशपर असें झालें. त्यांची ती मराठी वाणी ह्मणजे अमृताची गंगाच आहे.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००।. |
| सोनें | २४॥ |
| चांदी | ६८ |
| जवस | १४० |
| जवारी | ५०–५४ |
| गहू | १०५-१२५ |
| चण | ७०-७५ |
| मीठ | ३॥= रु. मण |
| बाजरी | ३ रु. मण |
| तूप | ८। रु. मण |
| तेल | ६॥। |
| रुई | १६६ |
| सर्की सट्टा | ६॥– |
| जवारी सट्टा | ५६॥– |
| बोजा सट्टा | ५७०= |


किं० दिवाणी दावा नंबर ५ क्लास २१ १९०२

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याजला कर्ज वसूल करण्याबद्दल सरटीफिकीट देण्याचा कायदा आक्ट नंबर ७ सन १८८९ यांतील कलम ७ अन्वयें नोटीस.

विद्यमान विश्वनाथ नारायण दांडेकर साहेब सिव्हिल जड्ज आकोले यांचे कोर्टांत.

अर्जदार— गोविंदा वल्लद आबा मानभाव वस्ती कान्हेरी तालुके आकोले

या नोटिसीनें सर्वांस कळविण्यांत येते कीं वरील अर्जदार यानें मयत बहीणाबाई मानभाविण हिचें लोकांकडेस येणें असलेले कर्ज रुपये ३४५८१२ वसूल करण्याकरितां सरटीफिकीट मिळावें ह्मणून तारीख १८ माहे आगष्ट सन १९०२ इसवी रोजीं अर्ज केला आहे व त्या अर्जाचे चौकशीची तारीख २० माहे सप्तेंबर सन १९०२ इसवी रोजीं मुक्रर केली आहे तर सदरहू दिवशीं १० वाजतां तुह्मी आपले दस्ताऐवज वगैरे मुद्दां आमचे कोर्टांत अर्जदार यानला कां सरटीफिकीट देऊं नये यांचें कारण दाखविण्याकरितां हजर व्हावें. माझे सही निशीं व कोर्टाचे शिक्यानिशीं ही नोटीस देण्यांत आली आहे.

आज तारीख ४ माहे सप्तेंबर सन १९०२

V. N. Dandekar

सिव्हील जज्ज, आकोला.


## वर्तमानसार

पुनरागमन— विलायतची सफर सफळ झाली. बादशहा एडवर्ड यांस राज्याभिषेक झाला आणि आमचे नेटीव राजे आपला मानसन्मान राखून गेल्या शनिवारीं परत आले. इजरंद? कर्नल सर प्रतापसिंह, कोल्हापूरचे छत्रपती महाराज, ग्वाल्हेरचे शिंदे, व बिकानेरचे महाराज आपल्या अमीरउमरावासह सुखानें परत आले ही आनंदाची गोष्ट होय. राज्यारोहणाच्या निमित्तानें यांस प्रत्यक्ष राजदर्शन झालें हा अपूर्व लाभ होय. अशा लाभाची आठवण ठेवून आमचे राजेरजवाडे आपलें राज्य चिरकाल करोत व प्रजाजन त्यांचे सद्गुण सदां गावोत!

इराणचे शहांचा सन्मान— श्रीमान एडवर्ड साहेबांनीं मोठा केला. त्यांस पदवी ही देण्यांत येणार आहे. शहा साहेब हल्लीं पारिस शहरीं आदरसत्कार घेत आहेत.

महोत्सव— येत्या जानेवारींत जो राज्याभिषेकाचा महोत्सव इंडियांत होणार आहे तो मोठा अपूर्व होईल असें दिसतें. जानेवारी १ ले तारखेला सर्वत्र दीपोत्सव करण्यांत येतील. गोरगरिबांस श्रीमान व उदार राजनिष्ठ पुरुषांनीं अन्नदान करावें व शाळांतील विद्यार्थी वर्गासाठीं मोठमोठ्या करमणुकाच्या गोष्टी मुद्दाम कराव्या अशी लार्ड कर्झन यांची इच्छा आहे. जानेवारी ८ तारखे पर्यंत सरकारी कचेऱ्या, आफिसें वगैरे बंद ठेवण्यात येतील. जिल्ह्यां जिल्ह्यातील मुख्य मुख्य ठिकाणीं सरकार मार्फत आनंदोत्सव करण्यांत यावे अशी विशेष शिफारस आहे.

हत्तीचें शहाणपण— क्याप्टन व्हीलर लिहितात कीं हत्ती हा जात्याच मोठा शहाणा आहे. एका नदीवर होड्यांचा लष्करी पूल बनविला होता; त्या पुलावर पैलतीराला ४८ हत्ती न्यावयाचे होते. हत्ती आपल्या सोंडेनें पुलाची मजबुती अजमावतो आणि नंतर तो आपला प्रचंड देह पुढें ढकलतो. त्याप्रमाणें ४९ हत्ती पुलावरून गेले पण तीन हत्ती पुलावर जाईनात. त्यांच्या सोंडेला पूल मजबूत वाटला नाहीं. अखेरीला ते हत्ती दांडगाई करून पाण्यांत शिरले. तेव्हां पोहून पलीकडच्या कांठाला आणावें लागलें. हत्तीचा अजमास बरोबरच दिसून आला. उपजतच त्याचें शहाणपण मोठें असतें आणि त्याची चूक झाली तरी ती सुरक्षितपणाकडे असते असा अनुभव आला आहे.

दिवेटचा उपदेश— बोअर लढाईत अपजय आला तरी जे सेनापती मानाई ठरले त्यांपैकीं डिवेट हे एक होत. लढाई संपली आणि तह झाला तेव्हां ते आपल्या लोकांस उद्देशून म्हणाले कीं मला आपण सहजीच विचाराल कीं आपण हरलों काय? तर एका शब्दांत होय हेंच उत्तर मी देतो. आपला पाडाव झाला, व आपलें निशाण खालीं पडलें. असें जमीनदोस्त होऊन मृतवत् झाल्यावर आपणास पुन्हां उठण्याची आशा नको. आपल्यावर नवीन सरकार आलें आहे. पूर्वीच्या सरकाराशीं प्रजाधर्म राखला त्यापेक्षां अधीक निष्ठेचा. प्रजाधर्म तुम्ही पाळला पाहिजे. भुकेमुळें मी शरण गेलों तरी माझ्या हातांतील बंदूक जाईपर्यंत मी लढाईला उभाच होतो. इंग्रजावर अशी गोळी झाडूं आणि तशी गा[illegible]ून तुम्ही पुष्कळ बढाया मारल्या[illegible]ळ बेतली तेव्हां एकही गोळी सोडली नाहीं व दातीं तृण धरून शरण गेला. तुम्ही आपल्या ब्रोदाला रावाल असा पुष्कळसा भरंवसा होता. पण सर्व गोष्ट व्यर्थ! आतां ही पक्की गांठ बांधून ठेवा कीं, अराजनिष्ठेचा तुम्हावर आरोप या पुढें येईल तर तुम्हांस अगोदर कैद करून तुमची चांगली खबर मीच घेईन." हा उपदेश आमच्या इंडियन लोकांनीं पूर्वीच आपल्या सत्कृतींनीं खरा करून दाखविला आहे आणि म्हणूनच आम्हाला ब्रिटिश लोकांच्या बरोबरीनें प्रजेचे हक्क मिळण्याची मोठी आशा आहे. वरील उपदेशाचें तत्वच आम्हांस 'ब्रिटिश-इंडियन' ही गोड संज्ञा देऊन इंग्लिश राष्ट्राच्या योग्यतेला पोंचविणारें आहे. असा दिवस येईल तो सुदीन खरा!

## आह्मी ते आह्मी आणि तुह्मी ते तुह्मी

(मागील अंकावरून समाप्त)

तुमच्या स्त्रिया बहुतक पुरुष बनल्या आहेत, परंतु आमचे पुरुष बहुतक स्त्रिया बनले आहेत. ह्मातारपणांत देखील तुमचा पोरपणा जात नाहीं आणि पोरपणांत देखील आमच्या अंगीं ह्मातारपण भरलेलें असतें. आह्मी विवाह करतों तारुण्यावस्था प्राप्त होण्याच्या पूर्वीं, तुह्मी विवाह करतां तारुण्यावस्था गेल्या नंतर. आह्मी पिकलेल्या झाडाखालीं उपाशी मरूं, तुह्मी रखरखीत वाळवंटांत देखील इंद्रभुवनाचें सौख्य भोगाल. तुमची गृहप्रवेशाची वेळ म्हणजे आमची वनप्रवेशाची वेळ.

तुमचें प्रथम प्रेम, नंतर विवाह. आमचा प्रथम विवाह, नंतर प्रेम. आमचा विवाह "होतो." तुह्मी विवाह "करतां." आमचा विवाह होतो तरीहि तो कायम रहातो, परंतु, तुह्मी विवाह करतां तरीहि तो मोडतो. तुमच्या स्त्रियांचें जीवन पतीशीं विरोध करण्यांत जातें, आमच्या स्त्रियांचें जीवन पतिगृहीं अवरोधांत जातें. तुह्मी स्त्रीच्या रूपाची किंमत समजतां, आह्मी गुणाला अमूल्य समजतों. तुमच्यांत पतीचें अर्थशास्त्रांत पांडित्य चाललें पाहिजे, आमच्यांत अलंकारशास्त्रांत चाललें पाहिजे.

तुह्मांला पाहिजे तें आह्मांला नको आणि आह्मांला पाहिजे तें तुह्मांला नको. तुह्मांला मिळतें तें आह्मांला मिळत नाहीं, व आह्मांला मिळतें तें तुह्मांला मिळत नाहीं. आह्मांला पाहिजे एक, तुह्मांला पाहिजे अनेक. आह्मांला एकाच्या ऐवजीं मिळतें शून्य. तुह्मांला अनेकां ऐवजीं मिळतात एकावर अनेक शून्यें. तुमची हांव युक्ति साधण्याची, आमची हांव मुक्ति साधण्याची. तुह्मांला बाह्यांग पाहिजे, आम्हांला अंतरंग पाहिजे. तुमच्यांत पुरुषांचें जीवन घराबाहेर, आमच्यांत पुरुषांचें मरण घराच्या आंत. आमचें गायन आमचीं काव्यें तुम्हाला शुद्ध विलाप वाटतात, तुमचें गायन, तुमचीं काव्यें आह्मांला शुद्ध प्रलाप वाटतात. तुमच्या विज्ञानाचा उद्देश सर्व समजलें तरी कांहीं समजलें नाहीं असें दर्शविण्याचा आहे, आमच्या ज्ञानाचा उद्देश कांहीं समजलें नाहीं तरीहि सर्व समजलें असें दाखविण्याचा आहे! परलोक म्हणजे तुमचा स्वर्ग, इहलोक म्हणजे आमचा नरक. अर्थात् परलोक तुम्हांला गम्य वाटतो, इहलोक आह्मांला त्याज्य वाटतो. तुमच्या धर्ममताप्रमाणें आत्मा अनादि नाहीं परंतु अनंत आहे, आमच्या धर्ममताप्रमाणें आत्मा अनादि आहे परंतु अनंत मात्र नाहीं—निर्वाण हा त्याचा शेवट आहे.

पूर्वीच सांगितलें आहे कीं प्राची आणि प्रतीची पृथक्. तुमचा Latitude मोठा तर आमचा Longitude मोठा. तुम्हांला इच्छा झाली तर आम्हांला जागृत ठेवाल, आम्हांला पाहिजे तर तुह्मांला निद्रिस्थ करूं. आह्मीहि चांगले आणि तुह्मीहि चांगले. परंतु तुह्मांला जे चांगलें तें आह्मांला वाईट. व आह्मांला जें चांगलें तें तुम्हांला वाईट. तेव्हा भूतकाळचे आह्मी आणि वर्तमानकाळचे तुम्ही असे दोघे एकत्र मिळून भविष्य काळाचे निर्माणकर्ते होऊं, हेंहि असंभवनीय!

मनोरंजन.

## मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल:—

कोणत्याही एका वर्षात म्हणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासुन तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.


एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १।७।०२ } J. Kinniburgh एजंट


## खरेदी करा!
## रास्कोपचीं थेट व खरीं पेटंट वॉचेस
## नकली मालास भुलून पैसे खर्चूं नका!!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस म्हणजे इंजिनियर, कॉंट्राक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व त्या बद्दलची जोखीम दारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

### रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस....................४०
१९ ,, हंटिंग....................५०

### गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ............२५०

### मेटलचें तीन वर्षें ग्यारंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेकंद कांट्यासह............२०
१९ ,, मध्यभागी सेकंद काटा असलेलें ................२२
१९ ,, हाफ् हंटिंगचें................२०
१९ ,, हंटिंगेच ....................२०
१४ ,, रिस्ट वॉच ..................२०

### इनगन्मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओपन फेस............२०
१९ ,, हंटिंग......................२०
१४ ,, रिस्टवॉच....................२०

### सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ ,, हंटिंग.........................३५
१८ व १९ ,, ओपनफेस............३०
१९ ,, सेकंद कांट्यासह ............३२
१९ ,, मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ................३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ ,, हंटिंग .....................४९

लेडीज वॉचीस १४. १८, क्यारट गोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

सी. हिनीगर आणि कंपनी,
ओरिजिनल निनीयन रास्कॉप पेटंट वॉचेसचें सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.


☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाड-समाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED ... No. 4

वर्षाची आगाऊ ५ डाकील ५१२
सहामाही " ३ " ६८
साल अखेर " ७ " १ २
किरकोळ अंकास ............................६४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........ रु०-५६
दुसरे खेपेस .... ........रु०१

Town ... ... ... 1 ...
Annual in arrears 7 " 1 Rs 8 as
Six monthly.........3 .............. 8 as
Single copy ........................... 4 as
Advertisement
elow 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per lin e...3 as

# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR


VOL XXXVI AKOLA MONDAY 15 SEPTEMBER 1902 NO 26

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख १५ माहे सप्तंबर सन १९०२ इ० अंक २६

## खरेदी करा !
## रास्कोपची थेट व खरीं
## पटेंट वॉचेस
## नकली मालास भुलून
## पैसे खर्चूं नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अगंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉंट्राक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्याच्या गुणांची प्रचीति तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखवितें अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व त्या बद्दलची जोखीम सारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

**रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें**

१९ लाईन ओपनफेस........................४०
१९ " हंटिंग..........................९०

**गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.**

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१९०
१९ " हंटिंग, नकशीचे ...........२५०

**मेटलचें तीन वर्षें ग्यारंटीचें.**

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ " सेकंद कांट्यासह............२०
१९ " मध्यभागी सेकंद काटा असलेलें ..................२२
१९ " हाफ् हंटिंगचें...............२०
१९ " हंटिंगच .....................२०
१४ " रिस्ट वॉच ....................२०

**इनगनमेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१९ लाईन ओपन फेस...............२०
१९ " हंटिंग.........................२०
१४ " रिस्टवॉच......................२०

**सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ " हंटिंग........................३५
१८ व १९ " ओपनफेस............३०
१९ " सेकंद कांट्यासह ............३२
१९ " मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ..................३५
१९ " ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ " हंटिंग ...................... ४९

लेडीज वॉचीस १४. १८, क्यारेट गोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

**सी. हिनीगर आणि कंपनी,**

ओरिजिनल निनीयन रास्कॉप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.

५ हार्नबी रोड, मुंबई.

## दीन मित्र

या सप्ताहिक पत्रास आक्टोबर पासून दुसरें वर्ष सुरू होणार. लेख चटकदार व किंमत फक्त १२ आणे ! शिवाय ट. ख. १३ आण. ता. १५ आक्टोबराचे आंत वर्गणी सोबत ३ आणे जास्त दिल्यास उत्तम संगीत नाटकाचें पुस्तक बक्षीस मिळेल. सदरील तारखेपुढें कमी किंमतीस पुस्तक मिळणार नाहीं, इकडे अवश्य लक्ष द्यावें. विशेष सवलती करितां जास्त आश्रयाची जरूर आहे; करितां वर्गणीदार होण्याची त्वरा व्हावी.

सदाशिव विश्वनाथ,
गिरगांव पोष्ट, मुंबई. मालक दीनमित्र

सदृशं चेष्टते स्वस्याः,
प्रकृते र्ज्ञानवानपि ॥
प्रकृतिं यान्ति भूतानि
निग्रहः किं करिष्यति ॥

( रावसाहेब लेवडे यांचें व्याख्यान )

नंबर ५

येथें एक सांगण्यासारखी आख्यायिका आहे, ती जातां जातां सहज सांगतों. ती आख्यायिका कित्येकांच्या ऐकण्यांत असेलच. श्रीमद् व्यासांनीं केलेला पुढील श्लोक जैमिनी ऋषींच्या ऐकण्यांत आला. हे ऋषि ज्ञानी असून तपस्वीही होते. त्यांनीं तो श्लोक जेव्हां ऐकला तेव्हां आमच्या मित्रा प्रमाणेंच Humbug ( हंबग् ) अशा अभिप्रायाचे त्यांनीं उद्गार काढले. तो श्लोक हाः—

मात्रा स्वस्रा दुहित्रा,
वा नैक शय्यासनो भवेत् ॥
बलवानिंद्रिय ग्रामो
विद्वांसमपि कर्षति ॥

श्लोकाचा अर्थ स्पष्ट आहे. आई, बहीण किंवा मुलगी यां पैकीं कोणा बरोबर ही आपण एका बिछान्यावर किंवा बैठकीवर बसूं नये. इंद्रियांचा समुदाय मोठा जोरदार असतो; तो विद्वानाला देखील खेंचून आपल्या आधीन करतो. हा श्लोक ऐकतांच ऋषि ह्मणाले " विद्वांसमपि कर्षति हे शब्द व्यासांनीं काय लिहिले ? व्यासांना कांहीं अक्कल आहे ? दिलें आपलें कांहीं तरी लिहून. ही गोष्ट श्रीमत् व्यासांच्या कानीं आली. जैमिनी ऋषि गंगेच्या कांठीं अरण्यांत एका पर्णकुटिकेंत एकटेच वास करित असत. पर्जन्य काळाच्या दिवसांत श्री० व्यास एका अति लावण्यवती स्त्रीचें रूप धारण करून रात्रींच्या पहिल्या प्रहरींच ऋषीच्या पर्णकुटिकेच्या बाहेर पावसांत भिजत उभे राहिले. ती स्त्री अगदीं झिरझिरीत पांढरें पातळ नेसली होती, केस मोकळे सुटलेले होते व दारिद्र्यामुळें अंगांत कंचुकि वगैरे कांहीं नव्हतें. धुनीच्या उजेडानें कोणी बाहेर उभें आहे असें ऋषींस दिसलें, व शब्दावरून रडत आहे असेंहि त्यांस वाटलें. त्यानीं हिंदुस्थानी भाषेंत, 'कोण आहे ' ह्मणून विचारलें. स्त्रीनें उत्तर दिलें ' मी एक गरीब अनाथ अबला आहे ' रस्ता चुकून इकडे आलें, व थंडीनें कुडकुडून मरत आहें. ऋषि ह्मणाले, बाई, आंत येऊन ओसरीवर बस. बाई अलीकडे आली तेव्हां, विस्तवाचा प्रकाश तिच्या तोंडावर पडल्यामुळें तिच्या मोहक चेहऱ्यावर त्यांची दृष्टि पडली. तेव्हां, थोड्या वेळानें ऋषि तिला ह्मणाले, बाई तुला थंडी फार वाजत असेल तर, पाहिजे असल्यास धुणी पाशीं येऊन बस. बाई धुणी पाशीं येऊन बसली तेव्हां तिचें नखशिखांत शरीर त्यांच्या दृष्टीस पडून किंचित् चलबिचल झालेल्या अंतःकरणांत हळू हळू क्षोभ होण्यास सुरुवात झाली. ऋषि सर्व रात्रभर बसूनच होते, कारण एरवीं तरी त्यांची झोंप फारच अल्प असे. बाईही सर्व रात्र बसूनच राहिली. सर्व रात्रींत त्यांचें परस्पराशीं भाषण झालें नाहीं, तथापि ऋषींची दृष्टि तिच्या शरीराकडे वारंवार जाऊन त्यांचें अंतःकरण पूर्ण क्षोभाला पावलें. तरी ते महातपस्वी होते. यामुळें विवेकाच्या बळानें त्यानीं त्या क्षोभाचा निग्रह केला होता. पहाटेस पांच वाजण्याच्या सुमारास ऋषींची स्नानाची वेळ झाली तेव्हां ' मी स्नानाला जातों ' असें सांगून ते बाहेर पडले. बाईनें ह्मटलें, मी ही स्नानाला येतें. ऋषि ह्मणाले तुझी मर्जी असेल तर चल. उभयतां गंगेवर गेलीं आणि शौच मुखमार्जन झाल्यावर स्नानार्थ गंगेंत शिरलीं. उभयतांनीं ही बुड्या मारल्या. बाई ऋषींपासून दोन चार हातांवर दूर होती. त्यावेळीं चांगलें उजाडलें होतें. बाईच्या शरीराकडे ऋषींची दृष्टि जातांच ऋषींचा काम अनावर होऊन त्यांनीं एकदम जाऊन बाईला आलिंगिलें, आणि कांहीं वेळ तसेच राहिले. डोळे उघडून पाहतात तों आपण श्री. व्यासांस आलिंगिलें आहे असें पाहून ऋषि खजील झाले आणि ' विद्वांसमपि कर्षति ' हे आपले शब्द सर्वथैव खरे आहेत; मी त्यांस दोष दिला ही माझी चूक झाली असें ह्मणून त्यांनीं श्री. व्यासांचे पाय धरिले ऋषि सहज पाठवळतांच, श्री. व्यास अंतर्धान पावले.

ही आख्यायिका ' सदृशं चेष्टते स्वस्याः' इत्यादि श्लोकाची व्याख्याच आहे, असें ह्मणण्याला हरकत नाहीं. विवेकानें जरी ज्ञानी पुरुषानें प्रकृतीचा कांहीं निग्रह केला असला. तथापि ती प्रकृति फार फार तर अव्यक्तरूपानें राहील; परंतु अनुकूल परिस्थितीच्या वेळीं पुनः कदाचित् अभिव्यक्तेला पावेल. तिची पूर्ण लीनता परमार्थ ज्ञानाच्या परमावधीवर अवलंबून राहील. जैमिनी सारख्या तपस्व्यांचाही जर निग्रह चालला नाहीं, तर जगांतले अनेक व्यवसाय करणारे जे ऐहिक ज्ञानवान् पुरुष त्यांचा निग्रह काय चालावा? असें असूनहि, निग्रह चालत नाहीं ह्मणजे काय, असें ह्मणणारे बिचारे खुशाल ह्मणोत, व इतरांस दोष देऊन त्यांची निंदा करोत.

प्रकृती पुढें ज्ञानाचें कांहीं चालत नाहीं, व चालूं नये हें दाखविण्या करितां रसायन शास्त्रांतला एक दृष्टांत घेऊं. आक्सिजन आणि नेत्रोजन यांचीं भिन्न भिन्न प्रमाणानें मिश्रणें झालीं असतां त्या मिश्रणांचे मनुष्याच्या शरिरावर भिन्न भिन्न परिणाम होतात. अमुक भाग आक्सिजन आणि अमुक भाग नेत्रोजन यांच्या मिश्रणानें अमुक वायु होतो, व तो वायु मनुष्याच्या शरिरांत गेला असतां मनुष्याला नाचायाला कुदायाला लावतो. तसेंच एक भाग आक्सिजन आणि दोन भाग नेत्रोजन यांच्या मिश्रणानें अमुक वायु होतो, व तो मनुष्याच्या शरिरांत गेला असतां त्याला खूप हंसायाला लावितो असें रसायन शास्त्रांत सांगितलें आहे. आतां आपण एक मोठा विद्वान् मनुष्य घेऊं कीं ज्याचें चालणें बोलणें मोठें संभावितपणाचें आहे, व जो वर्षांतून एखाद दुसऱ्या वेळेला

हंसतो. वरील दोन्हीं मिश्रणें वेगवेगळ्या वेळीं श्वास मार्गानें ज्याच्या शरिरांत गेलीं असतां त्याची नेहमींची वृत्ति कायम राहील, किंवा त्या वायूंच्या धर्माप्रमाणें तो चेष्टा करूं लागेल? याचें उत्तर स्पष्ट आहे. अर्थात् या वायूंच्या धर्मापुढें ज्याच्या विशाल ज्ञानाचें कांहीं चालणार नाहीं.

आतां ज्या प्रकृती विषयीं आपण आज विचार करीत आहों ती वस्तुधर्माहून भिन्न आहे, कारण ती संस्काररूप आहे. तसेंच ती बदलेल परंतु दीर्घकालीन अभ्यासानें बदलेल. मोठा ज्ञानी ह्मणेल कीं, माझ्या ज्ञानाच्या बळानें मी तिला हां हां ह्मणतां ताब्यांत आणीन तर तशी ती कधीं बदलणार नाहीं. वस्तुधर्म आणि संस्काररूप प्रकृति यांच्या मध्यें अर्थात् मोठाच फरक आहे. दहा बारा वर्षाचे आंतील भिन्न भिन्न वयांचीं लहान मुलें, ज्यांच्यांत फारसा विवेक उत्पन्न झालेला नसतो, व जीं चार चौघांत क्षणमात्र प्रकृति दाबून ठेवण्याची लबाडी अजून शिकलेलीं नसतात, ज्यांच्या ठिकाणीं प्रकृति चांगली पाहातां येईल.

(अपूर्ण)

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद शुद्ध १३ शके १८२४

## खरा सुधारक कोण

या विषयावर तारीख ७ रोजीं येथील लायब्ररींत विशेष उहापोह झाला. या विषयाचें विवेचन फार चांगल्या रीतीनें करण्यांत आलें आणि तें कळण्यापासून जनसमाजाचा मोठा फायदा होण्यासारखा आहे. या विषयावर झालेल्या मतांति न मतांचा गोषवारा देण्याचा आजचा आमचा विचार आहे. व्याख्याते रा. दत्तात्रय भास्कर जयवंत यांच्या भाषणाचा सारांश असा कीं:—

खरा सुधारक कोण, कोणास खरा सुधारक ह्मणावें हें सांगण्यापूर्वीं सुधारणा ह्मणजे काय हें सांगितलें पाहिजे मग ती करणारा तो सुधारक हें उघड आहे. तसेंच खरा सुधारक कोण हें विचारणारांस खऱ्याची व्याख्या दिल्यावर खोटा कोण अथवा खोट्याची दिल्यावर खरा कोण हें सांगण्याची गरज नाहीं. तें सहज कळेल.

सुधारणा ह्मणजे चांगलें असेल तें कायम ठेवून नवें कांहीं चांगलें असेल त्याची भर टाकणें; आणि असें करतांना सर्वांवर खरें प्रेम ठेवून सद्धेतूनें, निर्मल मनानें, खऱ्या खऱ्या कळकळीनें वर्तन करणारी, स्वार्थत्याग करण्यास तयार असणारी जी व्यक्ति तिलाच सुधारक ह्मणावयाचें. तथापि समाजाची जशी स्थिति असेल त्याप्रमाणें आणि काळाचे स्थित्यंतरामुळें कित्येक प्रसंगीं विशेष गोष्टीस अगर व्यक्तीस एक प्रकारचें महत्व येतें आणि यामुळेंच सुधारक वर्ग व पुराणप्रिय यांचा या संबंधांत बराच मतभेद दृष्टीस पडतो. सुधारक वर्गाच्या दृष्टीनें पाहतां कित्येकांच्या मतें सुधारक ह्मणून ठरलेल्या प्रत्येक व्यक्तींत उत्तम सुधारकाचे सर्व गुण आहेत असें ध्वनित होतें; उक्ति प्रमाणें कृति न होणाऱ्या, सोयीस अधिक महत्व देणाऱ्या वगैरे बऱ्या वाईट सर्व व्यक्ति सुधारक वर्गांतील कित्येक लोक सर्वगुण संपन्न समजतात. परंतु एकच व्यक्तींत सर्व गुण असणें शक्य नाहीं हें विचारी सुधारकहि कबूल करतील. तद्वतच विशेष प्रकारचें बाह्यांग असतांच ज्या व्यक्ति जनतेच्या दृष्टीनें सुधारक ह्मणून ठरतात त्यांसहि सुधारक समजणें विचारदृष्ट्या योग्य नव्हे असें खरे सुधारक किंवा विचारी पुराणप्रिय कबूल करतील. तसेंच सुधारक ह्मटला कीं लोकांच्या छळास न भिणारा, निरपेक्ष हेतूनें लोकांस झोंपेतून उठविणारा, समाजोन्नतीची चाड असणारा, समाजास जिवंत ठेवणारा, भूकंपाचे धक्के देणारा, डोळ्यांत सलणारें वर्तन करणारा, मेलेल्या देहांत चैतन्य स्फुरविण्याचें दिव्य कार्य करणारा असें जें कित्येक सुधारक वर्गांतील लोक समजत आहेत तें सर्वांशीं खरें असतें तर सुधारकांतहि असावे तितके खंबीर लोक नाहींत असे उद्गार सुधारकांनींच काढले नसते. समाज जर खरोखर निश्चेष्टप्राय पडला असतां तर त्यास उठविण्याकरतां खंबीरपणा नको आहे. तेव्हां बहुजन समाज फाजील बहकणारांस अवरोध करीत आहे व तसें कित्येक प्रसंगीं इष्ट असतें हें उघड आहे. सारांश केवळ बाह्यांगावरून, रूढ गोष्टीस दूर सारल्यामुळें अथवा स्वेच्छाचारामुळें जनतेच्या मतानें सुधारक ह्मणून मोडणाऱ्या वा अर्धवट सुधारकांच्या दृष्टीनें सुधारक ठरलेल्या व्यक्ति खरोखर सुधारक नव्हत आणि दोन्ही पक्षाकडून अतिशयोक्तीचे प्रकार होत आहेत हें दोन्ही पक्षांतील वंद्य लोकांस सहज कळेल. मात्र आज समाजाची अशी कांहीं स्थिति आहे कीं या वेळीं सुधारणेस विशेष महत्व नसून सुधारक ह्मणून मोडणाऱ्या व्यक्तीसच विशेष महत्व आहे तेव्हां अशा प्रसंगीं उक्तीनें वा लेखानें सुधारक हें नांव घेणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें आपलें वर्तन होईल तितकें चोख ठेवलें पाहिजे. दुसऱ्या पक्षांतील लोकांच्या दोषदृष्टीकडे क्षम्य दृष्टीनें पाहिलें पाहिजे— कारण पुराण प्रियांकडून सुधारक वर्गावर जे आरोप होत आहेत ते अगदींच निरर्थक नसून सुधारकांतील कित्येकांनीं तसे आरोप होण्यास चांगलाच अवकाश दिला आहे. तेव्हां कोणतीहि दिशा असो, वकीलीचा, उपदेशकाचा कोणताहि धंदा असो त्यांतील कर्तव्यें अवश्य तितकीं मनःपूर्वक केलीं पाहिजेत. आपण सुधारक ह्मणून आपण होऊनच जे उक्तीनें वा कृतीनें दाखवीत आहेत त्यांच्यांत विशेष करारीपणा पाहिजे आहे. कोणत्याहि सबबीवर माघार घेण्याचें त्यांनीं सोडून दिलें पाहिजे. आतां अनेकजण माघार घेतात याचें कारण लोकमतास टक्कर देणें वाटतें तितकें सोपें नाहीं हें उघड आहे; तथापि आज जर जनसमूह उक्तीप्रमाणें कृतीचीच अपेक्षा विशेष करीत आहे तर ज्यांस खरोखर कळकळ आहे अशा व्यक्तींनीं सत्याची आवड्यास चाड आहे, नीतीची आवड आहे, स्वतःची सोय बाजूला ठेवण्यास आपण तयार आहोंत, स्वार्थत्याग करण्यास आपली तयारी आहे, आपल्यांत खरोखर कळकळ आहे अशी दोन्ही पक्षाची खात्री केली पाहिजे. खऱ्या खऱ्या सुधारकांत लोकनिंदा वा लोकस्तुति यांबद्दल पूर्ण अनास्था दिसून आली पाहिजे. आपन्निवारण, अन्यायनिराकरण, दुःखिताबद्दल सहानुभूति, परोपकाररति व सद्धेतु यांनींच त्यांची कृति उत्तेजित झाली पाहिजे. कोणताहि सद्विचार पसंत पडला तर आचारानें उक्ति व कृति यांत मेळ दाखविला पाहिजे कारण कोणताहि विचार मनःपूर्वक पसंत पडला, त्याची खरोखर आवश्यकता मनावर ठसली तर आचार न होणेंच अशक्य आहे. असें झालें नाहीं तर ती व्यर्थ बडबड होय. तें समाजप्रेम नव्हे, ती देशोन्नति नव्हे, तें जगत्कल्याण नव्हे. ती व्यक्ति आज मित्तीस पाहिजे तसा सुधारक नव्हे. आतां अशाहि व्यक्तीबद्दल गैर समज होतील तरी आज नाहीं उद्यां तिची योग्यता कित्येकांस कळेल व नच कळली, लोकांचा रोष झाला तरी जें कांहीं करावयाचें तें सद्धेतूनें व खऱ्या खऱ्या कळकळीनें केलें ह्मणजे पुरें आहे. आयुष्य अमोल ह्मणून जितकें कांहीं करतां येईल तें सरळ पणानें केलें पाहिजे परंतु तें क्षणिक आहे तेव्हां मृत्युनंतर लोकरोषहि जाईल हेंहि मनांत बाणलें पाहिजे. परंतु कोणत्याहि सबबीवर मनोदेवतेचा वा सद्विचाराचा खून नको आहे. सुधारकांत वंद्य व्यक्ति असतील त्यांस वंद्य पुराणप्रियहि वंद्य ह्मणतील. त्यांची कधींहि अवहेलना होणार नाहीं. सुधारणा पक्षांत जीवंत राहण्याची योग्यता असेल तर तो जिवंत राहील आणि आपलेच पक्षांतील लोकांनीं दोषाविष्करण केल्यामुळें जे कांहीं सुधारक गांगरून जात आहेत त्यांच्या भीती प्रमाणें तो नाहींसा होणें अगर स्वतःचीच पाठ थोपटल्यामळें तो कायम राहणें दोन्हीहि शक्य नाहीं—वगैरे.

\+ + +

वरिष्ठ संभाषणाविषयीं अनुमती दर्शावितांना रा. रा. व्यंकटेश कृष्ण देसाई यांनीं सांगितलें कीं धर्माची ग्लानी होते तेव्हां ईश्वरी अवताराची संतमंडळी जन्मतात आणि तीच जगाला उपदेश करून धर्माची उन्नती करितात. पण असा खरा उपदेशक फार विरळा निपजतो. हल्लींचे सुधारक अशा उपदेशकाच्या योग्यतेचे नसतात. साधारणपणें सुधारक व पुराणप्रिय हे दोघेही सारख्याच स्थितींत लोळत आहेत. तुळशीदासाच्या ह्मणण्या प्रमाणें सत्यप्रिय रहा व पर स्त्री मातेसमान समजा ह्मणजे तुह्मी खरे सुधारक व्हाल. अशा सुधारणेला वैराग्य परम कोटीचें पाहिजे; आणि तें वैराग्य लंगोटी लावण्याची तयारी असल्यां शिवाय साध्य नाहीं ह्मणून सुधारक व पुराणप्रिय लोक ह्मणजे दोघेही सारखेच होत. एका खांबाला बांधलेल्या माणसानें आपल्या समोरच्या खांबाला बांधलेल्या माणसा पाशीं स्वतंत्रतेची फुशारकी मारावी तद्वत प्रकार सुधारकांचा पुराणप्रिय लोकां संबंधानें होत आहे. धर्म हा कालाकालानें बदलत असतो तेव्हां देश कालाच्या मानानें विहित जी गोष्ट तीच खरा धर्म असा अर्थ सांगून या अर्थाच्या संधानानें सर्वांनीं धर्मशील असण्याविषयीं पारखांचा सल्ला घेत जावा पण असा सुधारणेचा मार्ग क्रमतांना व्यर्थ महोपदेशकाचा आव दाखवूं नये.

× × × ×

शेवटीं अध्यक्षाच्या नात्यानें रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं उपसंहारा दाखल फार बोधपर असें भाषण केलें. त्यांच्या भाषणाचा सारांशः—

सध्यांचा काल उभयपक्षांच्या मिलाफाचा दिसतो. सुधारक एका शेलावर व जुने लोक समोरच्या शेलावर असा विरोध राहिला नाहीं. दोन्ही पक्ष आपापल्या शेलावरून खालीं उतरले आहेत. दोघेही एकमेकास चांगलेच ह्मणतात आणि परस्परांच्या भेटी एकाच मैदानांत घेत आहेत ही आनंदाची गोष्ट होय. हें मैदान ह्मणजे भावी कार्यभूमी होय. तथापि सुधारक असणें मोठेपणाचें नाहीं असें मात्र नाहीं. सुधारक चुकले तरी त्यांत कांहीं विशेष नाहीं कारण फ्रान्स, इंग्लंड, अमेरिका वगैरे सुधारलेल्या राष्ट्रांतील बडेबडे सुधारकहि चुकलेले होत.

महाराष्ट्रांतील सुधारक पक्षाची मुख्य मूर्ति ह्मणजे कैलासवासी महादेव गोविंद रानडे हे होत. ते जेव्हां चुकले ह्मणजे त्यांनीं जेव्हां पुनर्विवाह केला नाहीं तेव्हां सुधारकांनीहि त्यांस दोष दिला हें विसरतां कामा नये. त्यांचे विचार फार सोज्वळ असत. ते सामाजिक परिषदेला वऱ्हाडांत आले होते तेव्हां ते ह्मणाले कीं जनसमाजाला भूकंपाचा धक्का देण्यासाठीं मी येत नाहीं; माझ्याच विचारांवरील जंग झाडण्यासाठीं, त्यांच्यावर नवें तेज पाडण्यासाठीं, किंबहुना तुमच्या विचारांच्या विजेचा धक्का घेण्यासाठीं मी दरसाल इकडून तिकडे फेऱ्या घालीत असतो. चांगल्या सुधारकाच्या कार्याची अटकळ वरील उद्गारावरून होण्यासारखी आहे.

कालमानानें धर्म जर बदलतो तर आपलें कर्तव्यही बदललेंच पाहिजे. एखादी मोठी पुण्य मूर्ति अवतार घेई पर्यंत नवा धर्म प्रचारांत येणार नाहीं हें खरें तथापि असा पुण्यावतार होण्यापूर्वींच त्या भावी उन्नत कालाला अनुकूल अशी परिस्थिती तयार करण्याचें कर्तव्य प्रत्येकाचें आहे. गुहा, दरी किंवा सपाटी भरून काढतां काढतां जसा डोंगर तयार होतो तद्वत् समाजाची खालची जमीन वर येण्यापूर्वीं आपणांस ती पवित्र आचरणानें भरून काढली पाहिजे. गेल्या तीस वर्षांत पवित्र आचरणाचें पाऊल फार पुढें पुढें आहे त्या अर्थी ही नवीन भर चांगली पडत आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तरुणवर्गाच्या सुधारणेच्या भराऱ्या फार उंच उंच असतात. कॉलेजांत मी मोठा सुधारक होतो पण घरीं आल्या बरोबर आप्त, व इष्टमित्र इत्यादिकांच्या पुढें सुधारणा कांहीं च चालेनात. माझ्या सुधारणा पुष्कळ फिक्या पडल्या. वीस पंचवीस वर्षांपूर्वीं मी कॉलेजपुढें सुधारणेचें व्याख्यान दिलें आणि थोड्याच

वेळानें हजारों लोकांचा गोंहरभाचा मेळा पाहिला तेव्हां वाटलें कीं या इतक्या लोकांच्या वृत्ती बदलणें ह्मणजे मोठें अवाढित कार्य आहे. या विचारा बरोबरच माझा सुधारक ह्मणून सर्व अहंकार गळाला. समाजांतील कोणत्याच माणसाच्या हातीं कांहीं मोठीशी शक्ती नाहीं प्रथम वाटत असतें कीं आपणा समोर जनसमाजाचा अगदीं कोरा कागद आहे, आणि त्यावर आपणास जें वाटेल तें आपण लिहूं व तसेंच करून दाखवूं. पण हें वाटणें अगदीं चुकीचें आहे. पूर्वींची लिहिलेली ओंवी आपणास पुढें चालवावयाची आहे. आणि त्या ओवीला दोन चार शब्द यथा शक्ति जोडावे इतकीच गोष्ट आपणास कर्तव्य आहे. जनसमाज नदी प्रमाणें आहे. उगमा पासून ती आपोआपच सुटली आहे. तरी तिला अशी वळवावयाची आहे कीं कोणताच भाग जलमय होऊं न देतां युक्ती युक्तीनें तिच्या प्रवाहाचा फायदा सर्वांस होईल. समाजाच्या नदीला हें वळण सर्वोपयोगी होईल असेंच दिलें पाहिजे.

खरी गोष्ट कळल्या नंतर अहंकार आपोआपच गळतो. खरोखर आपली बुद्धिमत्ता, व इतर संपदा या पक्ष्कांक्षित होत. तरी सुद्धां आपली परिस्थिती देश कालमानाला अनुकूलशी करून घेण्यासाठीं प्रयत्न करूं नये असा कांहीं अर्थ नाहीं. वरील कामगिरी करितांना आपणास सुधारकपणा अंगीं वागविला पाहिजे. पुढील पिढीला आह्माला सुधारणेचा बोध करावयाचा आहे. पिता मद्यपी नसेल तर फारच उत्कृष्ट; पण तो मद्यपी आहे ह्मणून आपल्या मुलाला दारू न पिण्या विषयीं बोध कोणी करूं नये असें कोणीच ह्मणणार नाहीं. पुणें कोटीचे संत उपदेशाला मिळतील तेव्हां ते मिळोत परंतु तसा काल येण्यापूर्वीं आह्मी असे ठेंचकळलों आहों, असें पडलों आहो, हा आमचा अनुभव पहा इत्यादि उपदेश तरुण पिढीला आपण केलाच पाहिजे. सुधारक किंवा जुने लोक यांची संमट होत आहे ही समाधानाची गोष्ट आहे. तर परिस्थिती अनुकूळ करण्याची गोष्ट कोणी विसरूं नये.

---

# The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 15 1902

---

Human nature takes delit in grand shows and extraordary exhibitions; and it is sure toe gratified when there comes a n occasion for one of the greatest things of the century. The Coronation of the king Emperor Edward *VII* is such a grand occasion. There is going to be held an august Durbar at Delhi on the first down of the next year 1903. This Durbar is called the Delhi Coronation Durbar and is bound to be a great success of the century. Lord Curzon has thrown himself heart and soul into the grand preparations to such a unique event of the next year. The splendour and grandeur of the Durbar will hardly find a parallel in the history of the coronations that have taken place in the various nations of the world. This coronation will be back from proclaiming to the world that there shall be a day when rejoicings and merry—making will be the order of that day. Hilarity of heart and the joyous harmony will be the prominent feature of the coronation procession. An imperial function like the coronation should be a fitting occasion for gratifying the expectations about a very grand thing in India. The Durbar will be held in the oriental style and will mark a new era in the history of the British empire. It will be a noble monument to the British benevolence which has united together under one sceptre the various heterogenous nationalities. It will be an index to the great harmony that prevails throughout the length and the breadth of this vast empire.

At this stage of the day there is no room for the question about the advisability or otherwise of holding an expensive Durbar like the one at Delhi. The final decision is once for all arrived at and there is no option left for a change in the programme for the better or the worse. the Durbar at Delhi is now a matter of human certainty and it will be a matter of fact if God be gracious enough to make it so. Under these circumstances it will be futile to enter into a discussion about the vast expenditure of such a step. Any advent of economical principles now is too late and out of season. Calculating spirit at this late hour is sure to take away the real pleasure in such an august coronation. It is best for us now to forget once for all the arithmetic of expenditure and the wisdom of economy. Prudential considerations must be pushed aside when we have hit upon a function which is at once grand, noble and majestic. So the the questiŏn of expense or no expense should trouble us no more.

The Durbar at Delhi will effect what the glorious wars in the past have failed to do. Heart will be joined to heart and there shall be the display of what a great nationality is being built in the far East. This Indian nationality will be a wonder of the world and no government has succeed in the past to build up such a vast empire. The noblest achievement of the British statesmanship will be the proclamation of a unique sovereignty at the Delhi Durbar. We hail with delight such a Durbar and hope that God willing, it will be an event which the future historian will write in golden letters. Lord Curzon is bent upon doing his level best in making the Delhi Durbar the grandest event of the time. We wish him every success and before we close we quote below his eloquent appeal to the people which is sure to fill them with noble inspirations:—

"The life and vigour of a nation are summed up before the world in the person of its Sovereign. He it is who symbolises its unity, and speaks for it in the gate. Here in India, it is for the first time under the British Crown that this unity has been attained, and that the entire Continent has acknowledged a single ruler. The political force and the moral grandeur of the nation are indisputably increased by this form of cohesion, and both are raised in the estimation of the world by a demonstration of its reality. There is another point of view from which I regard such a display as having far more than a superficial value. In all our various divisions in this country—divisions of the one thing that holds us together, and subordinates the things that make for separation to the compelling force of union, is loyalty to a common head, membership of the same body politic, fellow—citizenship of the same Empire. The more we realise this, the happier will be our individual lives, and the more assured our national destinies. It is, therefore, as an act of supreme public solemnity, demonstrating to ourselves our union and to the world our strength, that I regard the Delhi ceremonial, and certainly as no mere pageant, intended to dazzle the senses for a few hours or days, and then to be forgotten. To my mind Lord Lytton, who was the first in British times to inaugurate such an Imperial Durbar as we propose to hold, though in different circumstanes and on a smaller scale, set an example characterised both by statesmanship and imagination. I have not a doubt that much good flowed from the Imperial Assemblage of January 1st, 1877; and under the blessing of Providence, I firmly believe that similar and even larger results will follow from the ceremony of January 1st, 1903."

Further on Lord Curzon justifies the expenditure on account of the Durbar by utilising it for an occasion of holding an exhibition of Indian art and manufacture. In this connection he happens to remark in his lucid style to the following effect:—

"I confidently assure the public that they will be greatly astonished at the range, the variety and the beauty of this Exhibition. Whether it is true that the old Indian arts are being killed by European competition—a charge that is frequently brought by those who do not make the smallest effort to keep them alive themselves—or whether they are perishing from this apathy, or whether India merely provides, as I suspect, an illustration of a world wide law—the fact remains that the process of extinction has not been carried nearly so far as many suppose, and that the artificers still exist in India, even in these days of commercial ideals and debauched taste, who are capable of satisfying the demand for the artistic and beautiful and rare, if such a demand there be. I cannot pretend by a single Exhibition to create; but if it already be in existence—as I cannot but think—though perhaps dormant and abashed, then we may do a good deal by an opportunity such as this to revive and stimulate it; for we shall, I hope, both advertise to the world what we are capable of turning out, and also—which is much more important—encourage the aptitudes and educate the taste of our own people."

---

## वऱ्हाड

हवामान— या आठवड्यांत थोडासा पाऊस झाला. आकाश साभ्र असतें. उष्णता विशेष होते. चार पांच दिवसांत पुन्हां पाऊस चांगला होईल असा रंग दिसतो, प्लेगाचा उपद्रव थोडा बहुत बुलढाणा जिल्ह्यांत चालूच आहे. प्लेगाच्या विस्तारा विषयीं सर्वत्र मोठी दहशत वाटते. ईश्वरच सर्वांचा वाली आहे!

रा० रा० त्रिम्बक गणेश परांजपे, एक्स्ट्रा असि. कमिशनर, यवतमाळ यांस एकाएकी सस्पेंड करण्यांत आलें आहे. खरें कारण कांहींच कळत नाहीं. यांची चाकरी पेनशनीला आली आहे. असा दारुण प्रसंग पाहून मनाला मोठा खेद होतो.

यंदा श्री मंगलमूर्तीचे उत्सव मोठें नामी झाले. मूळजी जेठाच्या कंपौंडांतील व तशीच 'आनंदाश्रमा' ची ही आरास फार उत्कृष्ट होती. मेळ्याची टूम आको-

पदें गातांना मेळ्यांतील तरुण वर्गाकडे नजर फेंकली ह्मणजे मोठा आनंद होई. परमेश्वराची आराधना फार आल्हाद देते आणि तिच्या योगानें यंदाच्या समारंभास मोठीच शोभा आली होती. ठिकठिकाणीं पानसुपाऱ्या, कीर्तनें, मंत्रजागर, पुराणें, इत्यादि मंगलकारक गोष्टींनीं विशेष रमणीयता आली होती. धर्मसंबंधीं सार्वजनिक उत्सव जितके पुष्कळ होतील तितके अवश्य पाहिजेत. या उत्सवांनीं आनंदाचा प्रसार चांगला होतो आणि मंडळीची ऐकता विशेष वाढते.

प्रांतिक पोलिस कमिटीची बैठक हल्लीं उमरावतीस आहे. आकोल्यास व्यापारी, अधिकारी, वकील, वतनदार मंडळी, इत्यादि नानाविध धंद्यांच्या लोकांच्या जबान्या घेण्यांत आल्या. मोठमोठ्या विद्वान व अनुभवी लोकांचे अभिप्राय गोळा करण्यां विषयीं मि. रुस्तुमजी साहेब व मि. सुवेल साहेब यांनीं मोठी खटपट केली आहे. आमच्या प्रांताचें लोकमत उत्कृष्ठ रीतीनें पोलिस कमिशना समोर मांडण्यांत येणार आहे ही आनंदाची गोष्ट होय.

काल सायंकाळीं येथील लायब्रींत रा० रा० व्यंकटेश कृष्ण देसाई यांनीं हल्लींचे सुधारक व हल्लींच्या सुधारणा या विषयावर फार चांगलें व्याख्यान दिलें. भाषणांतील अर्था विषयीं विपर्यास होऊन दोन चार भाषणें झालीं. तथापि उहापोह उत्कृष्ठ होत असून पुढील रविवारी याच विषयाची अंगी चर्चा होणार आहे.

---

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००। |
| सोनें | २४।= |
| चांदी | ६७ |
| जवस | १४० |
| जवारी | ४६ |
| गहूं | १२... |
| चणे | येथें |
| मीठ | ३।।– रु. |
| बाजरी | ३ रु. म. |
| तूप | ७।। रु. मण |
| तेल | ६।।= रु. मण |
| रुई | १६६ |
| सर्की सट्टा | ६।।= |
| जवारी सट्टा | ६४।।। |
| सोना सट्टा | ६४।। |

---

## वर्तमानसार

नाकदुऱ्या काढाव्या लागल्या—इंग्लंडच्या राजघराण्यांतील एका राजकन्येला इंडिया आफिसच्या दरबारास आमंत्रण केलें नव्हतें याबद्दल चौकशी करण्यासाठीं एक दासी तिनें पाठविली असतां जागा नसल्या आतां सोय व्हावयाची नाहीं, असें इंडिया आफिसच्या अधिकाऱ्यांनीं उत्तर दिलें. राजकन्येनें हें प्रकरण प्रिन्स आफ वेल्सकडे नेल्याभुळें त्यांनीं इंडिया आफिसकडे एक खरमरीत पत्र लिहिलें. तेव्हां क्षमा मागत व नाक घाशीत आपली चूक कबूल करून इंडिया आफिसांतील अधिकाऱ्यांनीं राजकन्येकडे बोलावणें, पाठविलें, परंतु ते तिनें परत केलें. इंग्लंडांतील राजघराण्यांतील थोर माणसांची ही स्थिति मग इतर ठिकाणी

## इच्छाशक्तीचे अद्भुत चमत्कार

"लर्च या नांवाचा, तेवीस वर्षाच्या वयाचा, एका कोपेनहेगच्या श्रीमान् व्यापाऱ्याचा मुलगा आहे. तो आपल्या चुलत्यास भेटण्याकरितां अस्टोपास येथें कांहीं दिवसापूर्वीं गेला असतां, थोड्याच दिवसांत यानें आपल्या इच्छाशक्तीच्या विलक्षण प्रभावानें तेथील लोकांस चकित करून सोडिलें. लोक सामान्यतः अशा गोष्टी प्रत्यक्ष पाहिल्यावाचून कधीं मानीत नाहींत, त्यांतून सदरहू गृहस्थाचे चमत्कार प्रत्यक्ष पाहिले तरी, आपण बरोबर पहातों कीं नाहीं याची भ्रांति पडते. परंतु लोकांनीं याच्या सत्यतेबद्दल अगदीं खात्री करून घेतली आहे. प्रथम त्याचा चुलता देखील विश्वास ठेवीना, परंतु पुढें त्याच्या समक्ष जो प्रयोग लर्च यानें करून दाखविला त्यावरून त्याचा संशय दूर झाला.

लर्च यानें एक लोखंडाचा बराच लांब व जड असा गज घेऊन तो भिंतीशीं झुकता उभा केला आणि स्वतः कांहीं अंतरावर बसून आपली दृष्टि त्या गजाच्या टोंकावर एकाग्र करून बसविली. कांहीं सेकंडांत तो गज हालूं लागला. पुढें थोड्या वेळांत सरळ उभा राहिला आणि या प्रमाणें क्षणभर राहून उडत उडत तो गज लर्च याच्या जवळ आला.

याप्रमाणें लर्च छत्र्या, छड्या व इतर कोणतेंही लांकूड किंवा धातूचे जिन्नस चालवूं शकतो हे प्रयोग तो निजावयास जाण्यापूर्वीं थोड्या वेळांत करितो. कारण तो सांगतो कीं, झोंप न घेतल्यास त्यास अतिशय त्रास होतो.

या अपूर्व शक्तीचा शोध त्यास पुढील रीतीनें लागला. कांहीं वर्षांमागें तो कोपनहेगेन मुक्कामीं कालेजांत जात असतांना, एके दिवशीं वर्गांतील एका मुलाशीं भांडण झालें. म्हणून खिन्न होऊन मैदानात तोंडावर हात ठेवून पायाजवळ पडलेल्या एका काठीकडे टक लावून पहात बसला होता. कांहीं वेळानें त्यास पायाजवळची काठी मागें पुढें चालत आहे असें दिसलें. परंतु आपलें मन खिन्न झालें असल्यामुळे आपल्याला अशी भ्रांति होत असेल असें वाटून त्यानें आपले डोळे चोळले व सावध झाल्यासारखें करून पुन्हा त्या काठीकडे पाहूं लागला तरी ती काठी अधिकाधिकच सचेतन दिसूं लागली, त्यावरून त्याचा संशय दूर होऊन, त्यानें ही आपल्या आंगची शक्ति अभ्यासानें वाढविली.

उंदराची वस्ती व त्यांचा संहार— असें म्हणतात कीं सर्व देशांपेक्षां जपानांत जास्त उंदीर आहेत! तेथील लोकांची लांकडाचीं घरें आणि गवताचीं छपरें हीं त्यांस उत्तम खाद्यें होतात. आपण मांजरें अगर कुत्रीं बाळगून ज्या प्रमाणें उंदीर मारवितों त्या प्रमाणें जपानांत एका जातीच्या सर्पाकडून हें काम करविलें जातें.

---


ॐनमः श्री गणेशाय

आर्यवनौषधालय—मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्याचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

## मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिवर्द्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारांवर त्या अत्यंत उपयोगीं आहेत.

याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मीसंबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियाची धुपणी, छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र याचा दाह, क्षय, पाण्डुरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टीमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातु व रक्त यांची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटा मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रु०चे आंत ८० ८६ आणे पडेल. अनुपान खर्ची सोबत. रोखानें किंवा व्ही. पी. नें खालील पत्त्यावर मिळतील. दरः—

३१ गो० १ रु०; ७५ गो० २ रु० ११५ गो० ३ रु० १६५ गो० ४ रु०; २७५ गो० ६ रु०; ५५० गो० १०रुपये.

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूंचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं. टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना— अलीकडे २।३ वर्षे आंत रेलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरीं शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचींच औषधें खालील बिनचूक सही पत्त्यावरच मागवावीं,

पत्ता—कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्यां दांताच्या आजारा शिवाय इतर हरएक प्रकारच्या दांताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दांतो मे दिखाते है हम।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम ॥




देखना चाहिये क्या मुश्क कदर करती हे।
ढूंढते फिरते हरेक किस्म कदरतां हैं हम ॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ॥-

दांतावर जाळे जमणें, ते पिवळे होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें, हले लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठिण वस्तु दांतानीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यातून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दात स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस्
आकोला.

पत्ता—
नन्दलाल वर्मा.
म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कम्पनी-
मथुरा.

---

*ADVERTISEENT*

TENDERS are invited for the Contract for the Manufacture and supply of country spirit in the area mentioned below of the Hyderabad Assigned Districts for three years [from the 1st April 1903, under the Madras Contract Distillery system which is now in force.

2. Full particulars of the conditions under which tenders may be made and under which the contract will be granted, can be obtained on application to the Inspector General of Exise, Hyderabad Assigned Districts, Amraoti Camp.

3. No tenders will be received after noon on the 3rd November 1902.

4. The contract area is supplied from the Government Distilleries at Ellichpur and Akola, and comprises the Ellichpur district, the Amraoti district, the Akola district and the Malkapur taluq of the Buldana district.

Lt. Col. WARREN HASTINGS
Inspector General of Excise
H. A. D.

## मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईलः—

कोणत्याही एका वर्षांत म्हणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन [illegible] अधिक मनुष्यांच्या नांवानें [illegible] ठेवितां येईल. व त्यांच्या [illegible]यातींत, तसें त्यांचे मागें त्यांच्या पैकीं [illegible] अथवा चेक म्हणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत [illegible] हजार रुपयापर्यंत ठेव ठेल्यीं रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १।७।०२ } J. Kinniburgh एजंट


---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. 4

सहामाही „ ३ „ ८८
साल अखेर „ ७ „ १
किरकोळ अंकास ........................६४
नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ०६
दुसरे खेपेस ........ ....८१

Town ... ... ... 1 ...
Six monthly.........3 ............... 8 a
Single copy ............................ 4 as
Advertisement
below 10 lines ....... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR


VOL XXXVI AKOLA MONDAY 22 SEPTEMBER 1902 NO 27


वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख २२ माहे सप्तंबर सन १९०२ इ० अंक २७



### खरेदी करा !
### रास्कोपचीं थेट व खरी पेटंट वॉचेस
### नकली मालास भुलून पैसे खर्चू नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. म्हणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस म्हणजे इंजिनियर, कॉन्ट्राक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आम्ही खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची रास्कोपच्या पेटंट वॉचेस संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखवितें अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व त्या बद्दलची जोखीम दारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १८ रु. १७ रु. लहान.

रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस............४०
१९ „ हंटिंग.......................५०

गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ „ हंटिंग, नकशीचे ...........२५०

मेटलचें तीन वर्षं ग्यारंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एक्स्ट्रा स्ट्रांग १८
१९ „ सेकंद कांट्यासह............१०
१९ „ मध्यभागी सेकंद काटा असलेलें ................१२
१९ „ हाफ हंटिंगचें...............१०
१९ „ हंटिंगच .....................१०
१४ „ रिस्ट वॉच ...................१०

इनॅमल्ड मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओपन फेस...........२०
१९ „ हंटिंग.........................२०
१४ „ रिस्टवॉच.....................२०

सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ...........३०
१४ „ हंटिंग.........................३५
१८ व १९ „ ओपनफेस............३०
१९ „ सेकंद कांट्यासह............३२
१९ „ मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ................३५
१९ „ ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ „ हंटिंग ......................४९

लेडीज वॉचेस १४, १८, क्यारेट गोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

सी. हिनीगर आणि कंपनी,
ओरिजिनल जिनीयन रास्कॉप पेटंट वॉचेसचें सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.



ॐनमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दपोली आमच्या खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

### मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक मनोत्साहक, कांतिवाढिवर्धक, अभ्रक सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

### गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारांवर त्या अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मासंबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुळाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टीमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातु व रक्त यांची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटा मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयाचे आंत ट० ८६ आणे पडेल. अनुपान बरोबर सोबत. रोखानें किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील. दरः—

३१ गो० १ रु०; ७५ गो० २ रु० ११५ गो० ३ रु० १६५ गो० ४ रु०; २७५ गो० ६ रु०; ५५० गो० १०रुपये.

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं. टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना— अलीकडे २।३। वर्षें आंग्रेल वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरीं शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचींच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावीं,

पत्ता—कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी.


### नोटीस

कासीराम लक्ष्मणदास मारवाडी साहू दुकान उकळी तालुके आकोट जिल्हे आकोला यासः—

खालीं सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येते कीं आम्ही तुम्हास स्थावर मालाचीं तारेगहाणखतें रजीष्टर करून दिलीं आहेत. ती रकम आम्हांस देणे होती म्हणून त्या रुपयांत आम्ही तुम्हांस मुद्दल रुपये दिले. फक्त व्याजाचे रुपयाचा कांहीं भाग देणे राहिला आहे. म्हणून आम्ही तुमचे येथें येऊन व्याजाचे रुपये हिशेब करून देण्यास तयार होतो परंतु तुम्ही व्याजाचे रुपयाचा कटमित्ती व्याजाचा हिशेब केला नाहीं व रकम घेऊन आलों असतां घेतली नाहीं त्याजबद्दल तुम्हास पुष्कळ वेळां हिशेब करण्याकरितां व रकम घेण्याकरितां म्हटले असून तुम्ही हिशेब ही केला नाहीं व रकम घेऊन आमचे सर्व दस्तांऐवज पावतीसह काढून दिले नाहींत आणि तुम्ही लबाडीनें आमच्यावर दिवाणी कोर्टांत एक दावा आणला आहे. त्या दाव्यांतील दस्तांऐवजांतील लिहिल्या प्रमाणें पूर्ण भरणा मजला पोहचला नाहीं असें असून तुम्ही फिर्याद केली याजबदल मी कोर्ट खर्च व भरण्यांतील राहिलेली रकम याचा जबाबदार नाहीं. तुम्ही मजला सांगितले होतें कीं १६०० सोळाशें रुपये आणून दे म्हणजे सर्व तुझे तारेगहाणाचे दस्तांऐवज व आज तारखे पावेतो जी देवघेव झाली त्याजबद्दल चुकतीं पावती मी तुमला देतो. मी म्हटलं कीं इतकी रकम तुमची निघत नाहीं. सरासरी रुपये बाराशेंतेरासे निघतील ते मी देण्यास तयार असून तुम्ही घेतले नाहींत करितां कळविण्यांत येते कीं हल्लीं आम्ही तारीख १।८।०२ इसवी रोजीं तुमचे येथें तारेगहाणखतांत दिलेले शेतांतील मौजे पळसोद तालुके आकोट येथील शेत

| सर्वे नंबर | एकर | आकार |
|---|---|---|
| ३६ | २५-१५ | ४३ |
| ३७ | ८।१८ | १४ |

ही जमीन आम्ही माहाराज सोनाजी पुंजाजी साधुबोवा जऊळकेकर यांस विकून फरोक्त करून ताब्यांत दिली आहे. तर तुम्ही नोटीस पावले पासून आठ दिवसाचे आंत आमचे सर्व तारेगहाणाचे दस्तांऐवज व चुकते आदाईची पावती देऊन रकम घेऊन जावी. असें न केल्यास तुमचे रकमेचे व्याजाचा जबाबदार मी राहणार नाहीं. असें न केल्यास गहाण सोडण्याबद्दल योग्य कोर्टांत दावा आणून खर्चासुद्धां रकम तुमचे जवळून भरून घेतली जाईल. कळावें तारीख १६।९।०२ इसवी. दस्तुर— सिताराम चंद्रभानजी तराळे राहणार पाटसूल तालुके आकोट दस्तुर खुद्द.

सही

गणु वल्लद चंद्रभान वाकोडे राहणार टाकळी खुर्द प्रगणें दहिहंडा ता. आकोट निशाणी हातची रेघ केली असे.

वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद वद्य ९ शके १८२४

## पवित्र गोमय

आपचें पवित्र गोमय मोठ्या जीवित संशयांत पडलें आहे. कारण त्याच्या गुणधर्मा विषयीं मोठाच मतभेद उद्भवला आहे. जुनीं मतें व्यवहाराला अनुसरून आहेत. व्यवहारांत घरोंवर शेणा-चा उपयोग सदासंमार्जनाकडे, घाण घाल-विण्यासाठीं सारवणाकडे व अशाच स्वच्छता राखण्याच्या कामाकडे करीत असतात. शेणाचा उपयोग फारच प्राचीन काला पासून चालत आलेला आहे. ह्याच्या उपयोगा विषयीं मतभेद असेल असें आह्मांस वाटलें नव्हतें. परंतु अलिकडे युरोपिअन मताच्या मंडळीला शेण हा पदार्थ अगदीं टाकाऊ वाटत चालला आहे. शतकाचीं शतकें लोकव्यवहार शेणाच्या उपयोगा-विषयीं साक्ष देत आहे. असा बळकट पुरावा फेंकून द्यावा आणि अनुभवाला एकदम तिलांजली द्यावी असा कांहीं लोकांचा आ-ग्रह दिसतो. शेणाचा तिरस्कार व त्याग करण्याचे विचार अलिकडे तीन चार वर्षां पासुन आमच्या येथील कांहीं प्रतिष्ठित मंडळींच्या डोक्यांत खेळत आहत. रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं दोन तीन वर्षांपूर्वी असाच विचार प्रदर्शित केला होता. विसाव्या शतकांत विचार स्वातंत्र्य फार मोठें आहे. विचारांतील वैचित्र्याच्या दृष्टीनें कोणताही विचार मनाला नकोसा नसतो. किंबहुना आपल्या विचाराचा मनसोक्त अनुभव स्वता पुरता घेऊन पाहिला तरी कोणाची मनाई नाहीं. परंतु या शेणा विषयींच्या नव्या मताला मोठाच जोर येत चालला आहे. त्या मताचा अधिकार अम-र्याद वाटत चालला आहे आणि त्या मताला वेळेवरच आगारून देण्यांत आलें नाहीं तर मोठा अनर्थ होण्याचा संभव आहे, नवीन मता ची प्राणप्रतिष्ठा वऱ्हाडच्या सानिटरी कमिशनर साहेबांकडून होत आहे आणि त्यांचा अभिप्राय सरासरीचा असा दिसतो कीं शेणाचा उपयोग गृहादिक सारवणाकडे करूं नये.

सानिटरी कमिशनरच्या अभिप्रायानें न-वीन मताला विलक्षण बळकटी आली आहे इतकेंच नाहीं तर या मताला नवीन अधि-कारही मिळाले आहेत. प्लेगाच्या प्रतिबंधाचे जे उपाय योजण्यांत येत आहेत त्यांत शे-णाला अजिबात रजा देण्याचा संकल्प ठर-लेला आहे. आमच्या शहरांतील स्वच्छता सुधारण्या विषयीं कांहीं साधारण नियम सानिटरी कमिशनर साहेबांनीं घालून दिले आहेत. ह्या नियमांची अमलबारी यथायोग्य होण्या विषयीं आमचे मुनिसिपल व्हाइस चेअरमन रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं त्या नियमांना धरून हुकूम सोडले आहेत आणि प्लेगाचा शिरकाव होऊं द्यावयाचाच नाहीं असा आमच्या मुनिसिपल अधिकाऱ्यांचा कृत संकल्प आहे. घरामध्यें कचरा, घाण, चिंध्या, शेण वगैरे राहूं देऊं नये, घरांत पाणी किंवा घाणेरडीं डबकीं सांचूं देऊं नयेत, पायखाने स्वच्छ ठेववांत, पाणी भरण्याच्या जागीं घाण होऊं देऊं नये, बरोबर हवा व उजेड हीं खेळतीं राह तील अशी व्यवस्था करण्या विषयीं उपदेश करावा इत्यादि सर्व साधारण स्वच्छतेचे व सफाईचे नियम घालून देण्यांत आले आहेत आणि आह्मांस पक्की उमेद आहे कीं या नियमांच्या चांगुलपणा विषयीं मतभेद असण्याचा संभवच नाहीं. हे नियम बाराही महिने सदोदित पाळण्या सारखे आहेत. स्वच्छता कोणाला प्रिय नसते बरें! स्वच्छता नेहमींच आवश्यक असून आयु-ष्याची वृद्धी करून आल्हाद देणारी आहे. तेव्हां ती प्लेगाला प्रतिरोधक होईल यांत कांहीं संशय नाहीं.

परंतु वरील उत्तम नियमा शिवाय आणखी एक नियम असा आहे कीं "शेण हा शारीरिक ( organic ) पदार्थ असून रोग उत्पन्न करणाऱ्या सर्व जातींच्या कि-ड्यांची उत्पत्ति होण्यास अतिशय अनुकूळ असल्यामुळें शेणानें घर न सारवितां पांढऱ्या मातीनें वर सारविंजे."— हा नियम लो-कांच्या समजुती विरुद्ध आहे. फार प्राचीन काळापासून शेण उपयोगांत आहे; आणि अनुभवानें असाच सिद्धांत ठरला आहे कीं शेणाच्या लेपनानें घाण नाहींशी होते, स्वच्छता येते आणि शेणानें सारवलेली जमीन किंवा भित डोळ्याला देखील सुंदर दिसते. पण या तत्वा विरुद्ध तत्व सानिटरी कमिशनर वरील नियमांत प्रतिपादित आहेत. हें सरकारी मत ग्रहण करण्यापूर्वी आह्मी सानिटरी कमिशनर साहेबांस असें विचारतों कीं ह्यांनीं शेणाचें पृथक्करण करून पाहिलें आहे काय? जर शेणाचें पृथक्करण त्यांनीं केलें असेल तर त्याचे गुणदोष कोणकोणते त्यांच्या पाहण्यांत आले. ह्या दोन्ही गोष्टींचा खात्री लायक खुलासा केल्या शिवाय एवढा मोठा जनसमूह त्यांच्या नुसत्या आवडत्या मता चा स्वीकार करणार नाहीं. प्लेगाचा व शेणाचा कांहीं अर्थाअर्थी संबंध आहे अशा विषयीं देखील आह्मी कोणा सुज्ञ डाक्टरांचा अभि-प्राय आजपर्यंत ऐकिलेला नाहीं. पण तसाच कांहीं विपरित परिणाम दृष्टीस पडेल ( व तो तसा दृष्टीस पडणार नाहीं अशी आमची खात्री आहे ) तर मात्र सर्व लोक शेणास अवश्य फेंकून देतील.

हल्लीं शेणाचा निरुपयोगी व्यवहार सोडून देण्याला जें मुख्य कारण पुढे केलें आहे तें फारच लंगडें दिसत आहे. रोगकारक किड्यांच्या उत्पत्तीचा उत्तम शेणाशीं संबंध कसा जुळतो हें आह्मांस कळत नाहीं. रोग कारक किडे अमूक अमूकच आहेत अशा विषयींहि अजून शोध पुरा झालेला नाहीं. जे किडे शेणांत आढळतील ते किडे मांसातही पण आढळतील. मास शिळें झालें ह्मणजे शिळ्या शेणा प्रमाणें किंबहुना त्यास ज्यास्तच दुर्गंधी येते. शेणाचा वाईटपणा ह्याच्या शिळेपणां-तच असतो आणि त्याला अशी कांहीं दुर्गंधी येऊं लागते तेव्हां तें शेण उपयोगांत लोक आणीत नसतात हेंहि मशहूर आहे. शेणा-मध्यें एका प्रकारचा मोठा चिकटपणा आहे. ह्याचा उपयोग लुकणा प्रमाणें होतो. त्याच्या संस्पर्शानें स्वच्छता येते. शेणामध्यें गाई म्हशींच्या शेणाचा समावेश होतो; आणि गाईम्हशी मध्यें बैलाचा व रेड्याचा समावेश होतो. म्हशीच्या शेणा पेक्षां गाईचें शेण उत्तम मानलेलें आहे. गोमयाचें स्नान श्राव-णीच्या पर्वणीला अवश्य करावें लागतें. गोमयाच्या स्नानानें अंगाला स्वच्छता येऊन चांगली कांती येते. स्नानाच्या संबंधांत गोमयाचा उपयोग बहुतेक लोपला आहे पण ती गोष्ट पुन्हां प्रचारांत आणण्याचा हाच काल आहे असें आह्मांस वाटतें. गोमयानें शुद्धी येते. ही शुद्धी ह्मणजे अशी कीं शरी-रांतील वाईट द्रव्यें शोषून घेतलीं जातात आणि रक्ताभिसरणाला फार जोर येतो. खरूज वगैरे झाली असतां हाताला शेण लावून लहानपणीं पुष्कळ मंडळी बसलीहि असेल. तेव्हां म्हशीच्या शेणाचा उपयोग वैद्य कसा करितात हें विसरतां कामा नये. शेणकाल्यांत नवीं वस्त्रें चांगलीं भिजवून नंतर तीं धुतलीं ह्मणजे पोताला चांगलीं निघून अती स्वच्छ निघत असतात, हा अनुभवही पुष्कळांस असेल. उष्टीखरकटी काढण्याला आणि स्वच्छता करण्याला शेणाचा उपयोग दररोज बरोबर होत असतो घर शेणनें सारवूं नये हें ह्मणणें मोठें चुकीचें आह. सानिटरी कमिशनर साहेबांनीं शेणाचा वाईटपणा सिद्ध करून दिला पाहिजे. शा-स्त्रोक्त मार्गानें त्यांनीं आपली गोष्ट सिद्ध केली नाहीं तर त्यांच्या ह्मणण्याला कोणीच मान देणार नाहीं. शेण ओलेपणीं जसें उपयोगी तसें वाळल्या नंतरही उपयोगी असतें. ह्याच्या शेणींचा विस्तव किती टिकाऊ व प्रखर असतो हें इंद्रियांतील लोकांस कोणी सांगावयाला नको. शेणाचें खत फार उत्कृष्ट असतें हें सर्व शेतकरी कबूल करितील. आह्मास शेणाविषयीं लि-हितांना असें वाटूं लागलें आहे कीं शेणा सारखा दुसरा उपयुक्त पदार्थच नाहीं, पृथ्वीवर हा उत्सर्ग पडल्या पासून ह्याची रक्षा होईपर्यंत याचा उपयोग नानाविधं रीतीनें होतच असतो.

रोग उत्पन्न करणाऱ्या किड्याच्या उत्प त्तीला शेण फार अनुकूळ आहे असा सि-द्धान्त कागदावर लिहिल्यानें ह्याला कांहीं किंमत येत नाहीं. एका बाजूला पूर्वापार चालत आलेला प्रत्यक्ष अनुभव कोणीकडे आणि त्याच्या उलट हा कागदावरील मनसोक्त सिद्धान्त कोणीकडे! जो नवी गोष्ट सांगतो त्यानें ती सिद्ध करून दिली पाहिजे. डाक्टर लोक तरी कोणताही सिद्धान्त पुढें आणण्यापूर्वी कांहीं विचार करीत नसतील असें नाहीं परंतु आमचा अनुभव असें पक्कें सांगतो कीं येथें तरी ते चुकले आहेत; आणि त्यांच्या वेड्या सिद्धान्ताची प्रगती विचारी मनुष्यांमध्यें खास होणार नाहीं.

## उदारपणा

जेथें जेथें नवी जमाबंदी झाली तेथें तेथें नव्या दरठरोती प्रमाणें सारा वसूल करण्यांत येऊं लागला आहे. आकोला व बुलढाणा या दोन जिल्ह्यांत नवीन दर अंमलांत आले. इलिचपूर जिल्ह्यांतील दर्यापूर तालुक्यांतही नवा सारा घेण्याचा ठराव झाला आहे. दुष्काळामुळें इलिचपूर, उमरावती, मूर्तिजा-पूर, मोर्शी, वाशिम, मंगरूळ, आणि दार-व्हा या सात तालुक्यांस नवी जमाबंदी लागूं केली नव्हती ती १९०३–०४ पासून अंम-लांत येईल. चांदूर व पुसद या तालुक्यांची लोकस्थिती पाहून नंतर तेथें नवा सारा लागण्यांत येईल. यवतमाळ, केळापूर व वणी या तीन तालुक्याची जुनी जमाबंदी १९०४ मध्यें पुरी होणार आहे. ती पुरी झाल्या नंतर नव्या जमाबंदीचा विचार करण्यांत येईल.

नव्या जमाबंदी संबंधानें सरकारी अभि-प्राय असा आहे कीं नवा सारा लोकांस फारसा जड वाटत नाहीं. ओलिताच्या पिकावर सरासरीने सारा हलका केला आहे आणि इतर पिका वरील सारा वाढलेला आहे. सरकारी साऱ्याचा बोजा लोकांवर मोठासा नाहीं. नवा सारा सुखानें वसूल होतो आणि तो गोळा करण्यासाठीं कांहींच तसदीफ पडत नाहीं.

तथापि चिखली तालुका दुष्काळा पासून कांहीं मुक्त नाहीं. तेथें सारा वसूल होण्याला मोठी परकाष्ठा होते. या बाबदींत बुलढा-ण्याचे डिपुटी कमिशनर मे. रुस्तुमजी फर्दूनजी यांनीं वरिष्ट सरकारापुढें खरी लोकस्थिती मांडली. गरीब व लोकांच्या वतीनें सरकारापाशीं दाद मागितली. लोकांची बाजू त्यांनीं सरकारापुढें फार चांगल्या तऱ्हेनें मांडली. मे. रुस्तुमजी साहेबांच्या श्रमाचें सार्थक झालें आणि सरकारानें घाट, देऊळगाव राजा वगैरे भागाकडील लोकांची दुर्दशा लक्ष्यांत घेऊन नव्या जमाबंदीचा ठराव चिखली तालुक्या संबंधानें तहकूब केला आहे. नवीन दरा प्रमाणें दरसाल सरकारला २८ हजार रुपये मिळाले असते. ही रकम सरकारानीं कृपावंत होऊन तीन वर्षें पर्यंत सोडून दिली आहे. नवा सारा सोडला हा देखील सामान्य उदारपणा नाहीं. तोच वसूल केला असता तर तो रयतेला पोट बांधून द्यावा लागला असता. २८ हजारांची रकम कमी केली ही सरकारची मोठीच कृपा होय आणि या उदारपणा बद्दल लोक सरकारचे व मे. रुस्तुमजी साहेब यांचे फार आभारी आहेत. रयतेची सरकाराला दया आली हें मोठें भाग्य आहे.

## उंदीर

प्लेग संबंधानें उंदीर मोठा दुष्ट व घातुक प्राणी वाटतो. अशी समजूत होती कीं उंदीर जसजसें चलनवलन करितात तसतसा प्लेगा-चाही प्रसार होतो. उंदिरामुळे प्लेग वाढतो तेव्हां उंदीर जितके मरतील तितके चांगलें असा सार्वत्रिक समज झाला होता. आणि गुदस्ता जेव्हां उंदीर अतोनात झाले व ह्यांनीं पिकांची नासाडी केली तेव्हां उंदीर ह्मणजे मृत्यूचे मुख्य मंत्री आगाऊ आले आहेत आणि प्लेग मागून लवकरच दाखल होईल

असें वाटे. परंतु सरकारी कमिशनानें प्लेगाविषयीं जो पक्का शोध केला आहे त्या वरून असें कळतें कीं उंदीर प्लेग आणीत नाहींत किंवा नेत नाहींत. आतां एवढा अनुभव खरा कीं प्लेग आला ह्मणजे माणसापेक्षां उंदीर अगोदर मरतात. याचा अर्थ इतकाच कीं प्लेग आल्याचा इशारा उंदीर आपल्या मरणानें देतो. शहाणीं माणसें ही ध्वनित गोष्ट समजून घेतात आणि स्थलांतराचा उपाय करून पाहतात. प्लेगाला स्थलांतरासारखा दुसरा रामबाण उपाय कोणताच नाहीं.

## पाकोळी

नेपाळांतील डाक्टर गॉसिओ यांनीं असा शोध काढला आहे कीं प्लेगाचा प्रसार पाकोळी फार जलद करिते आणि तो प्रसारही मोठा जबरदस्त होतो. पाकोळीला कोणी बाळगीत नाहींत. तिच्यामध्यें कांहींच संदरपणा नाहीं. पण पाकोळी भयंकर रोग आणिते हा मात्र शोध नवीन आहे.

# The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 22 1902

We have before us a happy picture of the prosperous condition of Berar. In a recent resolution of the Local Government on the material condition of the people we are told that we are a prosperous people. We heartily wish that the picture proves to be true and faithful but the stern realities do not correspond to what is represented in the picture. The optimism of the Government fails to satisfy our critical view of the whole situation. Our matter--of--fact experience sees things in a different light. So we are not in a position to welcome the congratulations of the Government upon our growing prosperity when we have to face in every day's life a hard struggle for bread, and when we have to meet the miseries in diverse forms consequent upon the growth of pauperism in the province. The last two famines have crushed many a family to dust. The work of regenerating the down—trodden population does not lie in one or two good harvests. Our people are worsted in the fight with the hard times of the famines and their plight is now most wretched and pitiable. Two good harvests have brought food to the people, saved them from the clutches of a slow death which often appears to be the special features of normal times after a year of a bad famine. The hard days have worked out a cruel revolution in the social condition of the people. That well-to-do middle class of the society has altogether disappeared. It constitutes in fact the main strength of the population. but when once this integral strength is undermined and the society is divided into two main portions the rich and the poor. There is a total fall in the numbers that once formed the great strength of the middle—class, the intervening link between the two classes. This middle portion, the very heart of our society, is weakened to destruction. We feel much grieved that we are not prepared to admit the correctness of the views of the Government in this connection.

Berar is purely agricultural and it will be noticed that the agricultural profession is over—crowded from year to year. The number of people that go to form the three-fourths of the population is a very large one. Two famines must have told upon them with very serious economical disasters. Their dreams of properous times make them dupes of false hopes and when the time comes for reaping the harvest they find themselves more involved in debts and are therefore more miserable and helpless. The increase in the new assessments have deprived them of their margin of profit to a great extent. It is not that the land—tax does not press hard against the people's purse but the real fact is that the people have to pay at first the land revenue irrespective of their net gain or loss towards the close of the agricultural year. The over—crowding on agricultural land, and the failure of any other industrial attraction for the diversion of labour have immensely increased the value of land. Abnormal prices are set upon land and it is true that agriculture does not bring even 12 per cent interest on the capital invested. The masses live a very hard life. They promise any rate of interest in their sore need and are highly speculative in securing land for cultivation on the promise of paying extraordinary sums as lease monies. This is the reason as to why land does not remain uncultivated and the land revenue is realized with the slightest possible inconvenience to the Government. The total absence of other industrial occupations have caused the people to swell the numbers that live on agriculture. The realization of the land—revenue in a rapid manner is no proper test for arguing either that the assessment is light or that the people have recovered from the effects of the famine in a remarkable manner. This ground would lend no support to such conclusions because of the peculiar condition of poverty and the absence of other industrial callings which has taught the people to stick to their land with a strong and stead—fast hold and at any cost to themselves. This is the real answer to the Government who should try as well to remove the curtain of optimism. It is no surprise that during the last decade there was no rise in the standard of living. There would be no such rise if the people are getting poorer and poorer, It is a happy sign of the times that with the picture of prosperity in their own hands the Government admit that the evils of indebtedness are rampant and are not likely to leave their victims unless the real remedy is used to find wages for their labour. The wage—famine multiplies the difficulties of the problem of indebtedness. We do not therefore naturally endorse the final conclusions at which the Government have arrived in their memorandum on thematerial condition of the people but it is advisable as well that our readers should know the original text itself. The memorandum closes with the following observations:—

"The material welfare of the people of Berar received a severe check by the season of scarcity that visited the province in 1896—97 and the famine of 1899—1900, and were it not for these calamities this memorandum would have been much more satisfactory. But nevertheless it cannot be said that the condition of the people has deteriorated during the decade. The general prosperity of the agricultural classes is shown by the rapid manner in which they have almost recovered from the effects of the last famine. There has been a considerable increase in the occupied area of land. This, combined with the increase of trade generally, and the marked development of the chief industry has afforded ample employment for the labouring classes. The land revenue has been collected with ease and regularity. Increased facilities for education have been placed within reach of the people. The value of land is high and the prices of produce have materially improved.

It is impossible to foretell the future; all that can be said is that if the rainfall is fairly seasonable and if the province can keep free from plague the lot of the people of Berar will be in the future what it has been in the past, a prosperous and contented one."

## वऱ्हाड

हवामान— उष्मा फार होतो. पाऊस चांगला जोराचा पडतो. एकंदर पाऊस २९ इंच झाला. उघाडीही लवकर होत. गेल्या शुक्रवारीं रात्रीं पाऊस जोरानें पडला पण तो थांबल्या नंतरचा चंद्र फार तेजःपुंज व अमृतमय वाटला. त्याचे अमृतकर आरोग्य संपदा वाढवितात. प्लेगाचा रोग खानदेशांत फार झाला आहे. खानदेशच्या लगमाच्या वऱ्हाडच्या भागालाहि थोडासा आहे. ईश्वराची इच्छा काय असेल ती खरी.

शिकार—पातूरच्या भागाला एक वाघीण माणसाच्या रक्ताला फार लुब्ध झाली होती. गेल्या पाच सहा महिन्यांत पाथरण, पास्टुल, चोंढी वगैरेकडे पांच सात माणसें तिनें खाल्लीं व दहावीस माणसांस जायबंद केलें होतें. हिची शिकार गेल्या १२ सप्टेंबर रोजीं पातूरच्या धामन दरीच्या खोऱ्यांत करण्यांत आली. मि. उल्लेखा वल्लद हाजीखा राहणार आलेगांव यांनीं ही शिकार फार शिताफीनें मारली. ही वाघीण मेल्यापासून लोकांचे जीव सुरक्षित झाले. हत्याराच्या कायद्यामुळें जंगली जनावरें देखील आमच्या लोकांस यःकश्चित् जनावरा प्रमाणें मानतात.

रा. रा. वामन मुरलीधर पोलीस इनस्पेक्टर यांनीं १७ जुलै पासून पेनशन घेतल्या मुळें खालील प्रमाणें बढती देण्यांत आली आहे:—

| रा. रा. | इनस्पेक्टरीचा वर्ग |
|---|---|
| सायन्ना आडवल, बुलढाणा | २ |
| सुभानखान, आकोला | ३ |
| नागोराव, वणी | ४ |
| भास्कर नारायण, आकोला | ५ |
| पी. रामकृष्ण नायडू | ६ |

गेल्या जुलै महिन्यांत १२४७३ माणसें जन्मलीं व ४४३२ मरण पावलीं. जन्म पुष्कळच झाले !

गेल्या सोमवारीं नागपूरची क्रिकेट मंडळी आकोल्याच्या मंडळीबरोबर खेळण्यासाठीं आली होती. आकोल्याची मंडळी अगदींच हरली व त्यांस ११ बुइकेटाचा व कांहीं रन्सचा चोप मिळाला. आकोल्याची मंडळी नागपुरास गेली होती तेव्हां नागपूरकर हरले होते पण येथील मैदानांत उलट प्रकार झाला. वेळेचा गुण विलक्षण आहे !

जळगांवचें प्रेक्षक– पत्र उशीरां आलें. श्रीगणपतीचे ४१९ महोत्सव फार सुंदर झाले; आणि त्यांतल्या प्रांत वे. शा. सं. रा. रा. प्रल्हाद शास्त्री व बाबा शास्त्री यांचें पुराण, रा. रा. शंकर नारायण पाचपोर यांचे गीतेवरील पुराण, रा. रा. बापूराव डाक्टर यांचें व्याख्यान रा. रा. चिंतामणराव कोल्हटकर यांचे गायन, मल्लक्रिडा इत्यादि गोष्टींनीं फार शोभा आली होती.

विद्यार्थी— कळवितो कीं आमच्या गुरुमंडळींचीं उदाहरणें किती तरी नामी ! कोणी खेळाच्या मैदानांत युरोपियनाच्या हातची पेयादि सेवन करितो कोणी रस्त्यानें विड्या फुंकीत जातो, कोणी अश्लील वाणींतच प्रतिष्ठा मिरवितो, उद्धट भाषणानेंच कोणी निस्पृह बनतो, जो तो दुसऱ्या शिक्षकाला आपल्या समोर दूषणें लावतो इत्यादि. शिक्षकवर्गानें सन्मार्ग दाखवावा तो निव्वळ धड्यानेंच नाहीं तर आपल्या कृतीनेंही दाखविला पाहिजे.

पत्रेखोर—सुधारलेली स्त्री ह्मणजे अंबाडी बुचडा, त्यावर गुलाबाचें फूल, अंगांत जाकीट, पाठीवर पसरलेली शालजोडी पायांत जोडा व हातांत छत्री हीं बाह्यांग भूषणयुक्त स्त्री. तिला स्वयंपाक नको व गृहकर्महीं नको. स्वैर वर्तन, पुस्तक वाचन, कशीदा काढणें व गुलाबी छानछोक हीं सर्व सुधारणेचीं आयुधें ! खरी गृहलक्ष्मी किती तरी निराळी !

काल सायंकाळीं 'सुधारणे' वरील आक्षेप पुरे होऊन रा० रा० देसाई यांनीं समर्पक उत्तर दिलें. आणि अध्यक्ष रा. रा. केशव गोविंद दामले यांनीं सर्व भाषणाचें सिंहावलोकन करून आपले उदात्त विचार शास्त्रीय पद्धतीनें प्रदर्शित केले.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | १००४= |
| सोनें | २४॥ |
| चांदी | ६७ |
| जवस | १४० |
| जवारी | ४०–४२॥ |
| गहू | १०५–१२० |
| चणे | ६०–७५ |
| मीठ | ३॥–रू. मण |
| बाजरी | ३ रू. मण |
| तूप | ७॥ रू. मण |
| तेल | ६॥= रू. मण |
| रुई | १६६ |
| सर्की सट्टा | ५॥ |
| जवारी सट्टा | ४५ |
| बोजा सट्टा | ५५ |

## वर्तमानसार

कुत्र्याचें शहाणपण— लंडनमध्यें एका जवळ एक किचनर नांवाचा कुत्रा आहे. तो उंदरासाठीं टपून बसतो. एक दिवशीं बिळातून उंदीर बाहेर येईनात तेव्हां त्यानें आपल्या खाण्याच्या रोटीपैकीं एक तुकडा आणून बिळाशीं ठेविला. रोटीच्या वासानें उंदीर बाहेर आल्या बरोबर त्यानें शिकार साधली. कसें शहाणपण आहे पहा !

## आक्सिजनचा अमोलिक गुण

आक्सीजन वायूच्या साधनानें मनुष्यांच्या जखमा तावडतोब बऱ्या होतात. उंच पर्वतावर आक्सीजन वायु पुष्कळ असतो, आणि जखमी लोकांस तेथें ठेविलें असतां त्यांच्या जखमा फार लौकर बऱ्या होत, जखमी झालेल्या एका मनुष्याच्या जखमा बऱ्या करण्यासाठीं एका डाक्टरानें पुष्कळ उपचार केले तरी त्या जखमा बऱ्या होईनात, ह्मणून त्या जखमांवर आक्सीजन वायूचा डाक्टरानें प्रयोग केला, तो केल्यावर थोड्याच दिवसांनीं त्या जखमा साफ बऱ्या झाल्या.

आक्सीजन वायूच्या अंगीं कृमी नाश करण्याचाही गुण असावा असें निदान डाक्तरांनीं काढलें आहे. माणसांच्या डोक्यास टक्कल पडतें. तें कृमीच्या योगानें पडत असावें असें मानून कांहीं डाक्तर लोकांनीं टक्कल पडलेलें नाहींसें होण्यास आक्सीजन वायूचा उपयोग करून पाहिला. डोक्यास बसण्यासारखी एक टोपी आंत आक्सीजन वायू भरून तयार करितात, आणि टक्कल पडलेल्या माणसाच्या डोक्यास घालतात. त्या टोपींत भरलेला वायू संपला ह्मणजे तींत पुन्हा तो भरतात. टक्कल पडलेल्या ठिकाणीं केस येईपर्यंत असें करितात. ह्या प्रकारानें पुष्कळ लोकांचीं टकलें नाहींशीं झालीं आहेत असें ह्मणतात. टक्कलवाल्यांनीं अशी टोपी पैदा करण्यास धडपड करून ऱ्हावी!

बर्फापासून अग्नि— स्वच्छ बर्फाचा एक इंच जाड तुकडा घेऊन त्याला कापून गोलाकार करावें व नंतर दोन्ही हातांच्या तळहातावर रगडून चष्म्याच्या कांचाप्रमाणें चपटे गोल करावें व नंतर सूर्याचें प्रतिबिंब त्या बर्फाच्या तुकड्यांतून चिरूटावर पाडावें ह्मणजे तो चिरूट पेटतो.

## HYDERABAD RESIDENCY ORDERS

Notification

*Hyderabad Residency, the 18th July 1902*

No. 176

The following rules for the regulation and inspection of dak bungalows within the limits of the Akot municipality having been made by the municipal Commitee under secton 116 (*j*) of the Berar Municipal Law 1886, have been confirmed by the Resident under section 116 (3) of the said Law: and are published here for general information.

1. The dak bungalow is furnished, for the convenience of travellers, with furniture, crockery, glassware, linen, and cutlery, and a messman and sweeper are in attendance.

2. Travellers are subject to the payment of the following fees for use of the bungalow:—

| | per head Rs. | a. |
|---|---|---|
| For each adult under 6 hours... | 0 | 8 |
| For each adult over 6 hours and up to 24 hours ... ... | 1 | 0 |
| Children under 10 years of age... | Free. | |

3. Any traveller pitching his tent in the compound of the dak bungalow, or using the stables, &c, of the bungalow, will be liable to pay the fees specified in rule 2 above from the time the tent is pitched or the stables occupied.

(4) The nunber of rooms occupied will not be considered, but the number of travellers occupying the same and the period of occupation: provided that rooms in excess of actual number of persons using the bungalows are not occupied to the exclusion of any other traveller.

5. The period of occupation will be reckoned from the time the room has been taken possession of either by the traveller or his servants.

6. Travellers cannot occupy any room in the bungalow for more than three days without the special sanction of the Chairman or during his absence from head—quarters, of the Vice—Chairman of the Municipal Committee or Secretary in case the Chairman or Vice—Chairman are both absent.

7. If the Commissioner, Judicial Commissioner, Civil and Sessions Judge, Inspector—General of Police, Sanitary Commissioner or any Deputy Commissioner on arrival finds all the rooms of the bungalow occupied, he may call on any traveller, not being a gazetted officer on duty, in occupation of a room to vacate, and such traveller shall be bound on the requisition of such gazetted officer to vacate the room even though he may not have been in occupation thereof for three days.

A traveller, not being a gazetted officer on duty, shall not be entitled to enter any room in the bungalow in the occupation of any of the above mentioned officers even though no other room is available for occupation and though such officer may have been in occupation for more than three days.

8. Travellers will be charged for anything belonging to the bungalow that may be broken or lost by them or their servants during their stay, at the rates mentioned in the attached list.

9 The messman's rates are also furnished and are to be charged, provided no other arrangements are made by the traveller with the messman.

10. Travellers must pay the fees and messman's charges in full before quitting the bungalow. If there are any complaints, they should be made to the Deputy Commissioner of the District or to the Chairman or Vice— Chairman of the Municipal Committee, who will take such action as he thinks necessary.

11. Travellers are to record their remarks in the bungalow book, noting the time of occupation, number of persons who have occupied the bungalow, the amount paid, and for what purpose, *viz*, halt or breakage.

12. Every dak bungalow under municipal management will be supervised by the Chairman or Vice—Chairman or Secretary, who will primarily be responsible for their proper sanitation and up—keep and for the due observance of these rules.

13 Infringement of any of the foregoing rules by travellers occupying the dak bungalows shall, on conviction before a Magistrate, make the person convicted liable to a fine which may extend to Rs. (50) fifty, and when the breach is a continuing breach with a further fine which may extend to five rupees for every day after the first during which the breach continues.

Dated Akot 13/9/1902 — K. W. Kulkarni for Chairman Municipal Committee Akot.


## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दांताच्या आजारा शिवाय इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सरि का दांतो मे दिखाते है हम।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम ॥




देखना चाहिये क्या मुल्क कदर करती हे।
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां हैं हम ॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ।।-

दांतावर जाळें जमणें, ते पिवळे होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें, हलूं लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतांनीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यातून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस आकोला.

पत्ता—

**नन्दलाल वर्मा.**

म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कम्पनी मथुरा.


## नोटीस

बेशमी महमद इब्राहीम वल्द महमद अमीर कंट्राक्टर मुसलमान राहणार ताजनापेठ मोमीनपुरा आकोला यांस:—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितों कीं, तुह्मी मजकडून माझ्या जहागिरीचा रुसुम घेण्याचा हक्क विकविणार होता. आणि त्यासाठीं ९९ रुपयांचा स्टांपाचा कागद तुह्मी आणविला होता. पण मी या गोष्टीला माझ्या वकिलाचे सल्ल्यावरून कबूल नाहीं असें मी तुह्मांस सांगितलें. आतां माझ्या नांवचा ९९ रुपयांचा कागद तुह्मांजवळ आहे तो परत करावा ह्मणजे मी तो सरकारांत परत देईन ही गोष्ट तुह्मी आठ दिवसांत न कराल तर रीती प्रमाणें योग्य तजवीज केली जाईल. कळावें ता. १८-९-०२ इ०

सही

खाजागुलाम सैफुद्दीनखा वल्द खाजागुलाम जलालुद्दीनखा जहागिरदार कसबे महान राहणार आकोला


## मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल:—

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासून तो दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र १००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १।७।०२ — J. Kinniburgh एजंट


☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED N. No. ४

वर्षाचा मागाऊ ... 
सहामाही „ ३ „ ८८
साल अखेर „ ७ „ १
किरकोळ अंकास ........................८४

नटिशा बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस............८१ ८६
दुसरे खेपेस .... ........८१

Annual in arrears 7 ,, 1 Rs 8
Six monthly .........3 .............. 8 as
Single copy ............................ 4 as

Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per lin ...3 a

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI AKOLA MONDAY 29 SEPTEMBER 1902 NO 28

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख २९ माहे सप्तंबर सन १९०२ इ० अंक २८

**Kadi** हें काय आहे ?

डाक्टर डी. एन. दस्तुर यांनीं तयार केलेलें दमा व खोकला या वरील रामबाण औषधी.

दमा आणि खालील सर्व रोगांवर तात्कालिक व गुणकारक उपाय हाच आहे. जेथें डक्टर व इतर कोणाचाही उपाय चालत नाहीं तेथें हें फार उपयोगी पडतें. याच्या गुणाबद्दल हिंदुस्थान, इंग्लंड व अमेरिका येथील रोगग्रस्तांचे व डाक्तरांचे शेंकडों चांगले अभिप्राय आहेत. कितीही जुनाट दमा, फार दिवसांचा खोकला, वशांत धरचा अडाण होणें, वारंवार सरदी व पडसें होणें, व ताप येण, सदर्नी, ब्रान्कायटिस इनफ्ल्युएन्झा इत्यादि रोगांवर हें फार उपयोगी आहे. बाटलीची किंमत सारा १॥ रुपया आहे. परंतु हें रोग्यांस एक हजार रुपयांच्या किंमतीचें वाटतें.

पत्ता--मेसर्स पेस्तमजी आणि सन दुकान आकोला.

## मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल:—

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेव लेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १।७।०२ } J. Kinniburgh एजंट

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दांताच्या आजारा शिवाय इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अकसीर का दांता मे दिखांते है हम।
चोट ढंके की हरेक मर्ज उडाते हम ॥




मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ॥-

दांतावर जाळें जमणे, ते पिवळे होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें, हलूं लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतानीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यातून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस् आकोला.

देखना चाहिये क्या मुश्क कदर करती है।
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां हैं हम ॥

पत्ता—
नन्दलाल वर्मा.
म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कम्पनी मथुरा.

## नोटीस

परशराम वल्द चांगोजी बारी धर्मे राहणार उंबर तालुके आकोट हल्लीं मुक्काम सेंट्रल जेल आकोला यांस:—

खालीं सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी माझ लग्नाचा नवरे असून पूर्वीं तुह्मावर चोरीचा मोक दमा होऊन दोन वेळां तुह्मी शिक्षा भोगली व हल्लींही चोरीचा मुकदमा होऊन सात वर्षांची शिक्षा झाली आहे. तुमची इस्टेट वगैरे कांहीं नसून मला पोटभरण निर्वाह करण्यास कांहींच आधार नाहीं. व जंगलचें काम करण्यास मला ताकद नाहीं. तेव्हां माझे व माझे मुलीचे पोट भरण्याची व्यवस्था कशी व्हावी हें संकट आहे. तेव्हां तुह्माला नवरेपणाचा हक्क कायम ठेवणें असल्यास माझे व माझे मुलीचे निर्वाहाची सोय नोटीस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत लाविली पाहिजे. तसे न झाल्यास तुमचा नवरेपणाचा हक्क सुटला असें समजावे. आणि माझे उदरनिर्वाहाकरितां व माझे मुलीचे उदरनिर्वाहाकारितां दुसरा नवरा करणें भाग झाल्यामुळें मी दुसरा नवरा करीन. तुह्मास कळण्याकरितां या नोटिसीनें कळविले आहे. कळावें तारीख २५।९।१९०२ इ०

सही
जानी मर्द परशराम बारी
राहणार उमर तालुके आकोट
व पोष्ट अडगांव निशाणी
खुद्द बांगडी हातची असे.

## सोज्वळ सूचना

आमच्या मारवाडी लोकांत मृताच्या क्रीये प्रीत्यर्थ लोक पुष्कळ खर्च करितात. परंतु वास्तविक पाहतां केलेल्या खर्चाचा मुख्य उद्देश साधून येतो असें दिसत नाहीं. एकी प्रमाणें धर्म करणे सर्वांस उचितच आहे. पण धर्म करितांना तो योग्य दिशेनें होत आहे कीं नाहीं हें पाहणें आपलें काम आहे. अलीकडे प्रत्येक जातींत प्रत्येक गोष्टींत सुधारणा होत आहे परंतु आमच्या लोकांत या गोष्टींकडे अजून कोणाचेंही लक्ष जात नाहीं ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे. आमच्या मृताच्या क्रियमध्यें मुख्य खर्च झटला ह्मणजे ब्राह्मणाला भोजन व दक्षणा देणें हा होय. या कामांत प्रत्येकांचा पुष्कळ पैसा खर्च होत असल्यामुळें सार्वजनिक दृष्ट्या याचा कोणत्याही रीतीनें उपयोग होत नाहीं. तो तसा व्हावा ही गोष्ट मला या लेखानें सुचवावयाची आहे. पार्शी वगैरे लोकांप्रमाणें आमच्या जातींत मंडळ्या (समाज पंचायती) गावोगावीं स्थापन होऊन त्यांजकडे फंड जमवून त्या फंडातून जातीच्या गरीब लोकासाठीं दवाखाने, निराश्रित मुलांस विद्याभ्यासा करितां मदत किंवा गरीब लोकांच्या मुलांमातीस लागणारा खर्च किंवा स्कॉलरशिपा वगैरे अन्य रीतीनें हाच पैसा लाविल्यास एकंदर जात बांधवास अशा फंडा पासून पुष्कळसा लाभ मिळणार नाहीं काय! पूर्वीं पासून चालत आलेली ब्राह्मणांस भोजन देण्याची चाल अगदींच मोडून टाकावी असें आमचें मुळींच ह्मणणें नाहीं. त्या कामा साठीं कांहीं नियमित रकम व्यवस्थेशीर खर्च केल्यास गैर वाजवी होणार नाहीं. परंतु ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे कीं पुष्कळ पैसा खर्च होऊनही येणाऱ्या ब्राह्मणांच्या संख्येचा अंदाज करितां येत नसल्यामुळें पुष्कळ प्रसंगीं असें पाहण्यांत येतें कीं, अंदाजाच्या दुप्पट किंवा त्याहूनही जास्त ब्राह्मण आल्यामुळें करणारानें जरी इतकाही खर्च केला तरी वेळीं अन्न सामुग्रीची तूट पडल्यामुळें भरपूर खर्च होऊनही मालकास अगदीं खालीं पाहवें लागतें व शिवाय त्याच्यानें आपल्या आप्त इष्टांचेंही योग्य रीतीनें आदरातिथ्य करवलें जात नाहीं हें वेगळेंच ह्मणजे पुष्कळ पैसा खर्च होऊनही याचें कांहींच चीज होत नाहीं. लोकांची प्राप्ती संबंधानें पूर्वी सारखी स्थिती हल्लीं राहिली नसून हे खर्च तर पूर्वीं पेक्षां फारच जास्त वाढलेले आहेत. सबब प्राप्तीच्या मानानें धर्म करून ता सत्पात्री होणें अत्यंत इष्ट आहे. व या प्रमाणें मृता प्रीत्यर्थ व इतर कार्या बद्दल फाजील खर्च न होऊं देण्याबद्दल जोधपूर, जैपुर, अजमेर, मेरठ वगैरे ठिकाणीं वैश्य कानूफरन्स, वैश्य महासभा वगैरे सारख्या संस्था स्थापन होऊन दर वर्षीं सभा भरवून ठरावावर ठराव पास होत आहेत व तिकडील बहुतेक लोक याचें अनुकरणही करावयास लागले आहेत. वैश्य ह्मणजे अगरवाले, दोसीवाले, माहेश्वरी, खंडेलवाल, ओसवाल व मारवाडी जैन वगैरे वगैरे जातींच्या लोकांचा यांत समावेश होतो. करितां त्यांचें स्तुत्य उदाहरण पाहून त्यांचें अनुकरण दिवसानुदिवस लोकांनीं करण्याकडे लक्ष देण्याची हल्लीं वेळ आली आहे. ह्मणून सर्व वैश्य (मारवाडी) लोक या गोष्टी बद्दल पूर्णपणें विचार करून वर दाखविलेल्या दिशे प्रमाणें दानधर्म करण्याचा प्रघात सुरु करून होईल तितका फाजील खर्च करण्याचें बंद करतील अशी पूर्ण आशा आहे. असें केल्यानें स्वहित व राष्ट्रहित हीं दोन्हींही सहज साध्य होतील करितां आज येवढीच सूचना करून ती आमच्या जाती बांधवास कितपत रुचते व ही गोष्ट घडवून आणण्यासाठीं त्यांजकडून काय चळवळ होते हें पाहिल्या नंतर पुढें आणखी बऱ्याच योग्य सूचना करावयाच्या आहेत, त्या करण्याचें वचन देऊन हा बराच लांबलेला लेख येथें पुरा करितों.

खामगांव ता. २१।९।१९०२ } आपला. एक मारवाडी (वैश्य.)

## पोर खेळ

मागल्या आठवड्यांत येथें एक चमत्कारिक गोष्ट घडली. ती तेव्हांच माझ्या कानांवर आली; परंतु त्यावेळीं तिज संबंधीं पूर्ण माहिती मिळाली नव्हती. शिवाय या गोष्टीचा पूर्ण निकाल झाला नव्हता ह्मणून आतांपर्यंत वाट पाहावी लागली. ती गोष्ट येणें प्रमाणें :—

येथील ट्रेनिंग स्कुलांतील एक विद्यार्थी ट्रेनिंग स्कूलच्या उत्तर बाजूच्या वरांड्यांत एके सकाळीं अभ्यास करीत हिंडत होता; व त्या पासून कांहीं अंतरावर दुसरा एक विद्यार्थी एका कोपऱ्यांत बसून अभ्यास करीत होता. उत्तरेच्या बाजुला मुंबई बँकेच्या आकोला येथील एजंटाची राहण्याची जागा आहे; तेथें असणाऱ्या एजंटास ह्या मुलाच्या वाचण्या पासून त्रास झाला व त्यामुळें साहेब रागावले. तें रागवणें पाहून तो हिंडत अभ्यास करणारा मुलगा भिऊन पळून गेला. साहेबांनीं मुलास बोलावण्याकरितां शिपाई पाठविला. शिपाई आला व जो मुलगा कोपऱ्यांत अभ्यास करीत बसला होता त्यास साहेबानें बोलाविलें आहे ह्मणून सांगितलें. मुलास पूर्वीची हकीकत कांहींच माहीत नसल्या कारणानें तो साहेबाकडे गेला. साहेब त्यांशीं इंग्रजींत बोलूं लागले. मुलानें हिंदुस्थानींत "मला इंग्रजी येत नाहीं" असें सांगितलें. तों साहेब अधीकच रागावले व मुलाच्या हातांतील अभ्यासाचीं पुस्तकें हिसकून घेऊन व तीं आपल्या दोन्ही हातांत धरून मुलाच्या डोक्यावर तीनदां आपटलीं, आणि तीं तशींच ठेवून घेऊन मुलास हांकून दिलें. मुलानीं पुढें प्रिन्सिपाल साहेबांस ही गोष्ट कळविली व प्रिन्सिपालनीं मे. कँडी साहेब डायरेक्टर ह्यांस कळविली. डायरेक्टर साहेब त्या वेळीं दवऱ्यावर होते, ते तिकडून परत आल्यावर त्यांनीं ह्या खटल्याचा मोठा चमत्कारिक निकाल केला तो असा कीं—मुलानें एजंट साहेबांची माफी मागावी. आतां मी असें ऐकतों कीं मुलानें नाहीं होय ह्मणतां एकदांची लेखी माफीहि मागितली,

ट्रेनिंग स्कूल आणि बँकेच्या एजंटाची बराक ह्यांत १९० फूटापेक्षां जास्त अंतर आहे, मुलगा अभ्यास करीत होता ही गोष्ट लक्ष्यांत आणिली ह्मणजे त्याच्या वाचण्या पासून साहेबास त्रास झाला ही गोष्ट चमत्कारिक दिसते. त्या शिवाय मागचे बँकेचे एजंट मि. मार्शल तेथें रहात होते व तेव्हां कँडी साहेबही तेथें रहात होते; परंतु त्यांनीं कधीं अशी तक्रार केलेली ऐकण्यांत आली नाहीं. मग आतांच कँडी साहेबांस एजंटचें ह्मणणें खरें वाटून त्यांनीं असा निकाल कां दिला ह्याचें गूढ कांहीं तरी निराळेंच असावें. बरें, मुलगा जरी अपराधी आहे असें मानलें तरी त्यास साहेबांनीं शिक्षा केली असूनही ही दुसरी माफी मागण्याची शिक्षा कां! ८००।९०० रु. पगार मिळविणाऱ्या अधिकाऱ्यांनीं ६ रुपये मिळविणाऱ्या गरीब विद्यार्थ्यास मारून आणखी लेखी माफी घ्यावी ह्यांत त्यांचा मोठेपणातर खराच !

मे. कँडी साहेबांची न्याय देवता अलीकडे फार शिथिल होत चालली आहे. कँडी साहेबांचे स्तुतिवाद गाणाऱ्या शाळाखात्यांतील व इतर गृहस्थांनीं ह्या वेळेचा फायदा घेऊन त्यास उपदेश करावा; कारण कँडी साहेबावरचें लोकांचें प्रेम आतां कमी होऊं लागलें आहे. कँडी साहेबांनीं वऱ्हाडांत आल्या बरोबर जी न्यायप्रियता दाखविली तिला आतां कमीपणा येत आहे. इकडे कँडी साहेबांनींहि लक्ष्य पुरवावें. कळावें हे विनंती. ता. २८।९।०२

आपला
न्यायप्रिय ग्रामस्थ.

---

# वऱ्हाडसमाचार

मिती भाद्रपद वद्य १३ शके १८२४

---

## लोकसंख्या

( नंबर २ )

गुदस्तांच्या खानेसुमारींत वऱ्हाड प्रांताची नक्की लोकसंख्या २७,५४,०१६ भरली हा आंकडा ह्मैसूर संस्थानाच्या लोकसंख्येच्या निमपटीनें आहे. सेन्सस सुपरिन्टेंडेंट मि. आरदेसर साहेब या लोकसंख्येची कल्पना देतांना ह्मणतात कीं, लंडन शहराची लोकसंख्या जेवढी आहे त्याची तीन चतुर्थांश संख्या ह्मणजे सर्व वऱ्हाड प्रांताची लोकसंख्या होय. लंडन शहराची तुलना देतांना त्याचें क्षेत्रफळ दिलें असतें ह्मणजे वऱ्हाडप्रांतभर वसलेली लोकसंख्या किती लहानशा चिमुकल्या जागेंत लंडन शहरीं खेचलेली आहे याची कांहीं तरी कल्पना आली असती. लंडन शहराची गोष्ट विनाकारण दिल्या सारखी दिसते. एखाद्या गोष्टीशीं तुलना जेव्हां करण्यांत येते तेव्हां हेतु असा असतो कीं प्रस्तुत गोष्टीची कल्पना प्रसिद्ध उपमानाच्या कल्पनेनें द्यावयाची असते. लंडन शहराचीच कल्पना नाहीं तर आंकड्याचा लघुगुरुपणा दाखविण्या पासून मोठासा फायदा होत नाहीं. लंडनापेक्षा मुंबई, कलकत्ता इत्यादि प्रसिद्ध शहराची कल्पना लोकदृष्टीपुढें नीटशी उभी राहिली असती. लंडनची लोकवस्ती व वऱ्हाडची लोकवस्ती या दोहोंच्या आंकड्यांचा लहान मोठेपणा दाखवितांना क्षेत्रफळा संबंधानें कांहीं आंकडे दिले असते तर त्या आंकड्यांच्या साम्यावरून लोकवस्तीची दाटी व पातळाई चांगली लक्ष्यांत आणितां आली असती. १८९१ च्या खानेसुमारीच्या रिपोर्टांत असा शेरा दिला होता कीं लोकवस्तीच्या दृष्टीनें वऱ्हाड प्रांत हा सिंध, काश्मीर किंवा बडोदा संस्थान या पेक्षां थोडासा मोठा आहे. पण गेल्या दहा वर्षांत हा मोठेपणा नाहींसा झाला. सिंध प्रांताची लोकसंख्या इतकी वाढली आहे कीं, ती वऱ्हाडच्या आंकड्यापेक्षां ९ लक्षानें अधीक आहे. काश्मीर प्रांताची वस्ती बरीच वाढली ह्मणजे तिनें वऱ्हाड प्रांताला १॥ लक्ष लोकसंख्येनें मागें टाकलें आहे. परंतु बडोदा संस्थाना पेक्षां वऱ्हाडची वस्ती दहा वर्षां पूर्वीं थोडीशी अधीक होती ती आतां ८ लक्षानें वाढली आहे. बडोदा संस्थान आतां बरेंच मागें पडलें आहे याबद्दल दिलगिरी वाटते. गेल्या दुष्काळाचा हा दुष्ट परिणाम बडोदा संस्थानावर विशेष घडला असें दिसतें.

वरील लोकसंख्येची मांडणी जिल्हावारीनें केली तर असें आढळून येईल कीं या वर्गवारींत अग्रस्थान उमरावती जिल्ह्याला मिळेल या वर्गवारीचा पुढील तपशील असा :—

| जिल्हा | लोकसंख्या |
|---|---|
| उमरावती | ६,२०,११८ |
| आकोला | ५,८२,९४० |
| वणी | ४,६६,९२९ |
| बुलढाणा | ४,२३,६१६ |
| वाशिम | ३,९३,४१० |
| व इलिचपूर | २,९७,४०३ |

सरासरीनें इलिचपूरच्या दुप्पट आकोला जिल्हा आहे.

वऱ्हाडच्या जिल्ह्यांची तुलना इंडियांतील इतर जिल्ह्यांबरोबर मि. आरदेसर यांनीं फार नामी केली आहे. उमरावती जिल्हा ह्मणजे गुजराथेंतील सुरत जिल्हा किंवा वायव्य प्रांतांतील बांदा जिल्हा होय. आकोला ह्मणजे मध्यप्रांतांतील चांदा जिल्ह्या एवढा आहे. इलिचपूरा एवढा छोटा जिल्हा मुंबईचा भडोच जिल्हा आहे. मध्यप्रांतांतील सागर जिल्ह्याच्या बरोबरीनें वणी जिल्हा आहे. बुलढाण्याची लोकसंख्या व यप्रेकडील गरवाल जिल्ह्यापेक्षां सहा हजारानेंच कमी आहे. वाशिमाच्या तोडीला मुंबईकडील धार पारकर जिल्हा येतो.

वऱ्हाडचे २२ तालुके आहेत. त्यामध्यें लोकवस्ती फार मोठी ह्मणजे चांदुर तालुक्याची आहे. हा चांदुर तालुका कूर्ग संस्थानाहून १२ हजार लोकसंख्येनें मोठा आहे. सर्वांत लहान तालुका मेळघाटाचा आहे. तालुक्यांची वर्गवारी लोकसंख्येच्या मानानें खालील प्रमाणें आहे.

| तालुका | लोकसंख्येचा अंदाजा |
|---|---|
| चांदूर, उमरावती | २ लक्षापासून १॥ लक्षापर्यंत. |
| मलकापूर, दारव्हा, वाशिम, व आकोला | १॥ लक्षापासून १॥ लक्षापर्यंत. |
| इलिचपूर, मोर्शी, आकोट व चिखली | १॥ लक्षापासून १। लक्षा पर्यंत. |
| यवतमाळ, मेहेकर मूर्तिजापूर, दर्यापूर, पुसद, बाळापूर, केळापूर, व खामगांव. | १। लक्षापासून १ लक्षा पर्यंत. |
| मंगरूळ, जळगांव व वणी | १ लक्षापासून ८० हजारापर्यंत |
| मेळघाट | ४० हजाराखालीं |

ही तालुक्यांची वर्गवारी उतरत उतरत कशी आली आहे हें वरील आंकड्यावरून चांगलें लक्ष्यांत येईल. तालुक्याच्या वस्तीची दाटी किंवा पातळाई या वरून लक्ष्यांत येणार नाहीं; या बाजूनें अनुमान नुसत्या लोक संख्येच्या आंकड्या वरून फारच चुकतें. लोकसंख्या व क्षेत्रफळ या दोहींचे आंकडे पाहून नंतर लोकवस्तीची दाटी किंवा पातळाई काढावी लागते. त्या प्रकरणाचा विचार दुसऱ्या खेपेला करण्याचा संकेत आहे.

---

## प्लेग

प्लेगाचा प्रतिबंध चोहोंबाजूंनीं चालूच आहे आणि प्लेगाचें पाऊल तर उत्तरोत्तर पुढें आहे. कोठें हा पावसाळ्यांत वाढतो, कोठें हिवाळ्यांत वाढतो आणि कोठें उन्हाळ्यांत वाढतो. सारांश, ऋतुमानानें हा रोग बळी किंवा निर्बळी होत नाहीं. हल्लीं दक्षिण महाराष्ट्रांत या रोगाला मोठा जोर आला आहे, कोल्हापूर, धारवाड वगैरे कडील मुलुखाचा टापू प्लेगानें अतिशय ग्रासलेला आहे. खानदेशांतील हालहवाल याहूनही वाईट आहे. धुळें शहर अगदीं मृत्यूच्या जाभाड्यांतच सांपडलें आहे. प्लेगापुढें मनुष्याचा कांहीं इलाजच चालत नाहीं.

आमच्या वऱ्हाडांत बुलढाण्याकडे प्लेगाचा आजार थोडाबहुत आहेच. चिखली तालुक्यांतील अमडापूर, उंद्री, सागवान, नांद्र परगणे, देऊळघाट इत्यादि गांवीं या रोगाचा कहर उसळला आहे. हीं खेडेगांवें खरीं परंतु तेथेंही मृत्यूंची संख्या मोठी झाली आहे. मे. रुस्तुमजी साहेब मुद्दाम या भागांत फिरत आहेत आणि प्लेगाच्या प्रतिबंधाचे व तसेंच निवारणाचे उपाय ते लागोपाठ योजीत आहेत रयतेच्या सुखासाठीं यांचे श्रम बहुविध असतात. प्लेगाविषयीं बंदोबस्त करितांना ते फार कडक अंमल ठेवणार नाहींत आणि लोकांचा वृथा छळ होऊं देणार नाहींत अशी आह्मांस उमेद आहे. चिखलीच्या बाजूनें खामगांवाला प्लेग आला आहे. तेथें त्याची दृष्टी फार सौम्य आहे हें दुःखांत सुख होय.

### दहशत

आमचा आकोला चिरकाल या रोगापासून अलिप्त आहे. पण दुर्दैवानें येथें एक मारवाडीण बाई प्लेगानें गेल्या शुक्रवारीं मरण पावली. ही धुळ्याकडील पिळकवाडी हून आली होती. तिला ताप फार येत होता आणि डाक्टर रेली साहेबांस तिच्या कांखेंत गांठीचा आढळही झाला. प्लेग उद्भवल्याची तार पाठविण्यांत आली. डाक्टरीच्या मताचें महत्व विशेष आहे. त्या बाईला प्लेग झाला असला, तरी ती बाहेरून आली होती व शेवटीं ती मेली देखील! ही बाई आकोल्यास आठ दहा दिवसांनीं मरण पावली. तिच्या पश्चात् कोणाला झालेला नाहीं. या दोन्ही गोष्टी त्या बाईला खरोखर प्लेग होता किंवा नाहीं या विषयीं मन द्विधा करितात. कांहींही असो, त्या बाईला मरतां मरतां फार वेदना झाल्या. तिला घरांतून काढली, प्लेगाच्या झोंपडींत नेली आणि तिनें लागलीच या मृत्युलोकाला रामराम ठोकला. सध्यां तिच्या मरणामुळें मोठी दहशत पडली आहे. मे. कुवार श्री हरमामजी लोकांस प्लेग प्रतिबंधाचे उपाय कळवीत आहेत. प्रमुख प्रमुख गृहस्थांची समक्ष गांठ घेऊन गांवभर स्वच्छता राखण्या विषयीं ते उपाय सुचवीत आहेत. त्यांच्या सारखे दक्ष व जबरदस्त अधिकारी येथें आहेत ही आनंदाची गोष्ट होय.

मुनिसिपालिटीनें स्वच्छता राखणारी आपली

कामगार मंडळी अधीक नेमिली पाहिजेत. खर्चा कडे पाहण्याची ही वेळ नाहीं. शहर स्वच्छ राहील तर प्लेगाचा प्रतिकार पुष्कळसा होईल. स्वच्छता राखण्याचें काम सर्वांचेंच आहे आणि तें प्रत्येकानें आपापल्या शक्ती प्रमाणें यथासांग करण्यास शिकलें पाहिजे. एकजण चुकला तर त्याची चूक त्याला बाधतेच आणि संसर्गानें इतरांसही बाधा करिते. आमच्या नागरिक मंडळींनीं प्लेगाची दहशत बाळगूं नये पण स्वच्छता सांभाळा आणि ठेवावी ह्मणजे ईश्वरही त्यांस साह्यकारी होईल आणि प्लेगाचा रोग दूर होईल.

प्लेगा संबंधानें सर्व लोकांनीं एक गोष्ट लक्ष्यांत ठेवण्या सारखी आहे. कुमार साहेब व डक्टर रेली साहेब या उभयतांच्या बंदोबस्ता खाली रयतेला पीडा होण्याचा संभव फार कमी आहे आणि जबरदस्तीनें कोणास घराच्या बाहेर काढलें जाणार नाहीं. प्लेगाच्या नियमांत मुंबई कडील अनुभवानें पुष्कळ सढळपणा व उदारपणा जागृत आहे. गेल्या शुक्रवारीं त्या मरणोन्मुख बाईला घरा बाहेर काढली ही गोष्ट नजरचुकीनें झाली ह्मणा किंवा प्लेगाचा हा पहिलाच प्रसंग होता ह्मणून कदाचित् सर्वत्र दाणादाण करण्यांत आली ह्मणा तथापि या कृतीवरून जितकी दहशत लोकांस पडली असेल तितकी दहशत त्यांनीं उगीच मनांत धरूं नये असें आह्मी त्यांस मुद्दाम सूचवितों.

## स्थलान्तर

प्लेगाला उपाय नाहीं आणि तो मृत्यूचा रामबाण तीर आहे. तथापि जेथें प्लेग उद्भवतो तेथें तेथें स्थलान्तराचा उपाय फार सुखकर व हितप्रद आहे असा अनुभव आहे. स्थलान्तर केल्यानें प्लेगाची बाधा सहसा होत नाहीं; आणि उपलब्ध उपायांमध्यें स्थलान्तराचा उपाय फार उत्कृष्ठ आहे. स्थलान्तरासाठीं विशेष लांबवर जावें लागत नाहीं. उघड्या व मोकळ्या हवेंत व शेताच्या मैदानांत किरकोळ चलाऊ सोयी करून राहावें ह्मणजे स्थलान्तराचा कार्यभाग साध्य होतो. ही गोष्ट सुखवस्तु पैसेकरी लोकांस कठीण वाटणार नाहीं परंतु गरीब लोकांला ही खर्चाची बाब आहे. तथापि नाइलाज ह्मणून स्थलान्तराचा उपाय करण्यास चुकूं नये किंवा या उपायांत निष्कारण पत्यवाय आणूं नयेत अशी सूचना आह्मी मुद्दाम निश्चय पूर्वक लोकांपुढें मांडीत आहों. या सूचने च्या स्वीकाराची किंवा अव्हेराची गोष्ट लोकांच्या मर्जीवरची आहे !

आलिकडे मुनिसिपल कारभाराविषयीं सरकारी विचार चांगलासा अनुकूल दिसत नाहीं. जिकडे तिकडे मुनसिपल हक्काची पायमल्ली होत आहे. लोकनियुक्त सभासद नकोत आणि तें कटकटीचें लोकमतही नको. सर्वत्र सरकारी वर्चस्व राहिलें पाहिजे तसेंच मुनसिपालिटीनें स्थानिक स्वराज्याचीं कार्यें सुखैनेव करावींत परंतु सरकाराला पैशाची तसदी पडूं नये; इतकेंच नाहीं तर सरकाराचा बोजा कमी करून पुष्कळसे खर्च मुनिसिपालिटीनें सोसावे अशा प्रकारचें धोरण सरकारी व्यवस्थेंत दिसून येत आहे.

या मुनिसिपालिट्या बरोबर त्या संस्थांचे मुख्य चालक जो वकिलांचा वर्ग असतो तोहि मोठा अप्रिय होऊं लागला आहे. प्रस्तुतच्या इंग्रजी मध्यें वकिलानें सार्वजनिक कार्यांचा पुष्कळसा भाग उचलेला आहे आणि वकील मोठ्या युक्ति प्रयुक्तीनें सरकारची दांडगाई चालूं देत नाहीं. ह्मणून वकील ह्मणजे एक वावडा पदार्थ आहे असा सरकारी अंमलदारांचा समज दिसतो. वकिलांच्या वर्गासंबंधानें होत चालेला गैरसमज फार वाईट आहे हें ध्यनित करण्या पलिकडे आमचा विशेष हेतु नाहीं.

# The Berar Samachar

MONDAY SEPTEMBER 29 1902

The political future of Berar hangs in the balance of the present statesmanship. It is a deep mystery and will probably remain so until the final decision is thrown upon us as a miracle. It is presumed that the probable changes in the administration of this province are a matter of purely Governmental concern and that no consultation with the deliberations and the wishes of the people is needed in order to effect the best changes in the administration. The abnormal cost of the Berar administration is a standing reproach to the British rule. The matter is now considered from all sides and there seems to be a great political meaning if we see in the proposals of the paramount Government to His Highness the Nizam, one anxious and stead—fast effort to retain the province under British administration in one form or another. The rendition of Berar is beyond all possible hopes. That the province will continue to be *entirely* British is a foregone conclusion. No sophistry of the British Government can put a veil upon this inmost secret of the whole policy. History of the last 30 years or so speaks against the righteous intentions of the Government. Plain speaking does not mean a disloyal act and we fail to see how the Government can justify the retention of the province against the terms of the previous treaties. The retention of the province might be a political necessity and the suzerein interests of the Indian empire might require the possession of the province as the key to the central security of the British empire. Such grounds are highly expedient and though no moral code can hope to consecrate them the political justice might come forward as a saviour of all ills that are justified by future usefulness of an objectionable conduct. It is on this plausible ground of expediency and utility that the Nizam must deny to himself his sacred rights of demanding the return of the province and must blindly yield to the *Imperial* thirst of the land. We would welcome a similar and plain vession of their conduct on the part of the Government but we are kept in the back ground in this particular domain of the British policy. The imperial tenor of the present policy has many evils against the rights and privileges of the people and it will be quite within the letter and spirit of the new policy that Berar should ever be foreclosed from the rights of the Nizam of demanding its restoration after so long a period of British administration.

But it is as well to remember that on grounds of political expediency alone the retention of Berar can be maintained. There is no good of the people that necessitates a change. In either result, the people of the province will continue to prosper and to remain a contented people as before. The absorption of this province in the Nizam's dominion will. however, be with the natural impulses of the people. They like a *Native* administration at any risk and at any cost. Such a feeling is quite natural and the people will not be charged for being ungrateful for the past beneficient advantages of lhe British administration. Each system tike a *Native* administration has its own peculiar vantage ground which no race on earth would willingly barter for innumerable advantages of a foreign rule. However we have, we think, an inkling into the future and must be prepared for the changes that may come upon us.

Rumour is stubborn that the Nizam does not consent to lease the province permanently on the payment of a fixed sum. The province is said to be a sacred trust with the Nizam It has got all the memories of the past. It was a gift to one of the ancestors of the Nizam and the latter does not like to part with its nominal ownership. If the wind blow this way we do not see on what lines the new changes in the administration will run. All is, however, a matter of a pure guess. Now—a—days the rumour is persistent that some consultations are anticipated about the probable partiton of Berar into the adjacent provinces of the Bombay presidency or the Central Provinces. This partition will have a far—reaching effect and unless the proposal takes a practical shape we do not wish to discuss the utility or otherwise of such future changes. It is, however, morally certain that in the near future wo should expect a great many changes in the administration of our Berar. Let us hope that all proves to be for the best of the people and the Government.

## वऱ्हाड

हवामान.—किंचित् थंडीचा भास होतो, पण हवेंत उष्मा अजून बराच आहे व हस्त नक्षत्राचा पाऊस पडेल असा रंग दिसतो. हिंवतापाचे आजार पुष्कळ फलावले आहेत.

काल रोजीं सायंकाळीं रा. रा. रामचंद्र भास्कर पानवेलकर बी. ए. यांनीं इंग्रजींत Progress of arts and sciences या विषयावर व्याख्यान दिलें.

मि. बी. क्र असि. कमिशनर हे या आठवड्यांत रजेवरून परत आल्या नंतर रा. रा. विष्णु रंगनाथ शेंबेकर हे आपल्या १ ले वर्ग तहशिलदारीच्या जागीं आकोल्यास राहतील.

आणि आकटींग तहशिलदार मि. फरूक हुसेन हे बाळापुरास नायब तहशिलदारीवर परत जातील.

मे. इलियट कशिनर हे सध्यां चिखलदऱ्यास गेले आहेत.


## टेंडरें पाहिजेत

तारीख १-११-१९०२ इसवी पासून एक वर्षभर कमेटीस सामान लागेल तो पुरविण्यासाठीं टेंडरें पाहिजे.

### सामान लागेल त्याचा तपशील

इमारती—सागी व इतर तुळया, गोल, तक्ते, बांबू, स्कांटिंग, तट्ट, खिळे, विटा, चुना, दगड, वगैरे.

तक्ते— गिट्टी, मुरूम, रेती, वगैरे फावडे, पिकास वगैरे.

रोषनाई—कंदील, चिमण्या, केरोसीन तेल, बत्ती वगैरे.

सफाई— डामर, मातीच्या कुंड्या, पोहरे, बकेट वगैरे.

सदर्हू टेंडरें कमेटीचे आफिसांत तारीख १९।१०।१९०२ इसवीचे आंत बंद केलेलीं घेतलीं जातील. ह्या संबंधीं जास्त माहिती जरूर असल्यास कमिटीचे आफिसांत मिळेल. कळावें ता. २४।९।१९०२ इसवी.

V. M. Mahajani
व्हाइस चेअरमन
म्यु० क० आकोला.

## जाहिरात

ह्या जाहिरातीनें सर्वांस कळविण्यांत येते कीं आकोले मुनिसिपाल कमिटीचे स्टोअर मध्यें असलेला निरुपयोगी सामान लांकडी, लोखंडी व इतर सर्व जाहीर लिलावानें तारीख ५-१०-१९०२ इसवी रोज रविवारीं सकाळीं ८ वाजतां विकण्यांत येईल. तारीख २४।९।१९०२

V. M. Mahajani
व्हाईस चेअरमन
म्यु० क० आकोला.

कि० दिवाणी दावा नंबर ६ सन २१ / १९०२

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याजला कर्ज वसूल करण्या बद्दल सरटीफिकीट देण्याचा कायदा आक्ट नंबर ७ सन १८८९ यांतील कलम ७ अन्वयें नोटीस.

विद्यमान दांडेकर साहेब बहादूर सिव्हिल जडज्य आकोला यांचे कोर्टांत.

अर्जदार—कासीबाई जवजे कनुलाल मुखत्यार सखाराम नारायण वा। शिनखेड तालूके आकोले.

या नोटिसीनें सर्वांस कळविण्यांत येतें कीं, वरील अर्जदार यानें मैयत कनुलाल सोनमल वा। शिनखेड याचे लोकांकडेस येणें असलेले कर्ज रकम रुपये २८७२।८।६ वसूल करण्याकरितां सरटीफिकीट मिळावें ह्मणून तारीख १३ माहे सप्टेंबर सन १९०२ इसवी रोजीं अर्ज केला आहे. व ह्या अर्जाचे चौकशीची तारीख १८ माहे आक्टोबर सन १९०२ इसवी रोजीं मुकर केली आहे तर सदरहू दिवशीं १० वाजतां तुह्मी आपले दस्तऐवज वगैरे सुद्धां आमचे कोर्टांत अर्जदार याजला का सरटीफिकीट देऊं नये याचें कारण दाखविण्या करितां हजर व्हावें. माझें सहीनिशी व कोर्टाचे शिक्यानिशीं ही नोटीस देण्यांत आली आहे.

आज तारीख २३ माहे सप्टेंबर सन १९०२ इ०

V. N. Dandekar
सिव्हिल जडज्य.
आकोला.


## वर्तमानसार

कायद्याचा ठराव– नेटिवें स्त्रीची सही जेव्हां एखाद्या कागदावर करावयाची असेल, तेव्हां त्याचे खालीं दोन प्रतिष्ठित साक्षीदारांची त्यावर साक्ष घेऊन, त्यांनीं माजिस्ट्रेटपुढें किंवा दुसऱ्या अधिकाऱ्याकडे जाऊन ती सही खरी आहे, असें सांगावें, असा सरकारनें नियम केला आहे.

विंचू व सर्प दंशावर औषध– दंशाचे जागीं व्हिनिगर एकसारखी चोळीत राहिल्यास गुण येतो असें ह्मणतात. अनुभव पहावा.

भयंकर सर्प– नुकताच राजकोटकडे एक १२ फूट लांबीचा सर्प आढळण्यांत आला. ह्या सर्पास तरवारीनें तोडण्यांत आलें. सर्प मेल्यावर त्यानें खाल्लेलें एक हरिण त्यांच्या शरिरांतून बाहेर काढण्यांत आलें. वासुकी सर्पच कीं काय कोण जाणें!

गव्हरनर साहेबांचें सॅलून—जी. आय. पी. रेल्वेनें गव्हर्नर साहेबांकारितां ५६ फूट लांबीचा एक उत्तम डबा मुद्दाम तयार केला असून त्यांतील एकंदर सामान, टेबलें व खुर्च्या वगैरे उत्तम प्रकारचें व बहुमोल असून त्यांतील दिवे व पंखे विजेचे आहेत. या स्पेशल सॅलूनची किंमत ३० हजार रुपये आहे.

ना० प्रो० गोखले यांस मानपत्र.– ना० प्रो० गोखले यांनीं फर्ग्युसन कॉलेजाशीं असलेला आपला १८ वर्षांचा संबंध सोडल्यामुळें कॉलेजचें झालेलें नुकसान व्यक्त करून त्यास मानपत्र देण्यासाठीं कालेजच्या विद्यार्थ्यांची एक मोठी सभा भरली होती. या पुढील आपले सर्व दिवस आपण सार्वजनिक कृत्यांत व देशसेवेंत घालविणार असें सांगून आपला सर्व जमीन जुमला विकून टाकून समुद्रामध्यें सफर करावयास निघालेल्या व्यापाऱ्या प्रमाणें या वेळीं आपली स्थिती झाली आहे. सार्वजनिक चळवळीच्या समुद्रांत आपलें तारूं फुटून आपण परत आलों तर हें कॉलेज आपणास आश्रय देईल अशी प्रो. गोखले यांनीं आपल्या भाषणांत आशा प्रगट केली आहे.

गोऱ्याचा काळ्यास मार.— लाहोरच्या 'ट्रायब्यून' पत्रास एकजण कळवितो:–ता० ९ रोजीं लाहोर चीफकोर्टाच्या आवारांत एक गरीब अपील नवीस आपलें काम करीत बसला असतांना तेथून एक गोरे पोलिस सुपरिंटेंडेंट घोड्यावर बसून चालले होते. बिचाऱ्या अपीलनवीसास हे लंगी साहेब बहादर कोण हे ठाऊक नसल्यामुळें यानें त्यास सलाम केला नाहीं; तेवढ्यानेंच साहेब बहादुरांची स्वारी गरम होऊन यानीं कोरडा काढून त्या मनुष्याला साहेबांस सलाम करण्याची पुन्हां हयगय न करण्याबद्दल चांगली झणझणीत समज दिली; एवढ्या समजीवर साहेबास राहवलें नाहीं. ते त्यास ह्मणाले. 'सरकार स्वारी (!) आली असतां त्यास सलाम करीत नाहींस?' साहेब बहादुरांच्या या उद्धटपणाबद्दल प्रत्यकास त्यांची कींव येईल पंजाबच्या वरिष्ट न्यायमंदिरा शेजारीं जरी हा अन्याय झाला आहे, तरी अन्याय करणारा गोरा असल्यामुळें त्याची दुरस्ती होणें शक्य नाहीं.

## नोटीस

रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापरडे बी. ए. एल एल. बी. हायकोर्ट वकील मुक्काम उमरावती यांस:—

कळविण्यांत येते कीं आपण आपले पक्षकार रा. रा. धोंडजी कोंडजी व लक्ष्मण तेली यांचे तर्फे आह्मास तारीख १९।९।१९०२ इसवीचे प्रमोदसिंधु वर्तमानपत्रांत नोटीस दिली आहे ती आह्मास पावली. त्याचें उत्तर आह्मी असें कळवितो कीं, गहाणखताचे सर्व रकमेची आदाई झाली असें जें आपण नोटिशींत लिहितां ती गोष्ट चुकीची आहे. गहाणखतांत लिहिलेल्या शर्ती प्रमाणें वसूल जातां हिशोब करितांना आज मितीस आपले पक्षकाराकडे आमचे रुपये ११७५ निघतात. ते रुपये आपण आमचे दुकानीं जमा केल्यास गहाणखत रद्द करून परत देऊं. तसें न केल्यास हे रुपये पुढें होणारे व्याजासुद्धां योग्य वेळीं वसूल करण्याची तजवीज आह्मी करूं. कळावें. तारीख २३।९।०२ इ०

सही
किसनलाल संतुकराम दुकान
आकोला.


ॐनमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय– मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

### मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अभ्रो सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारांवर त्या अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मासंबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टीमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातु व रक्त यांची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो, दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळाल्या व निम मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ट० ८६ आणे पडेल. अनुपान खर्ची सोबत. रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील. दर:–

३१ गो० १ रु०; ७५ गो० २ रु० ११५ गो० ३ रु० १६५ गो० ४ रु०; २७५ गो० ६ रु०; ५५० गो० १०रुपये.

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूंचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं. टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना— अलीकडे २।३ वर्षे आंजारलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरीं शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीं औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावीं.

पत्ता—कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी.



## खरेदी करा !

### रास्कोपचीं थेट व खरी पेटंट वॉचेस

### नकली मालास भुलून पैसे खर्चू नका!!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉंट्राक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व या बद्दलची जोखीम दारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

### रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस........................४०
१९ ,, हंटिंग........................५०

### गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ............२५०

### मेटलचें तीन वर्षे ग्यारंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एक्स्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेकंद कांट्यासह............१०
१९ ,, मध्यभागी सेकंद काटा असलेलें ................२२
१९ ,, हाफ हंटिंगचें................२०
१९ ,, हंटिंगच ........................२०
१४ ,, रिस्ट वॉच ....................२०

### इनामल्‌मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओपन फेस............२०
१९ ,, हंटिंग........................२०
१४ ,, रिस्टवॉच....................२०

### सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ ,, हंटिंग........................३५
१८ व १९ ,, ओपनफस............३०
१९ ,, सेकंद कांट्यासह............३२
१९ ,, मध्यभागीं सेकंद कांटा असलेलें ................३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ ,, हंटिंग ....................४९

लेडीज वॉचीस १४, १८, क्यारेट गोल्ड रुपये ६५–२०० पर्यंत.

**सी. हिनीगर आणि कंपनी,**
ओरिजिनल जिनीयन रास्कॉप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.


☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.